CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २ जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २१४ | पाने १२ | किंमत रु. ८/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक प. पू. डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार यांचा आज तिथीप्रमाणे स्मृतिदिन

संघाला माझ्या सगळ्या गुणांची आवश्यकता आहे. म्हणून अगदी प्रयत्नपूर्वक मी माझ्या अंगी सर्व सद्‌गुण विकसित करीन आणि माझे सर्व अवगुण व दोष नाहीसे करीन.

- स्व. डॉ. केशव बळीराम हेडगेवार
  रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक

## महत्त्वाचे

### सलग दोन दिवसांची घसरण थांबली

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारातील सलग दोन दिवसांची घसरण थांबली असून, बुधवारी बाजाराने दमदार पुनरागमन केले आणि मोठी झेप घेतली. ऑटो, एफएमसीजी, रिअल्टी आणि वित्तीय समभागांमध्ये झालेल्या चौफेर खरेदीमुळे बाजाराला मोठा पाठिंबा मिळाला. दुसरीकडे, 'केपीआयटी टेक्नॉलॉजीज'ने पहिल्या तिमाहीसाठी अपेक्षेपेक्षा कमकुवत अंदाज वर्तवल्यामुळे आयटी कंपन्यांचे शेअर्स मात्र दबावाखाली पाहायला मिळाले. जुलै मालिकेच्या पहिल्याच सत्रात बाजाराची सुरुवात सकारात्मक झाली. त्यानंतर दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी दिवसभर आपली घसरण भरून काढत तेजी कायम ठेवली. व्यवहारादरम्यान निफ्टीने २४,०४९ अंकांचा उच्चांक गाठला.

### महंत नृत्य गोपाल दास यांची प्रकृती खालावली

**लखनौ** : श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांची प्रकृती खालावल्याने त्यांना लखनौ येथील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ८९ वर्षीय महंत दास बेशुद्ध झाले होते, त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मूत्रमार्गाचा संसर्ग (युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन) झाल्याचे निदान केले. सध्या त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.

### अक्कलकोट बसस्थानकात बसखाली चिरडून वृद्ध ठार

**अक्कलकोट** : अक्कलकोट बसस्थानकात आज वृद्ध इसमाचा एसटीखाली चिरडून मृत्यू झाला. याप्रकरणी एसटी बस चालकावर अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. इस्माईल मुल्ला (वय ५६, रा. हळ्ळी सलगर, ता. आळंद, जिल्हा कलबुर्गी कर्नाटक ) असे मयत इसमाचे नांव आहे. याबाबत अस्लम इस्माईल मुल्ला (वय३० रा. हळ्ळी सलगर ता. आळंद) यांच्या फिर्यादीवरुन कासिम मुल्ला (रा. हंजगी ता. अक्कलकोट) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तो हा अपघातातील वाहन-एसटी (बस क्र. एमएच १४ एल एक्स ७५७९) घेवून चालला होता. हयगयीने बस चालवून इस्माईल मुल्ला यांना धडक दिली. त्यात ते खाली पडले. त्यानंतर ड्रायव्हरच्या बाजूचे चाक त्यांच्या अंगावरून गेले. त्यात गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. ही घटना सकाळी ११ : ३० वाजता घडली.

# सचिन अहिर विधान परिषदेच्या उपसभापतिपदी बिनविरोध

## सभापती राम शिंदेंनी केली सभागृहात अधिकृत घोषणा



पावसाळी अधिवेशन



उपसभापतिपदाच्या निवडणुकीसाठी जाताना सचिन अहिर

**मुंबई, १ जुलै**

शिवसेना नेते आणि विधानपरिषद सदस्य सचिन अहिर यांची महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी एकमताने निवड करण्यात आली. विरोधी पक्षाने आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध पार पडली असून, सभापती राम शिंदे यांनी सचिन अहिर यांच्या निवडीची अधिकृत घोषणा सभागृहात केली.

सभागृहाचे कामकाज सुरू होताच, परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्थेद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेवर नव्याने निवडून आलेले निर्वाचित सदस्य सईद खान शेरगुल खान यांचा सभागृहास परिचय करून देण्यात आला. या प्रक्रियेनंतर उपसभापती पदाच्या निवडणुकीची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाली. या निवडणुकीसाठी एकूण चार प्रस्ताव सादर करण्यात आले होते. यामध्ये महाविकास आघाडीकडून (ठाकरे गट) अंबादास दानवे यांनी जगन्नाथ अभ्यंकर यांचा एक प्रस्ताव दाखल केला होता. तर दुसरीकडे सचिन अहिर यांच्या नावासाठी संजय खोडके, प्रवीण दरेकर आणि डॉ. मनीषा कायंदे यांच्याकडून तीन स्वतंत्र प्रस्ताव दाखल करण्यात आले होते.

### अहिर म्हणजे कोणालाही न घाबरणारा निर्भीड योद्धा : मुख्यमंत्री



'अहिर' या शब्दाचा अर्थ गोपालक आणि निर्भीड असा आहे. जे कोणालाही घाबरत नाहीत, जे अत्यंत निर्भीड असतात, अशांना 'अहिर' म्हणतात, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपसभापतीपदी निवड झाल्यानंतर सचिन अहिर यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची एकमताने निवड झाल्यानंतर, देवेंद्र फडणवीस यांनी अहिर यांचे सभागृहात मनःपूर्वक अभिनंदन केले. विरोधी पक्षाने उच्च परंपरांचे पालन करत अर्ज मागे घेतल्याबद्दल विरोधी पक्षांचे आभार मानले.

### परंपरा राखत विरोधकांकडून अर्ज मागे

निवडणुकीची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपसभापतीची निवडणूक ही नेहमी एकमताने आणि बिनविरोध होण्याची या सभागृहाची गौरवशाली परंपरा राहिली आहे, अशी आठवण करून देत त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब आणि उमेदवार अभ्यंकर यांना आपला अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

संसदीय कामकाज मंत्र्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत अनिल परब यांनी, या सभागृहाचा अनेक वर्षे सदस्य राहिल्यामुळे येथील कामकाज आणि पवित्रतेची मला पूर्ण जाणीव आहे, असे सांगत त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तयारी दर्शवली. त्यानंतर प्रस्तावाचे अनुमोदक आमदार अभिजीत वंजारी यांनी जगन्नाथ अभ्यंकर यांच्या नावाचा प्रस्ताव अधिकृतपणे मागे घेतला.

### सचिन अहिर यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब

विरोधी पक्षाने अर्ज मागे घेतल्यानंतर सभापतींच्या सूचनेनुसार आ. संजय खोडके यांनी सचिन अहिर यांची उपसभापती म्हणून निवड करण्यात यावी, असा मुख्य प्रस्ताव सभागृहात मांडला. या प्रस्तावाला आमदार विक्रम काळे, प्रवीण दरेकर आणि डॉ. मनीषा कायंदे यांनी अनुमोदन दिले.

(तभा वृत्तसेवा)

# व्हॉट्सअ‍ॅपच्या नवीन युजरनेम फीचरवर मेटाला नोटीस

**नवी दिल्ली, १ जुलै**

व्हॉट्सअ‍ॅप वापरकर्त्यांसाठी आणलेल्या युजरनेम फिचरच्या मुद्यावर केंद्र सरकारने मेटाला नोटीस बजावून तीन दिवसांत उत्तर सादर करण्याचा आदेश दिला आहे. सध्या भारतात हे फिचर आणण्यास केंद्राने बंदी घातली.




व्हॉट्सअ‍ॅप लवकरच आपल्या युजर्ससाठी एक नवीन फिचर आणण्याच्या तयारीत आहे. या फिचरनुसार आता युजर्सना एकमेकांशी चॅट करण्यासाठी मोबाईल नंबर शेअर करण्याची गरज भासणार नाही. ते 'युजरनेम'द्वारे एकमेकांशी कनेक्ट राहू शकतील. कंपनीने हे गोपनीयतेच्या दृष्टीने मोठे पाऊल असे म्हटले आहे. या फिचरमुळे ऑनलाईन फसवणूक वाढण्याची भीती केंद्र सरकारला आहे.

केंद्र सरकार व्हॉट्सअ‍ॅपच्या या आगामी 'युजर आयडी' फिचरची सखोल तपासणी करणार आहे. मेटा कंपनीच्या दाव्यानुसार, हे फिचर युजर्सच्या फोन नंबरची गोपनीयता जपण्यासाठी डिझाईन करण्यात आले आहे. सध्याच्या सुविधेत एखाद्या अनोळखी व्यक्तीकडे किंवा व्यवसाय करणाऱ्या कंपनीकडे तुमचा मोबाईल नंबर असेल, तर ते थेट तुमच्याशी संपर्क साधू शकतात. नवीन फिचर आल्यानंतर जगातील तीन अब्जांहून अधिक व्हॉट्सअ‍ॅप युजर्स आपला फोन नंबर शेअर न करताही एकमेकांशी संवाद साधू शकतील. सुरक्षेसाठी व्हॉट्सअ‍ॅप युजर्सना युनिक युजरनेम सुचवणारे 'युजरनेम जनरेटर' टूलसुद्धा देणार आहे.

### सायबर गुन्हेगारांना ओळख लपवणे अधिक सोपे

व्हॉट्सअ‍ॅप याला 'प्रायव्हसी' म्हणत असले, तरी अनेक टेक तज्ज्ञांनी यावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. टेलिग्राम या मेसेजिंग अ‍ॅपचे उदाहरण देत तज्ज्ञांनी म्हटले की, फोन नंबर नसल्यामुळे सायबर गुन्हेगारांना ओळख लपवणे अधिक सोपे होईल. मोबाईल नंबरमुळे जबाबदारी निश्चित होते. तुम्हाला कोण मेसेज करते माहीत असते. फसवणूक झाल्यास तक्रार करण्यासाठी नंबर उपलब्ध असतो.

### लोकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता

मोबाईल नंबर नसल्यामुळे तपास यंत्रणांना सायबर गुन्ह्यांचा छडा लावणे कठीण होईल. अलिकडेच नीट-यूजी वैद्यकीय प्रवेश परीक्षेचा पेपर लीक झाल्याच्या प्रकरणात टेलिग्राम अ‍ॅपचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याचे समोर आले होते. (वृत्तसंस्था)

# मोहोळ तालुक्यातील दोन अधिकारी निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १ जुलै -**

सावळेश्वरचे मंडल अधिकारी प्रकाश दळवे व चिंचोलीकाटीचे ग्राम महसूल अधिकारी जनार्दन गडदे यांना निलंबित केले आहे. तसे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आले आहेत.

चिंचोली काटी येथील ग्राम महसूल अधिकारी जनार्दन गडदे यांना तहसील कार्यालय मोहोळ यांच्याकडून २७ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करणे बाबत प्राधिकृत करण्यात आले होते. परंतु त्यांनी २४ मार्च रोजी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी तात्काळ पुन्हा दाखल करणे आवश्यक असताना गडदे यांनी जाणून-बुजून विलंब केला आहे. मोहोळ तहसील कार्यालयाकडील चिंचोली काटी एमआयडीसी मधील अवैध मुरूम उपसा व साठवणूक कंपनीच्या पूर्व बाजूला मुरूम उत्खनन केल्याबाबत साठा केल्याबाबत रिपोर्ट पंचनामा सादर केला आहे. परंतु संबंधित प्लॉट धारकांची नावे नमूद केली नाहीत. २० एप्रिल रोजी चिंचोली काटी एमआयडीसीमधील ओसी, छल्ला, फरफर, बालाजी अमाईन्स व कृष्णा केमिकल कंपन्यांनी मुरूम उत्खनन केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत गडदे यांना प्राधिकृत केले होते. परंतु त्यांनी अद्यापही गुन्हा दाखल केला नाही.

चिंचोली काटी एम आयडीसीतील मुरूम उपसा व साठवणूक ही बाब ६ जून रोजी मोहोळचे आमदार राजू खरे यांच्या निदर्शनास आली होती. परंतु महसूल अधिकाऱ्यांनी गौण खनिजबाबत अहवाल कार्यालयाकडे पाठवला नाही. सुचनांचे पालन केले नाही. मंडल अधिकारी प्रकाश दळवे यांनी पर्यवेक्षक म्हणून कामकाज पाहणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून येते. त्यांचेही निलंबन केले आहे.

# बाबा बर्फानीचा वितळण्याचा वेग वाढला



**जम्मू, १ जुलै**

अमरनाथ यात्रा तीन जुलैपासून सुरू होत आहे.यात्रेपूर्वीच अमरनाथ शिवलिंग वितळायला सुरुवात झाली आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे १४ हजार ५०० फूट उंचीवर असलेल्या अमरनाथ गुहेतील बर्फापासून बनलेल्या शिवलिंगाची उंची दोन महिन्यांपूर्वी २० ते २२ फूट होती. मात्र, सध्या ती केवळ आठ फुटांवर आली आहे.

मूळ शिवलिंगाचा जाड भाग जो असतो त्याची उंची ६ ते ८ फूट इतकी असते. पण, त्यावर गोठलेल्या बर्फाची काही काठी वरपर्यंत गेलेली दिसते. स्थानिक लोक त्यालाही शिवलिंगाचा भाग मानतात. त्यामुळे त्याची उंची धरली तर ही उंची साधारण दोन महिन्यांपूर्वी २० ते २२ फूट इतकी होती. पण आता ती ७ ते ८ फुटांवर आली आहे. गत काही वर्षांपासून श्रावण पौर्णिमेपूर्वीच शिवलिंग पूर्णपणे वितळून जात असल्याचे दिसत आहे.

### यात्राकाळात तापमानात होते वाढत

वाढते जागतिक तापमान, हवामानातील बदल आणि यात्राकाळात गुहेत पोहोचणाऱ्या लाखो भाविकांमुळे परिसरातील तापमान वाढत असल्याने हिमलिंग वितळण्याचा वेग वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. यापूर्वी २०१३, २०१६ आणि २०१८ मध्येही शिवलिंग नियोजित यात्रा संपण्यापूर्वीच वितळले होते. विशेषतः २०१६ मध्ये यात्रा सुरू झाल्यानंतर अवघ्या दहा दिवसांत शिवलिंगाची उंची दीड फुटांवर आली होती. (वृत्तसंस्था)

# पीएफ २.१ डिजिटल प्रणाली लागू

**नवी दिल्ली, १ जुलै**

केंद्र सरकारने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पीएफ) संदर्भात पीएफ २.१ ही नवीन डिजिटल प्रणाली बुधवारपासून लागू केली आहे. यामुळे भविष्य निर्वाह निधी संदर्भातील अनेक सेवा अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ होणार आहेत.

नवीन व्यवस्थेनुसार पीएफ काढण्याची प्रक्रिया पूर्वीपेक्षा अधिक सोपी करण्यात आली आहे. क्लेमसाठी लागणारा वेळ कमी होणार असून, सर्व प्रक्रिया एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर पार पडणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना विविध कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या मारण्याची गरज कमी होईल. नवीन प्रणाली लागू करण्यासाठी १ जुलै रोजी पीएफ पोर्टलवरील काही सेवा तात्पुरत्या बंद ठेवण्यात आल्या होत्या. २ जुलैपासून पीएफ २.१ प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर सर्व सेवा पुन्हा नियमितपणे सुरू झाल्या. (वृत्तसंस्था)

# कर्णिक नगर परिसरात श्रीराम टॉवेल कारखानदाराची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

अज्ञात कारणावरून एका ३४ वर्षीय टॉवेल कारखानदाराने घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पद्म नगर येथील राधाकृष्ण एव्हीन्यू अपार्टमेंटमध्ये बुधवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आली.



शिवकुमार चंद्रकांत श्रीराम असे त्या मयत तरुणाचे नाव आहे. त्यांचा एमआयडीसी मध्ये श्रीराम टॉवेल कारखानदारीचा व्यवसाय आहे. रविवार २८ जून रोजी शिवकुमार यांचे आई वडील हे मुलीला भेटण्यासाठी मुंबईला गेले होते. शिवकुमार हा घरी एकटाच असताना त्याने अज्ञात कारणावरून अज्ञात वेळी घरामध्ये स्वतः ला गळफास लावून घेतला.

दरम्यान आज सकाळी शिवकुमारचे वडील हे शिवकुमारला वारंवार फोन लावत होते. मात्र तो फोन उचलत नव्हता. त्यामुळे त्यांनी त्यांच्या घराच्या जवळ राहणाऱ्या आपल्या भावाला फोन करून ही कल्पना देऊन घराकडे जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते शिवकुमारला पाहण्यासाठी घराकडे आले असता त्यांना घराजवळ दुर्गंधी येऊ लागली. दरवाजावर आवाज दिला. मात्र आतून काही प्रतिसाद मिळत नव्हता. शंका आल्याने त्यांनी इतर नातेवाईकांना घटनास्थळी बोलावून घेतले. त्यानंतर ही खबर एमआयडीसी पोलिसांना देण्यात आली. पोलिस हवालदार डि.के. डोके यांनी घटनास्थळी पोहचून दरवाजा उचकटून नातेवाईकांसह घरात प्रवेश केला असता शिवकुमार हा छताला गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आला. त्याचा चेहरा व शरीर पूर्ण फुगले होते. शरीरातील रक्त खाली पडल्याने फरश्या रक्ताने माखल्या होत्या. घटनास्थळाचा पंचनामा करून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दुपारी एक वाजता दाखल केला.

### एकुलता एक व अविवाहीत

मयत शिवकुमार हा अविवाहित असून तो आई-वडिलांना एकुलता एक मुलगा होता. शिवकुमार व त्याच्या वडिलांचे सोमवार रोजी मोबाईलवर बोलणे झाले होते. तसेच शिवकुमारच्या चुलत भावाने शिवकुमारला सोमवारी दुपारी त्याच्या मित्रासोबत फिरताना पाहिले होते. मयत शिवकुमारच्या पश्चात आई, वडील व बहीण असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# एसटीच्या 'तीर्थाटन' योजनेत खाजगी भागीदारी



- महामंडळाच्या उत्पन्नाला नवे बळ
- राज्यातील सहा पर्यटन संस्थांची होणार निवड
- मराठी युवकांसाठी उद्योजकतेची संधी

**मुंबई, १ जुलै**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे-एसटी संगे तीर्थाटन' या महत्त्वाकांक्षी योजनेत खाजगी पर्यटन संस्थांच्या सहभागाला तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे भाविकांना अधिक दर्जेदार आणि सर्वसमावेशक तीर्थयात्रेची सुविधा उपलब्ध होणार असून, एसटी महामंडळाच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निविदा (आरएफपी) प्रक्रियेद्वारे राज्यातील सहा प्रदेशांसाठी प्रत्येकी एका पर्यटन संस्थेची निवड करण्यात येणार आहे. एकूण सहा संस्थांच्या माध्यमातून हा उपक्रम सुरुवातीला दोन वर्षे प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येईल. या कालावधीत मिळणारा प्रतिसाद आणि अनुभव लक्षात घेऊन योजनेचा पुढील विस्तार करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

या योजनेत बस आरक्षणासाठी बसच्या आसनक्षमतेइतके प्रवासी असणे आवश्यक राहणार आहे. शासनाकडून विविध सामाजिक घटकांना एसटी प्रवासात मिळणाऱ्या सवलती या योजनेतही कायम राहतील. त्यामुळे खाजगी पर्यटन कंपन्यांकडून आयोजित धार्मिक सहलींच्या तुलनेत एसटीच्या माध्यमातून होणारा तीर्थाटन प्रवास अधिक परवडणारा ठरणार असल्याचे महामंडळाचे म्हणणे आहे.

ही योजना राज्यातील मराठी युवक-युवतींसाठी उद्योजकतेची नवी संधी निर्माण करणारी ठरणार असल्याचे प्रताप सरनाईक यांनी सांगितले. मोठ्या भांडवली गुंतवणुकीशिवाय नियोजन आणि व्यवस्थापन कौशल्याच्या आधारे पर्यटन क्षेत्रात व्यवसाय उभारण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

भाविकांच्या श्रद्धेला सेवाभावाची जोड देतानाच एसटी महामंडळाच्या आर्थिक बळकटीसाठी नवा महसुली मार्ग उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत असल्याचे प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. राज्यातील धार्मिक पर्यटनाला चालना देतानाच एसटीच्या उत्पन्नवाढीलाही या योजनेमुळे गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. (तभा वृत्तसेवा)

### खाजगी संस्थांच्या उत्पन्नातून एसटीला १० टक्के हिस्सा

योजनेअंतर्गत प्रवासी वाहतूक, बससेवा आणि प्रवासभाड्यातून मिळणारे संपूर्ण उत्पन्न एसटी महामंडळाकडेच राहणार आहे. धार्मिक सहलींचे नियोजन, निवास, भोजन, स्थानिक पर्यटन, मार्गदर्शकांची व्यवस्था, टोल, पार्किंग आणि विविध प्रवेश शुल्कांची जबाबदारी संबंधित खाजगी पर्यटन संस्थांकडे असेल. या सेवांमधून खासगी संस्थांना मिळणाऱ्या उत्पन्नापैकी किमान दहा टक्के हिस्सा एसटी महामंडळाला देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक सुविधा उपलब्ध करून देतानाच एसटीच्या महसुलातही भर पडणार आहे.

# देशात जी राम जी कायदा लागू

## मनरेगा रद्द, रोजगाराच्या दिवसात आणि मजुरीत वाढ

**नवी दिल्ली, १ जुलै**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) १ जुलैपासून बंद झाला असून, त्याची जागा महत्वाकांक्षी अशा विकसित भारत आणि आजिविका मिशन गॅरंटी (ग्रामीण) अधिनियम २०२५ व्हीबी जी राम जी कायद्याने घेतली आहे.

नव्या कायद्याने रोजगाराच्या दिवसात आणि रोजगाराच्या दरात वाढ करण्यात आली आहे. व्ही बी जी राम जी कायदा १ जुलैपासून देशभर लागू झाला आहे. या योजनेसाठी ९५६९२ कोटी ३१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मनरेगा कायद्यात आधी रोजगारांचे दिवस १०० होते तसेच मजुरीची राशी ३०० रुपये होती. आत व्ही बी जी राम जी कायद्यात रोजगाराचे दिवस १०० वरून १२५ करण्यात आले असून, किमान मजुरी २९८.८० रुपयांवरून ३२७.४० रुपये करण्यात आली आहे.

मजुरीच्या दरात लक्षणीय वाढ करण्यात आली, तसेच ज्या राज्यात मजुरीचे दर थोडे जास्त होते, त्यात आणखी वाढ करण्यात आली. देशाच्या कोणत्याही भागातील पात्र ग्रामीण मजूर रोजगारापासून एक दिवसही वंचित राहू नये म्हणून ही योजना लागू करण्यात आली.

(तभा वृत्तसेवा)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## सिंहगड पब्लिक स्कूलचा स्थापना दिन उत्साहात

**सोलापूर, दि. १ जुलै-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव, सोलापूर येथे विद्यालयाचा १६ वा स्थापना दिन साजरा करण्यात आला. ज्ञान, संस्कार आणि गुणवत्ता या मूल्यांचा वारसा जपत विद्यालयाने गेल्या १६ वर्षांत केलेल्या शैक्षणिक वाटचालीचा गौरव यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते केक कापून स्थापना दिनाचा आनंद साजरा करण्यात आला. अध्यक्षीय भाषण संजय नवले यांनी केले. यावेळी शिक्षक वसीम इनामदार यांनी संस्थेच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेतला. अमोल नवले यांनी आपल्या मनोगतात संस्थापक प्रा. एम. एन. नवले यांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करत गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून सिंहगड संस्थेने हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविल्याचे सांगितले. कार्यक्रमास विद्यालयाच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निकहत शेख उपस्थित होते.




## ‘वालचंद’चे वरिष्ठ लिपिक भगवान खुरगांवकर यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १ जुलै-**

वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयातील वरिष्ठ लिपिक भगवान दत्ता खुरगांवकर हे नियत वयोमानानुसार ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त महाविद्यालयात आयोजित सदिच्छा समारंभात प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपप्राचार्य एम. पी. जोशी, आर. व्ही. हिप्परगी आणि अनुप मेहत्रे उपस्थित होते. खुरगांवकर यांनी महाविद्यालयात ग्रंथालय परिचर पदापासून सुरुवात करून वरिष्ठ लिपिक पदापर्यंत ३५ वर्षे दीर्घ सेवा बजावली. या समारंभात प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्यासह प्रा. डॉ. मनोहर जोशी, सिद्राम सलवदे, एस. पी. गायकवाड, विजया महाजन, आनंद महाजन, अनुप मेहत्रे, चेतन तुपकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी अब्रार सय्यद, मनोज मुळकुटकर, अमोल सुपाते आणि श्रीरंग गानबोटे यांनी मनोगत व्यक्त करून खुरगांवकर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रा. पद्मावती पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



## हिंगुलांबिका शाळा व रोटरी क्लबतर्फे विविध उपक्रम

**सोलापूर, दि. १ जुलै-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळा व रोटरी क्लब ऑफ सोलापूर युज यांच्यातर्फे नॅशनल डॉक्टर्स डे निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सध्याच्या धावपळीच्या जगात औषधांबरोबरच रुग्णांना प्रार्थनेद्वारे जगण्याची नवीन आशा देण्यासाठी नॅशनल डॉक्टर डेचे औचित्य साधून धन्वंतरी मंत्रा या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे डिस्टिक्ट हॉस्पिटल गुरूनानक चौक येथे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, शिक्षक श्री सुमित औसेकर, डॉ. केदार कहाते, डॉ. वर्षा डोफोडे, डॉ. वंदना खोपकर रोटरीचे अध्यक्ष किरणकुमार मुसळे, सेक्रेटरी हिंदुराव गोरे, विजय जाधव आणि आशिष सागर उपस्थित होते. प्रारंभी फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन व केक कापून नॅशनल डॉक्टर डे साजरा करण्यात आले. त्याचबरोबर हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत रक्तगट तपासणी चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# सोलापूरसाठी पालकमंत्र्यांचा पुढाकार

### विकास प्रकल्पांसाठी अधिकाऱ्यांच्या घेतल्या भेटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**



सोलापूरच्या पाणीपुरवठा, बस सेवा आणि जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बुधवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बुधवारी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजाच्या व्यस्ततेतही सोलापूर शहराच्या विकासकामांना प्राधान्य देत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समवेत बैठका घेतल्या. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी बुधवारी राज्याच्या नगरविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंद राज यांच्या समवेत बैठक घेतली. सोलापूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी १ हजार ४०० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना जागतिक बँकेकडे अंतिम मंजुरीसाठी आहे. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्याने त्या समजून घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी अप्पर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंद राज यांच्या समवेत चर्चा केली. यावेळी यातील त्रुटींची पूर्तता करून १५ जुलैपूर्वी महाराष्ट्र शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन डॉ. गोविंद राज यांनी दिले.

सोलापूर शहरासाठी केंद्र शासनाकडून १०० ई बस मंजूर करण्यात आल्या आहेत. या बस लवकर उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी अनेकदा सभागृहात केली आहे. कंपनीशी करार पूर्ण झाला असून वाहनतळाचे काम देखील पूर्ण झाले आहे. मात्र तरीदेखील सोलापूर शहराला बस मिळण्यामध्ये दिरंगाई होत असल्यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी याबाबत पाठपुरावा करण्यासाठी डॉ. के. एच. गोविंदराज यांच्या समवेत बैठक घेतली. यावेळी आपण मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंद राज यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. १५ ऑगस्ट पूर्वी शहराला किमान २५ बस देण्यात येतील, असे आश्वासनही अप्पर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंद राज यांनी याप्रसंगी दिले. पाकणी येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या फाईलमधील त्रुटी वर्षभरापासून पूर्ण करून ती फाईल केंद्र सरकारकडे पाठवण्यात आली आहे. या फाईलला केंद्र सरकारकडून लवकरात लवकर मंजुरी मिळावी याकरिता नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी याप्रकरणी लक्ष घालावे, अशी विनंती पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी यांनी यावेळी केली. त्यांच्या या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत सोलापूर शहर विकासाचे प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर सोडण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंद राज यांनी याप्रसंगी दिले.

# प्रिसिजन वाचन अभियानाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रा. दवणे यांची मुलाखत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

वाचनसंस्कृतीचा प्रसार आणि समाजात वैचारिक समृद्धी निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'प्रिसिजन वाचन अभियानाला' यंदा दोन वर्षे पूर्ण होत आहेत. या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त प्रसिद्ध साहित्यिक, कवी, गीतकार आणि प्रेरणादायी वक्ते प्रा. प्रवीण दवणे यांच्या विशेष मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे होणार आहे.



या मुलाखतीचे विशेष आकर्षण म्हणजे प्रा. प्रवीण दवणे यांची मुलाखत त्यांचेच चिरंजीव, युवा कवी, लेखक आणि प्राध्यापक आदित्य दवणे घेणार आहेत. दोन पिढ्यांमधील हा साहित्यसंवाद साहित्य, वाचनसंस्कृती, लेखनप्रवास, जीवनमूल्ये आणि नव्या पिढीच्या विचारविश्वावर आधारित असल्याने तो रसिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

प्रा. प्रवीण दवणे हे मराठी साहित्यविश्वातील लोकप्रिय आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या नावावर ११० हून अधिक पुस्तके आणि २,००० पेक्षा अधिक मराठी गीते आहेत. ‘सावर रे!’, ‘स्पर्शगंध’, 'रंगमेध' यांसारख्या पुस्तकांबरोबरच अनेक गाजलेल्या चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन आणि पटकथा लेखन केले आहे. प्रभावी वक्ते म्हणूनही त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात ओळख आहे.

आदित्य दवणे हे नव्या पिढीतील आश्वासक कवी, लेखक, वक्ते आणि प्राध्यापक आहेत. 'युवा बोध' या लेखमालेद्वारे त्यांनी तरुणांशी संवाद साधला असून 'नातवंडांच्या कविता' आणि 'द पॉइटरी क्लब' यांसारख्या उपक्रमांमुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून प्रिसिजन वाचन अभियानाच्या माध्यमातून विविध साहित्यिक, विचारवंत, लेखक आणि मान्यवरांच्या मुलाखती, व्याख्याने व संवाद आयोजित करून सोलापूरमध्ये वाचनसंस्कृतीला चालना देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. ‘वाचनातून घडते विचारांची पिढी... आणि विचारातून घडतो समृद्ध समाज’ हा संदेश घेऊन राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या विशेष कार्यक्रमाचा लाभ साहित्यप्रेमी, विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच प्रेरणादायी विचारांची आवड असलेल्या सर्व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## मनपाला शासनाकडून जीएसटीपोटी दोन कोटी वाढीव अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

राज्य शासनाकडून सोलापूर महापालिकेला जीएसटीपोटी दरमहा २८ कोटी अनुदान मिळत होते. त्यात आता दोन कोटींची वाढ होऊन दरमहा ३० कोटी अनुदान मिळणार आहे, अशी माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

पूर्वी महापालिकेकडून जकात पद्धती अवलंबण्यात येत होती. शासनाने ती रद्द करून एलबीटी आणली होती. एलबीटी जाचक असल्याने व्यापाऱ्यांनी त्याला जोरदार विरोध केला होता. त्यामुळे विशिष्ट रकमेपर्यंतच्या उलाढालीवर एलबीटी आकारणे शासनाने काही वर्षांपूर्वी बंद केले होते. एलबीटी रद्द झाल्याने त्यापोटी राज्य शासनाकडून महापालिकेला अनुदान दिले जात होते. देशात एकसमान कर प्रणाली आणण्याच्यादृष्टीने जीएसटी लागू करण्यात आली. तेव्हापासून राज्य शासनाकडून महापालिकेला जीएसटीपोटी अनुदान देण्याची पद्धत सुरू झाली. प्रचलित पद्धतीने महापालिकेला दरमहा २८ कोटी रुपये अनुदान जीएसटीपोटी दिले जात होते. आता त्यात शासनाने दोन कोटींची भर घालून दरमहा ३० कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार आता महापालिकेला वाढीव अनुदान मिळणार आहे, असे महापौरांनी सांगितले. जीएसटीपोटी महापालिकेला ५६ कोटी फरकाची रक्कम मिळण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महापालिकेला दरमहा कर्मचाऱ्यांचे वेतन करण्यासाठी सुमारे २५ कोटी रुपये लागतात. आता वाढीव अनुदान शासनाकडून मिळत असल्याने त्याचा उपयोग विकास कामांसाठी होणार आहे.



## न.प.सांगोलाच्या नियोजन व विकास समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जुलै-**

सांगोला नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीची बैठक उपनगराध्यक्ष नितीन इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत सांगोला शहराचा सर्वांगीण, नियोजनबद्ध आणि लोकाभिमुख विकास करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. आगामी काळात नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणारी विकासकामे प्राधान्याने हाती घेऊन शहर अधिक स्वच्छ, हिरवेगार, सुरक्षित आणि सुविधायुक्त बनविण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, गटनेते रमेश जाधव, नगरसेविका आशादेवी यावलकर, नगरसेवक विजय इंगोले, जुबेर मुजावर तसेच कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे, नगर अभियंता आकाश गोडसे, करण सरवदे, अरिफ मुलाणी, प्रतिभा कोरे उपस्थित होत्या.

## आर्थिक समावेशन आदर्श गाव घोषणा कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

ॲक्सिस बँकेच्या सहकार्याने व धान फाउंडेशनच्या माध्यमातून समुदाय आर्थिक साक्षरता केंद्र अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या आर्थिक साक्षरता अभियानाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून तोगराळी येथे आर्थिक समावेशन आदर्श गाव घोषणा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी सरपंच महेश हणमंत पाटील साहेब होते. यावेळी उपसरपंच गंगूबाई कोळी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी अन्नपूर्णा धेंडे, रेणुका मेहत्रे, सविता पुजारी आणि कल्पना पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दक्षिण सोलापूर तालुक्यात राबविण्यात आलेल्या आर्थिक साक्षरता अभियानांतर्गत नागरिकांना बचतीचे महत्त्व, विविध शासकीय योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री फसल विमा योजना, अटल पेन्शन योजना, आयुष्मान भारत योजना, डिजिटल बँकिंग, ऑनलाइन व्यवहार, एटीएमचा सुरक्षित वापर तसेच आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

याशिवाय पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते आर्थिक समावेशन आदर्श गाव घोषणा फलकाचे अनावरण करण्यात आले. सूत्रसंचालन समुदाय आर्थिक साक्षरता केंद्र, दक्षिण सोलापूरचे तालुका समन्वयक किशोर झेंडेकर यांनी केले.




## ‘एसपीएम’ स्कूल येथे डॉक्टर्स डे साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

एस.पी.एम. इंग्लिश स्कूल, सोलापूर येथे राष्ट्रीय डॉक्टर्स दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी शाळेचे पालक डॉ. जयंत शेळगीकर (जनरल सर्जन), डॉ. स्वाती शेळगीकर (संसर्गजन्य रोगतज्ज्ञ) डॉ.सुदर्शन चक्रे (बालरोगतज्ञ) डॉ. रतन मेखला (अस्थिरोगतज्ज्ञ, रेल्वे हॉस्पिटल), डॉ. सुनीलकुमार बदावत (वरिष्ठ विभागीय वैद्यकीय अधिकारी, रेल्वे हॉस्पिटल) )हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवर पाहुण्यांच्या स्वागताने व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर उपस्थित डॉक्टरांचा परिचय करून देण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता कोळी यांच्या हस्ते सर्व मान्यवर डॉक्टरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शाळेची विद्यार्थिनी गार्गी कामठाणकर हिने केले व विद्यार्थी विघ्नेश पवार याने सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या शिक्षिका अश्विनी जानराव व इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लहान मुलांच्या खेळण्यावरून वाद; महिलेस मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

लहान मुलांच्या खेळण्यावरून झालेल्या वादात एका महिलेला लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना नीलम नगर येथे मंगळवारी रात्री नऊ वाजता घडली. वैशाली सिद्धू धुरवे (वय २७ वर्ष, रा नीलम नगर,एमआयडीसी सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या महिलेचे नाव असून मंगळवारी रात्री राहच्या घराजवळ लहान मुलांच्या खेळण्यावरून वाद झाले. याची विचारणा केली असता वैशाली हिला रवींद्र धुर्वे , जयश्री धुर्वे व इतर दोन जणांनी मिळून लाथा बुक्क्याने मारहाण केली. त्यामुळे त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात पती सिद्धू याने आज बुधवारी सकाळी दाखल केले.




## इंग्रजीतील नावफलक अखेर मनपाने बदलले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

महापालिकेच्या स्वातंत्र्यवीर सावरकर जलतरण तलाव येथील नावफलक इंग्रजीत लावण्यात आल्याच्या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तीव्र आंदोलन छेडले होते. मनसेच्या ठाम भूमिकेनंतर आणि जनभावनेचा आदर करत अखेर महापालिका प्रशासनाने इंग्रजी फलक हटवून मराठीत नवीन फलक लावला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव आणि मराठी भाषेचा सन्मान राखण्यासाठी लढणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व मनसैनिकांचे आभार विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अभिषेक रामपुरे यांनी मानले आहेत.

## ‘अमृत’ची आता हरित उर्जा क्षेत्राकडे वाटचाल; राज्यभर अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या Go Green India व सस्टेनेबल मोबिलिटी संकल्पनेला बळ देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे ने हरित ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'अमृत'च्या माध्यमातून राज्यभरात ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई घटक तसेच ग्रामीण भागातील इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

**हरित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल**

ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायामुळे पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळून हरित ऊर्जा वापर वाढेल. युवक, महिला व ग्रामीण उद्योजकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील. पर्यावरण रक्षणाच्या सामाजिक जबाबदारीतून 'अमृत'ने हा अनोखा उपक्रम हाती घेतला असून, यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यासोबतच स्वयंरोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत, असे ‘अमृत’कडून सांगण्यात आले.

# उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम जिल्ह्यात राबवा

### अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येयांनुसार २०३० पर्यंत १५ वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुषांना १०० टक्के साक्षर व संख्याज्ञानी बनवण्याचे ध्येय ठेवून केंद्र पुरस्कृत ‘उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम’ २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत राबवण्याच्या सूचना अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

**२०११ जनगणनेनुसार उद्दिष्ट**

राज्यात गेल्या तीन वर्षांपासून ही योजना सुरू असून, २०११ च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी असाक्षर लोकसंख्येच्या प्रमाणात वार्षिक उद्दिष्ट निश्चित केले जाते.

यावेळी सोलापूर मनपा उपआयुक्त अशिष लोकरे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर प्राचार्य डॉ. प्रभाकर बुधारम, जिल्हा सांख्यिकी उपआयुक्त संगीता मोरे, विस्तार अधिकारी सुहास गुरव, मनपा प्रशासन अधिकारी सुरेश कासार, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आनंद ढेपे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**जिल्ह्यात २०२३-२४ पासून अंमलबजावणी**

सदर कार्यक्रम सोलापूर जिल्ह्यात सन २०२३-२४ पासून कार्यान्वित आहे. अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा, गट व शाळा स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. राज्यस्तरावर शालेय शिक्षण मंत्री हे नियामक समितीचे अध्यक्ष असून नियमित आढावा घेतात. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी नियामक परिषदेचे अध्यक्ष तर मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यकारी समितीचे अध्यक्ष आहेत. शिक्षणाधिकारी (योजना) यांच्यामार्फत अंमलबजावणी केली जाते.

## गणित मंडळाच्या वतीने रविवारी होणार गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जुलै-**

सांगोला तालुका गणित अध्यापक मंडळाच्या वतीने दहावी बोर्ड परीक्षेत विद्यालयात गणित विषयात प्रथम, गणित प्रज्ञा आणि पारंगत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक शिक्षक तसेच पदोन्नती मिळालेल्या तालुक्यातील गणित शिक्षकांचा सत्कार समारंभ रविवार दि.५ जुलै रोजी स.१०.३० वा. सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथे आयोजित केला आहे.

डॉ.अनिकेत देशमुख, प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, संजय भस्मे, मुख्याध्यापक चारुदत्त जगताप यांचे शुभहस्ते सदर कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निलकंठ लिंगे, शिवाजीराव चौगुले, आनंद खंडागळे, दिलावर नदाफ, अण्णासाहेब गायकवाड, दिनेश सुरवसे, वैशाली बेहरे, एकनाथ फाटे, शरद धोकटे परिश्रम घेत आहेत.

# हिमाचल, काश्मीर, अरुणाचलमध्ये ढगफुटी



मुसळधार पाऊस, ढगफुटीमुळे झालेले नुकसान



**जनजीवन विस्कळीत | अनेक गावांचा संपर्क तुटला | भूस्खलनामुळे महामार्गावरील वाहतूक बंद | घरांचे नुकसान | युद्धपातळीवर बचावकार्य सुरू**

**जम्मू/ सिमला/ इटानगर, १ जुलै**

मुसळधार पाऊस आणि ढगफुटीमुळे जम्मू-काश्मीरचा डोडा जिल्हा, हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्हा आणि अरुणाचल प्रदेशातील लोअर सियांग जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. ढगफुटीमुळे अनेक घरे ढिगाऱ्याखाली दबली गेली, तर भूस्खलन आणि पुरामुळे ग्रामीण भागांचा शहराशी संपर्क तुटला आहे. महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली असून, हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी राज्य आपत्ती व्यवस्थापनाच्या पथकाकडून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे.

प्रशासनाकडून अद्याप जीवितहानीची माहिती देण्यात आली, नसली तरी नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक नागरिकांचा मृत्यू होण्याची शक्यता आहे.

जम्मू-काश्मीरमधील डोडा येथील भालेसा भागातील खल्जुगासर परिसरात बुधवारी पहाटे मुसळधार पावसानंतर झालेल्या ढगफुटीमुळे अनेक घरे वाहून गेली. या भागात अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्याने जम्मूला जोडणारा महामार्ग बंद करण्यात आला. उभी पिके आणि फळबागा पूर्णपणे नष्ट झाल्या. अनेक घरे आणि इतर खाजगी मालमत्तेचेही नुकसान झाले. स्थानिक प्रशासनाने बाधित भागात मदत आणि बचाव कार्य सुरू केल्याची माहिती आपत्ती व्यवस्थान प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील काश्तिगड परिसरातही पूर आला. ढगफुटीमुळे परिसरातील अनेक नद्या दुथडी भरून वाहत आहे. बाधित भागांमध्ये अडकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी पर्यायी मार्गांचा शोध घेतला जात असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे.

◂ (वृत्तसंस्था)

## दहा हजार नागरिक बाधित, पाच जणांचा मृत्यू

अरुणाचल प्रदेशातील लोअर सियांग जिल्ह्यात ढगफुटी आणि भूस्खलनाने मोठे नुकसान झाले असून, १४ गावांतील दहा हजार नागरिक या आपत्तीमुळे प्रभावित झाले आहेत. अचानक आलेल्या पुरात पाच जण वाहून गेले असून, त्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले. अनेक ग्रामस्थांना घरे सोडून शेतातील तात्पुरत्या झोपड्यांमध्ये आश्रय घ्यावा लागत आहे. पुरामुळे पाणीपुरवठा व्यवस्था, वीज खांब आणि विद्युत वाहिन्याही नष्ट झाल्या. जिल्हा प्रशासन, भारतीय सैन्य, भारत-तिबेट सीमा संघटना (बीआरओ), राज्य पोलिसाचे युद्धपातळीवर बचाव व मदतकार्य सुरू आहे.

## शेकडो गावांना पुराचा वेढा

हिमाचलच्या चंबा जिल्ह्यात ढगफुटीमुळे अनेक नद्यांना पूर आला, पर्यायाने शेकडो गावांचा संपर्क तुटला आहे. सालुनी उपविभागातील लानोट आणि फागडोग गावांतील अनेक घरे ढिगाऱ्याखाली गाडली गेली. ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. भूस्खलनामुळे चंबा-तिसा मुख्य रस्ता बंद झाला आहे.

## ईशान्य भारताला पावसाचा तडाखा

ईशान्य भारतात सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे आसाम, मेघालय, सिक्कीम आणि नागालॅण्ड या राज्यांमध्ये पूर आणि भूस्खलनाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. संपर्क तुटलेल्या गावांमध्ये हेलिकॉप्टरद्वारे मदत पोहोचविली जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली.



## लाहोरमध्ये शिकवणी केंद्राचे छत कोसळले; १४ मुलांचा मृत्यू

**लाहोर, १ जुलै**

पाकिस्तानातील लाहोर शहरात बांधकाम सुरू असलेल्या एका इमारतीमधील खाजगी शिकवणी केंद्राचे छत कोसळले. मुले वर्गात बसली असताना अचानक छत कोसळल्यामुळे ते ढिगाऱ्याखाली दबले. या अपघातात १४ शाळकरी मुलांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. ही घटना मंगळवारी सायंकाळी ईदगाह बस्ती परिसरात घडली. घटनेनंतर तत्काळ बचाव आणि मदतकार्य राबवून ढिगाऱ्याखालून २० जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

लाहोरचे डीआयजी ऑपरेशन्स फैसल कामरान यांनी सांगितले की, ही इमारत दाट लोकवस्तीच्या निवासी भागात होती. ढिगाऱ्याखालून १४ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. शिकवणी केंद्र असलेल्या इमारतीच्या एका भागाचे बांधकाम सुरू होते. छत कोसळले तेव्हा कामगार तिथेच काम करीत होते. याप्रकरणी कंत्राटदारासह दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

◂ (वृत्तसंस्था)

# अमेरिका करणार भारताचा विश्वासघात!

## दोन्ही देशांत फूट पाडण्याचा चीनच्या मुखपत्राचा प्रयत्न

**बीजिंग, १ जुलै**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत-प्रशांत कमांडचे नाव बदलून प्रशांत कमांड ठेवण्याच्या निर्णयावर चिनी कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र 'ग्लोबल टाइम्स'ने टोला लगावला आहे. चीन या संधीचा फायदा घेऊन भारत आणि अमेरिका यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहे. ग्लोबल टाइम्सने यावेळी भारताला कठोर धडा मिळणार का?, या शीर्षकाचा एक लेख प्रकाशित केल्यामुळे अमेरिकेसोबतच्या संबंधांबद्दल भारताच्या धोरणात्मक समुदायात चिंता वाढत आहे.

ग्लोबल टाइम्समधील या लेखात भारतीय घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवणारे लिऊ नावाचे एक चिनी निरीक्षक म्हणाले, अमेरिकेसाठी 'इंडो-पॅसिफिक कमांड' या नावातून"इंडो' हा शब्द काढून टाकणे ही स्पष्टपणे एक अंतर्गत बाब आहे.ज्यात भारताच्या मताचा विचार करण्याची आवश्यकता नाही. तथापि, भारतीय बाजूने व्यक्त केलेली निराशा हे दर्शवते की, नवी दिल्लीतील काहींना



वॉशिंग्टनकडून नेहमीच अवास्तव अपेक्षा होत्या.

**भारतीयांचा आदर अमेरिकेला समजलाच नाही**

या लेखात वॉशिंग्टनमधील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांच्या भारत-प्रशांतचे नाव बदलल्याने काही फरक पडणार नाही, या विधानाचाही उल्लेख आहे. या संदर्भात, ग्लोबल टाइम्सने लिहिले की, चिनी निरीक्षक लिऊ यांच्या मते, लेटरहेडवर कोणाचे नाव आहे याने काही फरक पडत नाही.या अमेरिकन राजदूतांच्या वक्तव्यावरून हे स्पष्टपणे दिसून येते की, भारतीयांसाठी आदराचे प्रचंड महत्त्व त्यांना पूर्णपणे समजलेले नाही.

**अमेरिकेचे भारताच्या विरोधात अनेक निर्णय**

ग्लोबल टाइम्सच्या वृत्तानुसार, अमेरिकेने भारताच्या विरोधात अनेक निर्णय घेतले आहेत. ट्रम्प प्रशासनाने भारतावर ५० टक्क्यांपर्यंत शुल्क लादले आहे. भारताने व्यापार करार करण्याचा प्रयत्न केला असता, अमेरिकेने आपली भूमिका बदलण्यास नकार दिला आहे.

◂ (वृत्तसंस्था)

### आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीही मित्र नसतो

ग्लोबल टाइम्समधील हा लेख उपहासाने सांगतो की, भारताच्या वॉशिंग्टनकडून नेहमीच अवास्तव आणि अवास्तव अपेक्षा असतात. अमेरिका केवळ स्वतःच्या व्यावसायिक आणि राष्ट्रीय हितांची काळजी घेते. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीही कोणाचा मित्र नसतो आणि अमेरिकेवर आंधळेपणाने विश्वास ठेवता येणार नाही, असेही त्यात नमूद केले आहे.



**सोलापूर : विमानतळ ते आसरा चौक व्हीआयपी रोडवरील रस्त्याचे काम सुरु आहे. एका बाजूने वाहतुक सुरू असल्यामुळे आसरा चौकात ट्राफिक जाम होत आहे. बुधवारी ड्रोनद्वारे टिपलेले छायाचित्र.**

**(छाया : केवल तिवारी)**

## चित्रपट वार्ता

### रजनीकांत 'कबाली'मुळे 'हिट'



**मुंबई :** रजनीकांत हे केवळ दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेते नाहीत, तर सर्वाधिक मानधन घेणाऱ्या कलाकारांपैकीही एक आहेत. त्यांच्या कारकीर्दीतील अनेक चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई केली असून, त्यापैकी २०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कबाली'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी आपल्या निर्मिती खर्चाची भरपाई करून एक वेगळाच इतिहास रचला होता. १९७५ मध्ये अभिनय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या रजनीकांत यांनी तामिळ चित्रपटसृष्टीपासून हिंदी चित्रपटांपर्यंत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. २२ जुलै २०१६ रोजी प्रदर्शित झालेला 'कबाली' हा त्यांच्या कारकीर्दीतील सर्वाधिक गाजलेल्या चित्रपटांपैकी एक मानला जातो. या चित्रपटात त्यांनी 'कबाली' ही प्रभावी व्यक्तिरेखा साकारली होती. त्यांचा स्टायलिश लूक, दमदार ॲक्शन आणि प्रभावी अभिनय यामुळे चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनापूर्वीच या चित्रपटाची मोठ्या प्रमाणावर चर्चा रंगली होती. 'कबाली'चा निर्मिती खर्च सुमारे ९० कोटी रुपये होता. मात्र, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर पहिल्याच दिवशी जगभरातून ९०.५० कोटी कमाई त्याने केली होती.

### गिरिजा ओकचे वडिलांसोबत भावुक नाते



**मुंबई :** निळ्या साडीतील फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मराठमोळी अभिनेत्री गिरिजा ओक सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सध्या ती 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटामुळेही चर्चेत असून, नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने वडील गिरीश ओक यांच्यासोबत भावुक नाते असल्याचे सांगितले. गिरिजा लहान असताना आई-वडिलांचा घटस्फोट झाला होता. त्यानंतर गिरीश ओक यांनी दुसरा संसार थाटला. या पृष्ठभूमीवर वडिलांशी असलेल्या नात्याबद्दल बोलताना गिरिजाने बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. ती म्हणाली, मी लहान असताना बाबांची सर्वांत मोठी फॅन होती. त्यांची जवळपास सगळी नाटके मी पाहिली आहेत. अगदी पाठ होईपर्यंत त्यांची नाटके पाहिली आहेत. बाबांचे काम पाहत मी मोठी झाले. पण आई-वडील विभक्त झाल्यानंतर मी माझ्या आईसोबत राहू लागले. त्यामुळे बाबांसोबत माझा फारसा संपर्क आला नाही.

### 'इक्का'च्या ट्रेलरने उडवली खळबळ



**मुंबई :** 'धुरंधर'मध्ये अक्षय खन्नाने साकारलेल्या रेहमान डकैतच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर आता पुन्हा एकदा अक्षय खन्ना चर्चेत आला आहे. यावेळी तो 'इक्का' या आगामी चित्रपटात एका अत्यंत दमदार भूमिकेत दिसणार असून, चित्रपटाचा नुकताच प्रदर्शित झालेला ट्रेलर प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण करून गेला आहे. सनी देओल आणि अक्षय खन्ना या दोन प्रभावी अभिनेत्यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाचा ट्रेलर पाहून समाज माध्यमावर प्रतिक्रियांचा वर्षाव सुरू झाला आहे. ट्रेलरमध्ये जबरदस्त सस्पेन्स आणि अनपेक्षित ट्विस्ट पाहायला मिळतात. अक्षय खन्नाचा लूक आणि त्याचा अभिनयाचा अंदाज पुन्हा एकदा प्रभावी ठरत असल्याचे ट्रेलरवरून स्पष्ट होते. याचबरोबर सनी देओलचा दमदार स्क्रीन प्रेझेन्सही लक्ष वेधून घेतो. 'इक्का' या चित्रपटाद्वारे सनी देओल ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करीत असून, तो या चित्रपटात वकील अर्जुन मेहराच्या भूमिकेत दिसणार आहे.

## शस्त्रतस्करीतील दोघांना अटक

**चंदीगढ :** अमृतसरमध्ये सीमापार शस्त्र तस्करी करणाऱ्या एका टोळीचा भंडाफोड करीत पंजाब पोलिसांनी बुधवारी दोन जणांना अटक केली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून सात अत्याधुनिक पिस्तुले आणि ४० जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. समाज माध्यमाचा वापर करीत आरोपी विदेशातील तस्करांच्या संपर्कात होते, अशी माहिती पोलिस आयुक्त गुरप्रीतसिंग भुल्लर यांनी दिली. त्यांच्याकडून गुन्हेगारी टोळ्यांना शस्त्रे पुरवण्यासाठी सीमापार मार्गांनी शस्त्रसाठा मिळवत होते.

# इराणवर पुन्हा हल्ला करणार

### बेंजामिन नेतान्याहू यांचा इशारा

**तेल अवीव, १ जुलै**



अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या शांतता कराराची अंमलबजावणी करण्यासाठी कतारची राजधानी दोहा येथे चर्चा सुरू असताना इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणला हल्ल्याचा इशारा दिला. दहशतवादी हिजबुल्लाहचे अस्तित्वात असेपर्यंत इस्रायली सैन्य लेबनॉन सोडणार नसल्याचे आणि अमेरिकेशी इराणच्या झालेल्या कराराशी कोणताही संबंध नसल्याचा दावा त्यांनी केला.

इराणने आपला अणुकार्यक्रम सोडला नाही आणि क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम सुरूच ठेवल्यास त्यांच्यावर पुन्हा हल्ले केले जातील. पुन्हा संघर्ष झाल्यास विध्वंस होईल, असा इशारा नेतान्याहू यांनी इस्रायलच्या सरकारी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीतून दिला. इस्रायलच्या सुरक्षेला धोका कदापि सहन केला जाणार नाही. अमेरिका-इराणमध्ये झालेल्या कराराशी इस्रायलचा संबंध नाही, अमेरिकेची आणि इस्रायलची उद्दिष्टे वेगळी आहेत. देशाच्या सीमा सुरक्षित करण्याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. इराण हिजबुल्लाहचा वापर इस्रायलला लक्ष्य करण्यासाठी करतो हे जगाला माहीत आहे. त्यांना आर्थिक आणि शस्त्राची मदत इराणकडून होते, त्यामुळे हिजबुल्लाहचे अस्तित्व संपल्याशिवाय लेबनॉनमधून इस्रायली सैन्य माघार घेणार नाही. इराणविरुद्धच्या पूर्वीच्या लष्करी संघर्षावेळी इस्रायल संभाव्य अणुबॉम्बच्या धोक्यापासून वाचला. इस्रायल कोणत्याही परिस्थितीत इराणला अण्वस्त्रे मिळवू देणार नाही.

◂ (वृत्तसंस्था)

## दहशतवाद्यांना मदत; हाजी लतीफला अटक

**श्रीनगर, १ जुलै**

अमरनाथ यात्रेपूर्वी सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. जम्मू-काश्मीरमधील कठुआ पोलिसांनी रात्रभर राबवलेल्या मोहिमेत दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या हाजी लतीफला अटक केली. हाजी लतीफ दोन दशकांपेक्षा जास्त काळ पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबासाठी प्रमुख मदतगार म्हणून कार्यरत होता. लतीफवर पाकिस्तानी दहशतवाद्यांना भारतीय सीमेत घुसखोरी करण्यास आणि सुरक्षा दलांवरील हल्ल्याचा आरोप आहे.

◂ (वृत्तसंस्था)

# अभिषेक बॅनर्जींना झटका

### आवाजाच्या नमुन्याला स्थगिती देण्यास नकार

**कोलकाता, १ जुलै**

तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांना कलकत्ता उच्च न्यायालयाने झटका दिला. प्रक्षोभक वक्तव्यांशी संबंधित एका प्रकरणाच्या तपासादरम्यान त्यांच्या आवाजाचा नमुना घेण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेत न्यायालयाने तत्काळ हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

सुनावणीदरम्यान न्या. तीर्थंकर घोष यांनी टिप्पणी केली की, तपासासाठी काय आवश्यक आहे आणि काय नाही हे ठरवणे न्यायालयाचे काम नाही.तर तो तपास यंत्रणेचा विशेषाधिकार आहे. तपास यंत्रणेने तपासादरम्यान कोणते पुरावे गोळा करावेत, हे न्यायालय ठरवू शकत नाही. त्यानंतर न्या. घोष यांनी या प्रकरणाच्या सुनावणीतून स्वतःला दूर केले आणि याचिका मुख्य न्यायाधीशांकडे पाठवली.

हे प्रकरण विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अभिषेक बॅनर्जी यांनी केलेल्या कथित प्रक्षोभक वक्तव्यांवरून दाखल एफआयआरशी निगडित आहे. याचा तपास पश्चिम बंगाल सीआयडी करत आहे.

◂ (वृत्तसंस्था)



# उपजीविकेची चिंता, सहभागाचा कंटाळा



**ग्रामसभांमधील अत्यल्प सहभागाची कारणे अहवालातून समोर**

**नवी दिल्ली, १ जुलै**

उपजीविकेची चिंता, व्यवसायाचा ताण आणि सहभागी होण्याचा कंटाळा ही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लोकांची ग्रामसभांमध्ये सहभागी न होण्याची कारणे समोर आली आहे. कामाशी संबंधित अडचणी हा सहभागातील सर्वात मोठा अडथळा असल्याचे राष्ट्रीय अभ्यास अहवालात म्हटले आहे.

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील ग्रामपंचायतीत होणाऱ्या मासिक ग्रामसभेत लोकांचा अत्यल्प सहभाग या विषयावरील अहवालाचे मंगळवारी राजधानी दिल्ली येथे नीती आयोगाचे सदस्य डॉ. आर. बालसुब्रमण्यम यांच्या हस्ते आणि पंचायती राज मंत्रालयाचे विवेक भारद्वाज यांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले. अहवालात उपजीविकेची चिंता, व्यावसायिक ताण आणि सभेत जाण्यासाठी येणारा कंटाळा हे सर्वांत मोठे अडथळे अभ्यासातून समोर आले. ग्रामसभेत होणाऱ्या निर्णयाचा व्यापक परिणाम होत नसल्याचे लक्षात आल्याने बहुतांश नागरिकांनी त्यात सहभागी होणे टाळल्याचेही समोर आले.

राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायत राज संस्थेने केलेल्या अभ्यासात, २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील २१३ जिल्ह्यांतील ४०० ग्रामपंचायतींमधील सुमारे ७,७९० लोकांची मते नोंदवली. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या जवळपास निम्या लोकांनी (४७ टक्के) मागील वर्षी फक्त एक किंवा दोन ग्रामसभांना हजेरी लावली होती. जवळपास ९४ टक्के लोकांनी ग्रामसभेच्या बैठकांविषयी माहिती असल्याचे सांगितले आणि ८३ टक्के जणांना त्यांच्या सहभागाच्या हक्कांविषयी माहिती होती. तथापि, केवळ ५९ टक्के जणांना गणपूर्ती आणि कार्यपद्धतीच्या आवश्यकता समजल्या होत्या, यावरून असे दिसून येते की केवळ जागरूकतेमुळे माहितीपूर्ण सहभाग होईलच असे नाही.

**कामातील अडथळे**

५५ टक्क्यांपेक्षा जास्त लोकांनी ग्रामसभेत अनुपस्थित राहण्यासाठी उपजीविका आणि व्यावसायिक दबाव हे प्रमुख अडथळे असल्याचे सांगितले. ग्रामसभेच्या बैठकांना उपस्थित राहू न शकणारे बहुतांश लोक रोजंदारी मजूर किंवा उपजीविकेच्या शोधात स्थलांतरित झालेले लोक होते. सभांमध्ये सहभागी होण्याचा कंटाळा येणे ग्रामसभेच्या प्रक्रियेचे महत्त्व कमी करीत असल्याचे अहवालात म्हटले आहे. सरकारने केवळ उपस्थितीवरच नव्हे, तर अभ्यासात ओळखल्या गेलेल्या अडथळ्यांना दूर करण्यासाठी अधिक मजबूत स्थानिक उत्तरदायित्व यंत्रणा सक्षम करणाऱ्या कार्यप्रणाली स्थापित करण्यावरही लक्ष केंद्रित करावे, अशी सूचना अहवालातून करण्यात आली.

◂ (वृत्तसंस्था)

### पारदर्शकतेचा अभाव

४५ टक्के लोकांनी पारदर्शकतेचा अभाव ही सर्वांत मोठी चिंता असल्याचे सांगितले. यानंतर परिणामांचा अभाव (४२ टक्के), विश्वासार्ह मुद्द्यांचा अभाव (३३ टक्के), राजकीय हस्तक्षेप (२८ टक्के) आणि कमकुवत तक्रार निवारण (१६ टक्के) या बाबीही समोर आल्या. ग्रामसभेत तक्रारी स्वीकारल्या जात असल्याचे ८७ टक्के नागरिकांचे म्हणणे असले तरी, १४ टक्के लोकांनी तक्रारीचे तत्काळ निवारण होत नसल्यावर चिंता व्यक्त केली. तक्रारी ऐकल्या जाणे आणि त्यांचे निराकरण होणे यातील तफावत हा दीर्घकालीन विश्वास आणि बैठकांना उपस्थित राहण्याची इच्छा कमी करणारा घटक असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# कोवळ्या पावलांची दशा आणि दिशा

काही वर्षांपूर्वी नागपुरात घडलेल्या युग चांडक अपहरण आणि खून प्रकरणात मुख्य सूत्रधाराला मदत करणारा अल्पवयीन मुलगा होता. अमरावती, छत्रपती संभाजीनगर येथे वर्चस्वाच्या वादात चक्क मुलांच्या टोळ्यांनी एकमेकांवर प्राणघातक हल्ले केले. अलिकडे मुंबई आणि ठाण्याच्या उपनगरांमध्ये चोऱ्या आणि घरफोड्या करणाऱ्यांच्या झुंडी पोलिसांनी उद्ध्वस्त केल्या. त्यांचे संपूर्ण जाळे केवळ १४ ते १७ वयोगटातील मुलांच्या बळावर चालत होते. लॉरेन्स बिश्नोई या तस्कर 'गँगस्टर्स'च्या नावाचा वापर करून खंडणी मागण्याच्या गुन्ह्यांमध्येही शाळकरी मुलांचा सहभाग दिसला. एवढेच नव्हे, तर दोन वर्षांपूर्वी चंद्रपूरनजीकच्या दुर्गापूर रस्त्यावर गुन्हेगारांच्या टोळीने एका तरुणाचे शिर धडावेगळे केले होते. ते भयाण दृश्य बघणाऱ्यांना एकीकडे घाम फुटला असताना, गुन्हेगारांना सोबत करणारी कोवळी मुले त्या मुंडक्याचा फुटबॉल करून खेळली! अगदी असेच चित्रण नुकत्याच प्रदर्शित 'धुरंधर-२' मध्ये पाहायला मिळाले. समाजात जे घडते ते चित्रपटातून उमटते की, सिनेमात जे दिसते ते करण्याचा प्रयत्न आजची तरुणाई करते, हा वाद बाजूला सारला तरी दृक्-श्राव्य माध्यमांनी गुन्हेगारीचे असे किळसवाणे चित्रण केलेच पाहिजे का, असा प्रश्न पडतोच. चित्रपटांचा मोठा प्रभाव कोवळ्या वयावर होतो हे सत्यच. चित्रपटातील पात्रांचा आणि त्यांच्या वर्तन-वाणीचा मोठा पगडा तरुण पिढीवर आहे. 'शोले' चित्रपटातील 'गब्बर सिंग'चे 'कितने आदमी थे...' हा संवाद आत्ताच्याही पिढीला पाठ आहे. अलिकडच्या काळातील 'पुष्पा', 'अॅनिमल' यासारख्या चित्रपटांतील नायक गुन्हेगारीशी जुळलेला, उद्धट बोलणारा, वागणारा, मारहाण करणारा आणि मादक पदार्थांचे सेवन करणारा दिसला. अनेक चित्रपटांतील रक्तबंबाळ हाणामारी या मिसरूड न फुटलेल्या मुलांसमोर कोणता आदर्श ठेवणार आहे, हा मुद्दा आहेच.

या पृष्ठभूमीवर, महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात, बालगुन्हेगारी आणि तिच्या भविष्यासंदर्भात अत्यंत दूरगामी परिणाम करू शकेल असा निर्णय जाहीर करण्यात आला. संघटित गुन्हेगारी करणाऱ्यांकडून किंवा ड्रग्ज तस्करांकडून अल्पवयीन मुलांचा वापर केला गेल्यास थेट 'मकोका'सारखा कडक कायदा लावण्याची ऐतिहासिक घोषणा झाली. सोबतच, बालगुन्हेगारांची वयोमर्यादा सध्याच्या १८ वर्षांवरून १६ वर्षे करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्याचा मानस राज्य सरकारने व्यक्त केला. येणारे कायदे आपले काम करतीलच, परंतु समाज म्हणूनही जबाबदारी स्वीकारण्याची वेळ आली आहे. ज्या वयात मुलांच्या हातात पुस्तक, खेळणी आणि मनात उज्ज्वल भविष्याची स्वप्ने हवीत, त्याचवेळी त्यांची कोवळी पावले गुन्हेगारी विश्वाकडे वळत आहेत. काही वर्षांपूर्वी दिल्लीत घडलेले अत्यंत क्रूर निर्भया प्रकरण असो, की अलिकडच्या काळात पुणे शहरातील 'हिट अँड रन' प्रकरण असो; या घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग आणि त्यानंतर कायद्यातील पळवाटा शोधण्याची वृत्ती थक्क करणारी आहे. नागपूर-पुणे आणि लातूर येथे गुंड टोळ्यांनी अल्पवयीन मुलांच्या हातात दिलेले कोयते आणि धारदार शस्त्र किंवा मुंबई-ठाणेसारख्या भागात अमली पदार्थांच्या तस्करीत वाहक म्हणून होणारा त्यांचा वापर समाजासाठी घातक आहे. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो'च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात दरवर्षी खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग सरासरी १० ते १२ टक्के वेगाने वाढत आहे. सराईत गुन्हेगार अगदी जाणीवपूर्वक अशा कोवळ्या मुलांचा वापर करतात. कारण बाल न्याय कायद्यानुसार, या मुलांना कठोर शिक्षा होणार नाही आणि ते सुधारगृहाच्या नावाखाली लवकर जामिनावर बाहेर येतील, हे त्यांना कळते. राज्य सरकारने या समस्येचे संपूर्ण वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्याची घोषणा केली आहे, ती देखील स्वागतार्ह आहे.

निष्पाप भासणारी ही कोवळी मुले गुन्हेगारीच्या दलदलीत ओढली जातात. त्यांचा हा प्रवास अचानक घडत नाही, तर तो एका पद्धतशीर सामाजिक आणि मानसिक साखळीचा परिणाम असतो. गुन्हेगारी जगताच्या पहिल्या पायरीवर 'आकर्षण' आणि 'उदात्तीकरण' असते. अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर 'भाईगिरी'च्या चित्रफिती मोठ्या दिमाखात फिरतात. त्या छोट्या मुलांच्या मनावर गारुड करतात. महागड्या गाड्या, हातातली शस्त्रे, दागिन्यांचा लखलखाट, सोबतीला वाजणारे 'डॅशिंग' संगीत आणि शेकडो लोकांची उठबस पाहून संवेदनशील वयातील मुलांना 'इज्जत' आणि 'ताकद' मिळवण्याचा हाच सर्वांत सोपा मार्ग आहे, असे वाटू लागते. शाळा किंवा महाविद्यालयाबाहेरील टपऱ्या, पानपट्ट्या अथवा निर्जन कोपरे अशा मुलांचे अड्डे बनतात. सुरुवातीला फॅशन किंवा मित्रांच्या आग्रहास्तव सिगारेट ओढणे, गुटखा खाणे आणि पुढे ड्रग्ज, एमडीसारख्या अंमली पदार्थांचे व्यसन या मुलांना जडते. एकदा का या व्यसनाची चटक लागली की, ते पूर्ण करण्यासाठी रोज पैशांची गरज भासू लागते. या हतबलतेच्या टप्प्यावर गुन्हेगारी टोळ्यांचे सूत्रधार सक्रिय होतात. ते या मुलांना ड्रग्ज किंवा पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पाकीटमारी, चोऱ्या करण्याचे, अंमली पदार्थांची पाकिटे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवण्याचे काम देतात. अगदी सारीच मुले या मार्गावर जात नाहीत. पण, ज्या मुलांच्या घरात सततचे वाद असतात, आर्थिक चणचण असते किंवा पालकांचे मुलांच्या आयुष्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष असते, त्यांच्या बाबतीत असे घडण्याची शक्यता अधिक असते. जी मुले मानसिकदृष्ट्या अधिक असुरक्षित असतात, घरातून प्रेम, कौतुक किंवा संवाद न मिळाल्यामुळे जी मुले बाहेर आपुलकी शोधत असतात, त्यांचे असे वाया जाणे स्वाभाविक ठरते. त्यांच्या भावनिक स्थितीचा गैरफायदा घेऊन गुन्हेगारी टोळ्या त्यांना लक्ष्य करतात. एकदा मुलाच्या हाताला गुन्हेगारीचा पैसा लागला आणि कायद्याची पहिली अटक किंवा बालसुधारगृहाची वारी झाली, की त्यांच्या मनातली पोलिसांची आणि कायद्याची भीती नष्ट होते. उलट, सुधारगृहातून बाहेर आल्यावर ते 'भाई' म्हणून मिरवतात. पुढच्या टप्प्यावर ही मुले केवळ वाहक न राहता, टोळीच्या लढाईत थेट कोयते, तलवारी चालवायला धजावत नाहीत.

बालगुन्हेगारी ही जन्मजात नसून, ती व्यवस्थेने निर्माण केलेली एक समस्या आहे. 'मकोका'चा बडगा उगारून त्यावर नियंत्रण येईलही. पण जोपर्यंत या गुन्हेगारी विश्वाच्या प्रवेशाची साखळी तोडली जात नाही, तोपर्यंत ही दलदल संपुष्टात येणार नाही. या विदारक परिस्थितीवर मात करण्यासाठी बहुआयामी आणि प्रतिबंधात्मक उपायांची गरज आहे. घरापासून सुरुवात करून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राबवावयाची जनजागृती मोहीम औपचारिक अधिक व्यापक झाली पाहिजे. प्रत्येक शिक्षण संस्थेत व्यावसायिक समुपदेशक नियुक्त केले जावेत, जे विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीतील नकारात्मक बदल वेळेत ओळखून त्यांना मानसिक आधार देतील. पालकांनी आपल्या पाल्याच्या 'डिजिटल अॅक्टिव्हिटी'वर आणि मित्र परिवारावर लक्ष ठेवले पाहिजे. त्यांच्यात नैतिक मूल्य रुजवले पाहिजे. पोलिसांनी संवेदनशील आणि धोकादायक परिसरांमध्ये नियमित गस्त दिली पाहिजे. बालसुधारगृहांची सद्यःस्थिती बदलून तेथे पुनर्वसन, समुपदेशन आणि सकारात्मक कौशल्य विकास कार्यक्रम राबवले गेले पाहिजेत. एकूण काय तर, कौटुंबिक संस्कार, मूल्याधारित शिक्षण आणि सजग समाज या त्रिसूत्रीच्या बळावर आपण आपल्या लहानग्यांना गुन्हेगारीच्या या भीषण खाईत लोटण्यापासून वाचवू शकू. अन्यथा, ज्यांचे कोडकौतुक करायचे, त्यांना कोडग्याचे फटके दिले जाताना आपल्याला हताशपणे पाहत राहावे लागेल. ■

## श्रद्धांजली

**प्रा. मधुकर कुलकर्णी**

# रंगभूमीवरचा प्रयोगशील पडदा खाली



साठच्या दशकात मराठी प्रायोगिक रंगभूमीचा उदय होत असताना विजया मेहता या चळवळीच्या अग्रभागी होत्या. 'रंगायन'च्या स्थापनेत त्यांनी विजय तेंडुलकर, डॉ. श्रीराम लागू, अरविंद देशपांडे यांसारख्या समकालीन रंगकर्मींबरोबर नवी वाट निर्माण केली. त्यांनी मराठी रंगभूमीला जागतिक नाट्यपरंपरेची ओळख करून दिली. भारतीय लोकपरंपरा, संस्कृत नाट्यपरंपरा आणि मराठी संस्कृती यांच्या आधारावर त्यांनी आधुनिक रंगभाषा उभी केली. म्हणूनच त्यांच्या प्रयोगांमध्ये जागतिकतेचा विस्तार आणि स्थानिकतेची ऊब एकाच वेळी अनुभवायला मिळते. दिग्दर्शिका म्हणून त्यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे कलाकारांवरील विश्वास. त्यांनी नेपथ्य, प्रकाशयोजना किंवा तांत्रिक चमत्कारांपेक्षा अभिनेत्याच्या अंतःशक्तीवर भर दिला. त्यांच्या तालमी कठोर असत; पण त्या कलाकाराला मोडण्यासाठी नव्हे, तर घडवण्यासाठी असत.

विजयाताईंना अनेकांनी 'बाई' म्हणून आदराने संबोधले. त्या गुरू होत्या; पण गुरुपदाचा गाजावाजा करणाऱ्या नव्हत्या. त्या कलाकारांवर स्वतःची छाप लादत नसत. प्रत्येक कलाकाराच्या व्यक्तिमत्त्वातून त्याची स्वतंत्र अभिव्यक्ती उमलावी यासाठी त्या प्रयत्नशील असत. म्हणूनच त्यांच्याबरोबर काम केलेल्या अनेक कलाकारांनी त्यांच्या निधनानंतर व्यक्त केलेली भावना सारखीच होती. त्या आवाज चढवत नसत, दर्जा उंचावत असत. त्यांनी स्त्रीपात्रांकडे पाहण्याची दृष्टीही बदलली. त्यांच्या कलाकृतींमध्ये स्त्री ही केवळ कथानकाला पूरक व्यक्ती नव्हती, तर स्वतःचे विचार असलेली, निर्णय घेणारी, संघर्ष करणारी आणि प्रश्न विचारणारी व्यक्ती होती. त्या काळात ही दृष्टी धाडसी होती. रंगभूमीपुरतेच नव्हे, तर चित्रपटांमध्येही त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली. 'रावसाहेब' आणि 'पेस्टनजी'सारख्या चित्रपटांमधून त्यांनी मानवी नात्यांचे सूक्ष्म, वास्तववादी चित्रण केले. 'पार्टी'मधील त्यांच्या भूमिकेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम अभिनेत्रीचा गौरव प्राप्त झाला. दिग्दर्शिका, अभिनेत्री, निर्माती आणि प्रशिक्षक अशा विविध भूमिकांमध्ये त्यांनी आपली कलात्मक उंची कायम ठेवली. त्यांच्या कार्याला अनेक सन्मान लाभले. संगीत नाटक अकादमी पुरस्कार, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, टागोर रत्न यांसह अनेक प्रतिष्ठेचे गौरव त्यांच्या वाट्याला आले; पण त्यांचा खरा पुरस्कार कोणता, असा प्रश्न विचारला तर उत्तर पुरस्कारांच्या यादीत नाही, तर त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये, त्यांच्या प्रयोगांमध्ये आणि बदललेल्या रंगसंस्कृतीत आहे. विजयाबाईंचे आयुष्य आपल्याला आणखी एक महत्त्वाचा धडा देते. कला हा प्रसिद्धीचा शॉर्टकट नाही, तर आयुष्यभराची साधना आहे. रंगभूमीवर उभे राहण्यापूर्वी वाचन, चिंतन, निरीक्षण आणि शिस्त आवश्यक असते.

बाईंच्या प्रत्येक प्रयोगामागे अभ्यासाची वर्षानुवर्षांची मेहनत असे. त्यामुळे त्यांचे दिग्दर्शन कधीही वरवरचे वाटत नाही. त्यात आशयाची खोली आणि कलात्मक परिपक्वता कायम दिसून येते. विजयाबाई अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होत्या. त्यांनी रंगभूमीला आधुनिकता दिली; पण मुळांपासून तोडले नाही. त्यांनी कलाकार घडवले; पण व्यक्तिमत्त्वांवर स्वतःची सावली पडू दिली नाही. त्यांनी नाट्यकलेला प्रतिष्ठा दिली; पण कलेला कधीही अहंकाराचे रूप दिले नाही. त्यांच्या जाण्याने एक खुर्ची रिकामी झाली आहे; पण त्यांनी घडवलेली परंपरा अजूनही उभी आहे. विजयाबाईंनी केवळ नाटकांचे दिग्दर्शन केले नाही, तर रंगभूमीचा विचार बदलण्याचे काम केले. अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, संवाद आणि रंगभाषा यांचा एकात्म विचार करून त्यांनी मराठी नाट्यविश्वाला आधुनिकतेची नवी दिशा दिली. त्यामुळे त्या केवळ यशस्वी दिग्दर्शक नसून मराठी रंगभूमीच्या वैचारिक परिवर्तनाच्या महत्त्वाच्या शिल्पकार ठरतात.

विजयाबाईंच्या रंगप्रवासाची सुरुवात नाटकावरील नितांत प्रेमातून झाली. पारंपरिक व्यावसायिक रंगभूमीच्या चौकटीत न अडकता त्यांनी जागतिक रंगपरंपरा, भारतीय लोकनाट्य आणि आधुनिक नाट्यशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला. हा अभ्यास त्यांच्या प्रत्येक निर्मितीमध्ये जाणवतो. त्यांच्यासाठी नाटक म्हणजे केवळ मनोरंजन नव्हते तर सामाजिक वास्तव, मानवी मन आणि सांस्कृतिक मूल्यांचा शोध घेणारे प्रभावी माध्यम होते. त्यांच्या दिग्दर्शनाची सर्वांत मोठी वैशिष्ट्ये म्हणजे संयम आणि सूक्ष्मता. अनेक दिग्दर्शक भव्य नेपथ्य किंवा आकर्षक तांत्रिक साधनांवर भर देतात; परंतु विजयाबाईंनी कलाकाराचा अभिनय आणि कथानकाची अंतःशक्ती यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यामुळे त्यांच्या नाटकांमध्ये बाह्य दिखाव्यापेक्षा आशय अधिक प्रभावी ठरतो. पात्रांच्या मनातील संघर्ष, त्यांच्या नातेसंबंधांतील गुंतागुंत आणि सामाजिक परिस्थितीचे वास्तववादी चित्रण हे त्यांच्या दिग्दर्शनाचे ठळक वैशिष्ट्य मानले जाते. मराठीतील प्रायोगिक रंगभूमीच्या उभारणीत त्यांचे योगदान मोलाचे आहे. व्यावसायिक यशाच्या पलीकडे जाऊन प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारी नाटके त्यांनी सादर केली. जगभरातील श्रेष्ठ नाटककारांच्या साहित्याचा अभ्यास करून त्यांनी त्यातील आशय भारतीय आणि मराठी संदर्भात समजावून सांगितला. त्यामुळे मराठी प्रेक्षकांना जागतिक नाट्यसाहित्याची ओळख झाली आणि रंगभूमीच्या अभिव्यक्तीला नवे परिमाण मिळाले.

दिग्दर्शक म्हणून विजयाबाईंची आणखी एक जमेची बाजू म्हणजे कलाकार घडवण्याची क्षमता. कलाकार अनुभवी असो किंवा नवोदित; प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वातील वैशिष्ट्य ओळखून त्यातून सर्वोत्तम अभिनय कसा घ्यावा, हे त्यांना उत्तम प्रकारे अवगत होते. त्यांच्या तालमीत अभिनय हा केवळ संवाद म्हणण्याचा प्रकार राहत नाही, तर तो शरीरभाषा, आवाज, शांतता, हालचाली आणि भावविश्व यांचा समन्वित अनुभव बनतो. त्यामुळे त्यांच्या हातून घडलेले अनेक कलाकार पुढे मराठी आणि हिंदी रंगभूमी तसेच चित्रपटसृष्टीत उल्लेखनीय ठरले. प्रत्येक प्रयोगशील रंगकर्मीमध्ये, प्रत्येक जिज्ञासू विद्यार्थ्यामध्ये, प्रत्येक प्रामाणिक दिग्दर्शकामध्ये आणि प्रत्येक विचारशील प्रेक्षकामध्ये विजया मेहता जिवंत राहतील. रंगभूमीवरील पडदा खाली आला आहे; पण त्यांनी उजळवलेला प्रकाश अजूनही मंचावर पसरलेला आहे. ■

(लेखक रंगकर्मी असून राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक पटकावले आहे.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# जवानांच्या पाठीवर शाबासकीची थाप!

गडचिरोलीचा उल्लेख झाला की, काही वर्षांपूर्वीपर्यंत डोळ्यासमोर यायचे ते नक्षलवादाचे भयावह चित्र. दाट जंगल, अधूनमधून होणारे स्फोट, सुरक्षा दलांवरील हल्ले आणि भीतीच्या छायेत जगणारे सामान्य नागरिक! जवळपास चार दशकांहून अधिक काळ माओवादी हिंसाचाराने गडचिरोलीसह संपूर्ण पूर्व विदर्भाच्या विकासाला खीळ घातली. विकासाच्या प्रत्येक उपक्रमाला विरोध, निरपराध नागरिकांची हत्या, सरकारी मालमत्तेची नासधूस व आदिवासी समाजाची दिशाभूल करून माओवाद्यांनी या परिसराला अस्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र आज परिस्थिती बदलत आहे. गडचिरोलीची ओळख आता नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून नव्हे, तर नक्षलवादावर प्रभावी मात करणारा जिल्हा म्हणून निर्माण होत आहे.

या परिवर्तनामागे केवळ शस्त्रबळ नाही, तर दूरदृष्टी, संयम आणि लोकाभिमुख पोलिस व्यवस्था आहे. सुरुवातीच्या काळात नक्षलवाद्यांच्या बंदुकीला उत्तर देण्यासाठी सुरक्षा दलांनाही कठोर कारवाया कराव्या लागल्या. परंतु काळानुसार गडचिरोली पोलिसांनी एक वेगळी वाट स्वीकारली. परिणामी अनेक माओवादी कार्यकर्त्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून आत्मसमर्पणाचा पर्याय स्वीकारला. बंदुकीपेक्षा विश्वास अधिक प्रभावी ठरतो, हे गडचिरोली पोलिसांनी कृतीतून दाखवून दिले.

अलिकडेच गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाने संयुक्त कारवाईत माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त केला. गुप्त माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या या धाडसी मोहिमेत मोठ्या प्रमाणावर लेथ मशीन, रायफल बॅरल, बीजीएल पाईप्स, लोखंडी साहित्य आणि शस्त्रनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले. ही कारवाई केवळ साहित्य जप्त करण्यापुरती मर्यादित नाही; तर माओवादी संघटनेच्या भविष्यातील हिंसक कारवायांच्या कण्यावरच घाव घालणारी आहे. या उल्लेखनीय यशाची दखल स्वतः मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाने सार्वजनिकपणे गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय सुरक्षा दलाच्या जवानांचे अभिनंदन केले. प्रत्यक्ष जीव धोक्यात घालून जंगलात रात्रंदिवस काम करणाऱ्या जवानांसाठी ही शाबासकी केवळ औपचारिक नव्हती, तर त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचा सन्मान करणारी होती. मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडताना आणि गृहमंत्री म्हणून पोलिस दलाचे नेतृत्व करताना जवानांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारणे, त्यांच्या मनोबलात मोठी भर घालणारे ठरते. खरे तर कोणत्याही सुरक्षा दलासाठी शस्त्रसामग्री, प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान जितके महत्त्वाचे असते, तितकेच महत्त्वाचे असते वरिष्ठ नेतृत्वाकडून मिळणारे प्रोत्साहन. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात कुटुंबापासून दूर राहून कठीण परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या जवानांसाठी मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी व्यक्त केलेले कौतुक ही मोठी प्रेरणा आहे. अशा शब्दांमुळे केवळ एका कारवाईचा गौरव होत नाही, तर संपूर्ण पोलिस दलाला अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळते. त्यामुळे या अभिनंदनाचे महत्त्व केवळ राजकीय नाही, तर प्रशासकीय आणि मानसिकदृष्ट्याही मोठे आहे. केंद्र सरकारने देश नक्षलमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्या दिशेने गडचिरोली पोलिसांनी सातत्याने केलेले प्रयत्न आता यशस्वी होताना दिसत आहेत. अनेक कुख्यात नक्षलवादी ठार झाले, अनेकांनी आत्मसमर्पण केले आणि उरलेल्या संघटनात्मक जाळ्यावर सातत्याने प्रहार सुरू आहेत. यामध्ये स्थानिक नागरिकांचे सहकार्य आणि पोलिसांवरील वाढता विश्वास ही सर्वांत मोठी जमेची बाजू ठरली आहे. हीच खरी गडचिरोलीच्या यशोगाथेची ताकद आहे.

हिंसाचाराच्या सावटातून विकासाच्या प्रकाशाकडे वाटचाल करणाऱ्या गडचिरोलीने संपूर्ण देशासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली पोलिसांच्या या कामगिरीची घेतलेली दखल आणि जवानांच्या पाठीवर मारलेली कौतुकाची थाप ही केवळ अभिनंदनाची औपचारिकता नाही; तर राज्य शासन आपल्या सुरक्षा दलाच्या पराक्रमामागे ठामपणे उभे असल्याची ठोस ग्वाही आहे. अशा गौरवामुळे जवानांचे मनोबल निश्चितच उंचावते आणि गडचिरोलीला कायमस्वरूपी शांतता, सुरक्षितता आणि विकासाच्या दिशेने नेण्याचा निर्धार अधिक बळकट होतो. अशा धाडसी जवानांना आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या नेतृत्वाला मनापासून सलाम. ■

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# खडगे आणि विरोधी पक्षनेतेपद



राज्यसभेचे सदस्य म्हणून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी सोमवारी शपथ घेतली आणि लगेच त्यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून फेरनियुक्ती झाली. खडगे यांच्याआधी काँग्रेसचेच गुलाम नबी आझाद राज्यसभेतील विरोधी पक्षनेते होते. राज्यसभा सदस्य म्हणून आझाद यांचा कार्यकाळ संपल्यानंतर खडगे यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड झाली. १६ फेब्रुवारी २०२१ ला खडगे पहिल्यांदा विरोधी पक्षनेते झाले. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. खडगे यांच्याकडे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद अशी दोन प्रमुख पदे आहेत. त्यामुळे यावेळी काँग्रेस राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून नव्या नेत्याची निवड करेल, असे सर्वांना वाटत होते. राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपदावर डोळा ठेवून असलेले किमान अर्धा डझन नेते आहेत. पण या सर्वांची पुन्हा एकदा निराशा झाली. काँग्रेसने खडगे यांच्या नेतृत्वावरच विश्वास दाखवला. याचा अर्थ काँग्रेसच्या नेतृत्वाने राज्यसभेतील काँग्रेसच्या अन्य नेत्यांवर अविश्वास दाखवला आहे. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी या पहिल्यांदाच राज्यसभेत आल्या आहेत. त्यामुळे काँग्रेसला राज्यसभेत कोणताही धोका पत्करायचा नव्हता, असे दिसते. त्यामुळे पक्षाने खडगे यांचीच विरोधी पक्षनेते म्हणून फेरनिवड केली.

राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळ संपल्यानंतर गुलाम नबी आझाद यांना काँग्रेस आपल्याला पुन्हा राज्यसभेवर पाठवेल, असे वाटत होते. पण तसे झाले नाही. काँग्रेस पक्षाने त्यांना राज्यसभेवर पाठवले नाही. त्यामुळे ते दुखावले गेले. त्यातूनच त्यांनी काँग्रेसचा राजीनामा देत जम्मू-काश्मीरमध्ये आपल्या नव्या पक्षाची स्थापना केली. काँग्रेसमधील असंतुष्टांच्या जी २३ गटाने राहुल गांधींच्या कार्यपद्धतीबद्दल नाराजी व्यक्त करणारे पत्र सोनिया गांधींना पाठवले होते, त्याचे कर्तेधर्ते आझादच होते. काँग्रेसच्या नेतृत्वाने आझाद यांना राज्यसभेवर न पाठवण्यामागे हेच एक कारण होते, असे म्हणतात. मल्लिकार्जुन खडगे यांच्या राजकीय अनुभवाबद्दल आणि क्षमतेबद्दल बोलण्याचे कारण नाही. मात्र त्यांचे आता वय झाले आहे, तसेच काही शारीरिक अडचणीही आहेत. वाढते वय आणि वाढत्या वजनामुळे शारीरिक हालचाली करण्यात त्यांना त्रास होतो. त्यामुळे काँग्रेस नव्या दमाच्या नेत्याची निवड करेल, असे वाटत असताना काँग्रेसने राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद दम लागणाऱ्या नेत्याकडे सोपवले, याचे अनेकांना आश्चर्य वाटले.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून आझाद यांचा कार्यकाळ सर्वांत मोठा म्हणावा लागेल. दोन टप्प्यात मिळून ६ वर्ष २५२ दिवस ते विरोधी पक्षनेते होते. ८ जून २०१४ ते १० फेब्रुवारी २०१५ या काळात ते पहिल्यांदा विरोधी पक्षनेते झाले. दुसऱ्या म्हणजे २३ फेब्रुवारी २०१५ ते १५ फेब्रुवारी २०२१ असा त्यांचा विरोधी पक्षनेते म्हणून जवळपास सहा वर्षांचा कार्यकाळ होता. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर गुलाम नबी आझाद हे काँग्रेसचे राज्यसभेतील पहिले विरोधी पक्षनेते म्हणावे लागतील.

खडगे विरोधी पक्षनेतेपदी आणखी एक वर्ष राहिले तर ते गुलाम नबी आझाद यांचा विक्रम सहज मोडू शकतात. खडगे यांच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या कार्यकाळात पीयूष गोयल आणि जे. पी. नड्डा सत्तापक्षाचे नेते होते. आझाद विरोधी पक्षनेते असताना अरुण जेटली आणि थावरचंद गहलोत सत्तापक्षाचे नेते होते. संपुआ सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात भाजपाचे अरुण जेटली विरोधी पक्षनेते होते. ३ जून २००९ ते २६ मे २०१४ या काळात जेटली विरोधी पक्षनेते होते. जेटली जवळपास पाच वर्ष विरोधी पक्षनेते होते. संपुआ सरकारच्या पहिल्या कार्यकाळात भाजपाचे जसवंतसिंह यांनी विरोधी पक्षनेते पद भूषवले. जसवंतसिंह यांना विरोधी पक्षनेते म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्यात १८ दिवस कमी पडले.

पंतप्रधान व्हायच्या आधी डॉ. मनमोहन सिंग यांनीही राज्यसभेतील विरोधी पक्षनेते पद भूषवले. ६ वर्ष ६४ दिवस मनमोहन सिंग विरोधी पक्षनेते होते. त्यांच्या काळात सिकंदर बख्त आणि जसवंतसिंह हे सत्तापक्षाचे नेते होते.

सत्तापक्षनेते होण्याच्या आधी सिकंदर बख्त यांनी विरोधी पक्षनेतेपदही सांभाळले. १ वर्ष २९१ दिवस ते या पदावर होते. त्यांना दुसऱ्यांदा विरोधी पक्षनेतेपद सांभाळण्याची संधी मिळाली. त्याआधी १९९२ ते १९९६ या काळात बख्त विरोधी पक्षनेते होते. काँग्रेसचे शंकरराव चव्हाण सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त ९ दिवस विरोधी पक्षनेते होते. चव्हाण यांच्यानंतर एम. एस. गुरुपदस्वामी आपल्या दुसऱ्या कार्यकाळात फक्त २३ दिवस विरोधी पक्षनेते होते. त्याआधी २४ मार्च १९७१ ते २ एप्रिल १९७२ असे जवळपास वर्षभर ते विरोधी पक्षनेते होते. पहिल्यांदा गुरुपदस्वामी यांनी संघटन काँग्रेसचे तर दुसऱ्यांदा जनता दलाचे नेते म्हणून विरोधी पक्षनेते सांभाळले. भोला पासवान शास्त्री २७ दिवस विरोधी पक्षनेते पदावर होते.

भाजपाचे लालकृष्ण अडवाणी ७७ दिवस राज्यसभेत विरोधी पक्षनेते होते. पण या काळात ते भाजपाचे नाही तर जनता पक्षाचे नेते म्हणून या पदावर होते. अडवाणी यांनी अनेक वर्ष राज्यसभेतील सत्तापक्षनेतेपद सांभाळले आहे. काँग्रेसचे कमलापती त्रिपाठी दोनवेळा राज्यसभेतील विरोधी पक्षनेते झाले. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांचा पहिला कार्यकाळ ३२२ दिवसांचा तर दुसरा कार्यकाळ १ वर्ष २९१ दिवसांचा होता.

संघटन काँग्रेसचे श्यामनंदन प्रसाद मिश्रा हे राज्यसभेतील पहिले अधिकृत विरोधी पक्षनेते म्हणावे लागतील. १८ डिसेंबर १९६९ ते ११ मार्च १९७१ या काळात ते विरोधी पक्षनेते होते. १३ मे १९५२ ते १७ डिसेंबर १९६९ या काळातील विरोधी पक्षनेतेपदाबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. पुंजला शिवशंकर आणि जयपाल रेड्डी या दोघांनीही विरोधी पक्षनेते सांभाळले. शिवशंकर काँग्रेसचे तर रेड्डी जनता दलाचे नेते होते.

विशेष म्हणजे राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपदासोबत उपनेताही असतो. भाजपातर्फे आतापर्यंत एस. एस. अहलुवालिया आणि रविशंकरप्रसाद, तर काँग्रेसतर्फे आनंद शर्मा, पी. चिदंबरम् आणि प्रमोद तिवारी हे उपनेते झाले. आनंद शर्मा तर सर्वाधिक काळ म्हणजे ७ वर्ष २९८ दिवस उपनेते होते, तर प्रमोद तिवारी यांनी तीन वर्ष ११० दिवस हे पद उपभोगले, तर चिदंबरम् ३४४ दिवस उपनेते होते. भाजपाचे अहलुवालिया २ वर्ष ३०४ दिवस तर रविशंकर प्रसाद १ वर्ष ३१० दिवस या पदावर होते. पण गंमत म्हणजे भाजपामधील असो की, काँग्रेसमधील एकही उपनेता आतापर्यंत राज्यसभेतील विरोधी पक्षनेता झाला नाही. या सर्वांना उपनेतेपदावरच समाधान मानावे लागले. विरोधी पक्षनेते म्हणून दुसऱ्या कार्यकाळात खडगे यांची कामगिरी कशी राहणार, याकडे आता सर्वांचे लक्ष राहणार आहे. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### उबाठाने सन्मानाने राजकारण संन्यास घ्यावा

'अहिरांच्या प्रवेशाने तांत्रिक चुकांची हॅट्ट्रिक' ही बातमी वाचली. 'ठाकरे घराण्याशी निष्ठा म्हणजे महाराष्ट्रावर निष्ठा', हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असेपर्यंत शक्य झाले होते. पण नंतरच्या काळातही तसेच राहिले पाहिजे अशी अपेक्षा करणे बालिशपणाच आहे. भारतातील काँग्रेससह बहुतेक सगळे विरोधी पक्ष आजच्या घडीला सरंजामशाहीच्या काळात वावरत आहेत. गेल्या काही काळात केंद्रासह महाराष्ट्र, बिहार, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, राजस्थान अशा अनेक राज्यांमध्ये, सत्तेला एकाधिकारशाही समजून, आपल्याच परिवाराच्या हातात सत्ताकेंद्र ठेवण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद यांचा अनिर्बंध वापर केला जात होता. आपण करतो ते राज्यघटना आणि लोकशाहीचा सन्मान राखण्यासाठी करत आहोत, अशी जनतेची पद्धतशीरपणे दिशाभूलही केली जात होती. मात्र सर्व लोकांना सर्वकाळ मूर्ख बनवणे कोणालाही शक्य होत नाही, या नैसर्गिक सत्याला धरून अशा घराणेशाहीचा वारसा जपणाऱ्या पक्षांना जनताजनार्दनाने खड्यासारखे बाजूला केले आहे.

उबाठांनी भाजपची ३० वर्षांपासून असलेली युती २०१९ मध्ये मुख्यमंत्री पदाच्या लालसेने तोडली. जनादेश पायदळी तुडवला. ते काँग्रेस, शरद पवार यांच्याबरोबर गेले. मुलाला घरातून थेट कॅबिनेट मंत्री बनवले. थोडक्यात सांगायचे झाले तर, शिवसेना नावाच्या चंदनी महालाला संजय राऊत नावाची धस लागली आणि त्या 'वाळवी'ने तो महाल पोखरून त्याची धुळधाण उडवली. आता तर महायुतीत जाण्याचा मार्गही पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे आणखी अपमानास्पद परिस्थिती येण्यापूर्वी आणि मुळात राजकारण हा त्यांचा प्रांतच नसल्यामुळे, त्यांना राजकारण संन्यास हाच पर्याय आहे.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

### पालखी मार्गावर अन्नपदार्थ तपासणी योग्यच

येणाऱ्या आषाढी एकादशीत उपस्थित राहून पांडुरंगाला पावसाचे साकडे घालण्यासाठी व समृद्ध, संपन्न, निरोगी महाराष्ट्र व देशासाठी राज्याच्या विविध भागातून निघालेल्या पालख्या पंढरपूर मार्गावर आहेत. पावसाळ्याचे दिवस आहेत. या पालख्यांसोबत ज्येष्ठ पुरुष व महिला मोठ्या संख्येने आहेत. त्यांच्या आरोग्याची सर्वांनीच काळजी घेणे गरजेचे आहे. पालखी मार्गावर जागोजागी मुक्काम, चहापाणी, नाश्ता, जेवण, फराळ व अन्य खाद्यपदार्थ पुरविले जातात. ही मोठी सेवा आहे. पालखीतील भाविकांची सेवा हा मोठा धर्म मानला जातो. गावोगावीचे नागरिक पुढाकार घेतात. पालखी मार्गावर, हॉटेल्स, चहा टपऱ्या व फळफळावर व फराळाची दुकाने असतात. या ठिकाणच्या अन्नपदार्थांची तपासणी करणे हे पालखीतील ज्येष्ठ नागरिक व इतर सर्व सहभागी यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. याबाबत हॉटेलचालक किंवा प्रसाद वा नाश्ता देणारे किंवा फळ विक्रेते यांनी गैरसमज करून घेऊ नये. अन्नदान मंडळे किंवा ग्रामस्थ तसेच संस्था यांनीही याबाबत गैरसमज न करता अन्न प्रशासन विभागाला तपासणी करण्यास सहकार्य करावे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

■■■

### हवामान बदलाचे आव्हान



आज जगभरात सर्वत्र जगातील हवामान बदलाचे परिणाम मानवजातीस भोगावे लागत आहेत. खरं पाहता बहुतांशी ही सगळी आपल्याच कर्माची फळे आहेत. अनेक संकटे ही मानवनिर्मित आहेत. सारखे यावर चर्चा, इमेज आणि बातम्या वगैरे टाकून काही फरक पडणार नाहीये. आणि निसर्ग कोपला आहे म्हणून त्याला दोषी ठरवणे म्हणजे निव्वळ मूर्खपणा ठरेल. ज्या निसर्गाने पिढ्यान् पिढ्या मानवी आयुष्य जगवले, जगण्यासाठी लाखो करोडो वर्ष भरभरून दिले, त्याच्यावरच कुऱ्हाड घालण्याचे अहोरात्र काम आजही सर्वत्र चालूच आहे. आणि कोणतीही नैसर्गिक दुर्घटना घडली की पुन्हा तोच गुन्हेगार, दोषी म्हणून त्याच्याकडेच बोट आणि आरोप! निसर्ग कोपण्याची प्रक्रिया काय काल परवा घडली नाही. याचे सर्व संकेत जगभरातील शास्त्रज्ञ किती तरी वर्षांपासून भाकीत करत होते. निसर्गास इतके वर्ष हलक्यात घेतल्याचे परिणाम आज जगभरात अनेकांना भोगावे लागत आहेत ही वस्तुस्थिती नाकारता कामा नये. जगभरातील सरकारने तसेच समस्त नागरिकाने एकत्र येऊन आता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देत निसर्गाचा ऱ्हास रोखणे आणि संवर्धन करणे अत्यावश्यक आहे. ■

**लोकेश बापट**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बनावट कागदपत्राद्वारे फसवणूक; भाऊ व भावजयीवर गुन्हा

**सोलापूर, दि. १ जुलै-**

सख्ख्या बहिणीच्या आधार कार्डचा गैरवापर करून बहिणीच्या नावाने बनावट सह्या व अंगठ्याद्वारे १ हजार चौरस फुटाचा भूखंड स्वतःच्या नावावर करून बहिणीची फसवणूक केल्याप्रकरणी एका सख्खा भाऊ व भावजयीवर जेलरोड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हुसेन अहमद मकबूलसाब कुमसी, अस्मा हुसेन अहमद कुमसी (दोघे रा. नई जिंदगी, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे याबाबत राबिया चांद शेख (वय ३० वर्ष, रा. शिवगंगा नगर, मंजरेवाडी, नई जिंदगी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. हा फसवणुकीचा प्रकार ६ फेब्रुवारी २०२५ पासून आजतागायत जिल्हा न्यायालय परिसरात घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.




यातील फिर्यादी राबिया यांच्या मालकीचा मंजरेवाडी भागात १००० चौ. फूटाचा भूखंड आहे. आरोपी भाऊ हुसेन आणि वहिनी अस्मा यांनी संगनमत करून राबिया यांच्या आधार कार्डचा गैरवापर केला. जिल्हा न्यायालयाबाहेर सिव्हिल चौक येथे १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर राबिया यांच्या जागी वहिनी अस्मा यांना उभे करण्यात आले. तिथे फिर्यादीची बनावट सही आणि अंगठ्याचा ठसा मारून बनावट कब्जा पावती व करारपत्र नोटरी करून घेतले आणि मिळकत स्वतःच्या नावावर करून विश्वासघात केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चानकोटी हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.


# महापालिका महिला व बालकल्याण समितीसह ७ समिती सभापती पदासाठी उद्या निवडणूक

## नगरसचिव कार्यालयात आज नामनिर्देशपत्र करणार दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

सोलापूर महापालिकेच्या कारभारात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या स्वतंत्र बजेट असलेल्या महिला व बालकल्याण समितीसह विविध ७ समित्यांच्या सभापतीपदासाठी शुक्रवार, दि. ३ जुलै रोजी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात पुणे विभागीय आयुक्तांनी अधिकृत आदेश निर्गमित केला आहे.

विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार, दि. ३ मे रोजी महापालिका कौन्सिल हॉलमधील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महापालिकेच्या स्थापत्य समिती, वैद्यकीय सहाय व आरोग्य समिती, विधी समिती, शहर सुधारणा समिती, मंड्या व उद्यान समिती, कामगार व समाज कल्याण समिती, महिला व बालकल्याण समिती या सभापती पदाची ही निवडणूक प्रक्रिया याच क्रमवारीनुसार पार पडेल. सकाळी ११ वाजता, यानंतर एकेक समितीला टप्प्याटप्प्याने ११:३०, १२ आणि दुपारी १२:३०, १, व २ वाजता प्रत्येक समितीसाठी स्वतंत्रपणे मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. निवडणूक अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या उपस्थितीत हात उंचावून मतदान पद्धतीने सभापतींची निवड केली जाणार आहे. या निवडणुकीनंतर महापालिकेच्या विविध समित्यांची नव्याने रचना होऊन पुढील वर्षांचा कारभार अधिक वेगाने होण्याची अपेक्षा आहे.





### नगरसचिव कार्यालयात आज नामनिर्देशपत्र उपलब्ध

विविध समिती सभापती या पदासाठी विहित नमुन्यातील नामनिर्देशपत्र २ जुलै रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत नगरसचिव, नगरसचिव यांचे कक्षात, कॉन्सिल हॉल, सोलापूर महानगरपालिका येथे स्विकारतील. विहित नमून्यातील नामनिर्देशनपत्र नगरसचिव कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

**नगरसेवकांची उत्सुकता**

महापालिकेत सध्या भाजपाचे १०२ पैकी ८७ सदस्य असून आमदारांच्या गटांमध्ये सभापतीपदासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. महिला व बालकल्याण समितीचे सभापतीपद सर्वात महत्त्वाचे मानले जात असल्याने त्यासाठी चुरस पाहायला मिळत आहे. आरोग्य आणि शहर सुधारणा, स्थापत्य समितीकडेही विशेष लक्ष आहे. निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

### या ७ समित्यांच्या सभापती पदाची होणार निवड

महापालिकेच्या दैनंदिन कारभारावर थेट परिणाम करणाऱ्या स्थापत्य समिती, वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती, विधी समिती, शहर सुधारणा समिती, मंड्या व उद्यान समिती, कामगार व समाज कल्याण समिती आणि महिला व बाल कल्याण समिती या ७ समित्यांच्या सभापतीपदासाठी मतदान होणार आहे. या समित्या महापालिकेच्या बजेट, विकासकामे, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि सामाजिक योजनांवर निर्णय घेतात.

**स्वतंत्र निधी समितीसाठी कोणाची वर्णी ?**

महापालिकेच्या विशेष सात समित्यांमध्ये प्रत्येक समितीत ९ सदस्य असून यामध्ये भाजपाचे ८ तर एमआयएमचा १ सदस्य आहे. या समित्यांमध्ये प्रथमच कॉंग्रेससह शिवसेनेचा एकही सदस्य नाही. महिला व बालकल्याण समितीत भाजपाचे सुनिता कामाठी, मंदाकिनी तोडकरी, वंदना गायकवाड, मृण्मयी गवळी, पूजा वाडेकर, श्वेता खरात, सुमन चाबुकस्वार, निर्मला जंगम (भाजपा) सफिया चौधरी (एमआयएम) असे असून भाजपाच्या सदस्यांमधून या स्वतंत्र निधी व सभापतींना वाहन असलेल्या समितीवर कोणाची वर्णी लागणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

# महापालिका भंगार चोरी प्रकरणात मोठी कारवाई

**जगन्नाथ बनसोडे यांना १ लाख २० हजार दंड, २५ टक्के पेन्शनमधून कपात**

**ठपका ठेवलेल्या १३ जणांपैकी ९ जणांवर विविध प्रकारची कारवाई**

**कायम मजूर निलंबित तर दोन मक्तेदार मजुरांना घरचा रस्ता**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

सोलापूर शहरासह राज्यात गाजलेल्या महापालिका भांडार गोडाऊनमधील भंगार चोरी प्रकरणात पोलिसात गुन्हा दाखल झाल्यानंतर महापालिकेच्या अंतर्गत चौकशीत ठपका ठेवण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी १३ जणांतील ९ जणांवर दंडासह विविध प्रकारची शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढलेल्या या आदेशामुळे महापालिका प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे

महापालिकेच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी शिस्तभंगाची कारवाई मानली जात असून, अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये यामुळे मोठी चर्चा सुरू झाली आहे. महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागातून सेवानिवृत्त झाल्यानंतर जगन्नाथ बनसोडे यांची प्रशासनाने मानधनावर पुनर्नियुक्ती केली होती. शहरातील विविध भागांत अतिक्रमण कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेले खोके, लोखंडी साहित्य, पत्रे व इतर भंगार साहित्य महापालिकेच्या पाठीमागील नगर अभियंता भांडार गोडाऊनमध्ये ठेवण्यात येत होते. दि. १८ मे २०२६ रोजी दुपारच्या सुमारास अतिक्रमण कारवाईत आणलेले भंगार साहित्य वाहनातून नेत असताना नगरसेवक अमोल शिंदे यांनी संबंधितांना रंगेहाथ पकडले होते. चौकशीत या प्रकारामागील विविध बाबी उघडकीस आल्या असून, अशाच पद्धतीने अनेक दिवसांपासून भंगार साहित्याची चोरी सुरू असल्याचे समोर आले होते.

या घटनेनंतर महापालिकेच्या भांडार परिसरात मोठा गोंधळ उडाला होता. महापालिका आयुक्तांसह पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. आयुक्तांच्या आदेशानुसार उपअभियंता अविनाश वाघमारे यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी जगन्नाथ बनसोडे, कनिष्ठ अभियंता दीपक कुंभार, सेवक, मजूर व वाहनचालकांवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, यानंतर या प्रकरणाच्या विभागीय चौकशीसाठी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी अधिकारी, कर्मचारी, मजूर व संबंधितांचे जबाब नोंदवून सविस्तर चौकशी केली. तपासाअंती १३ जणांवर ठपका ठेवणारा अहवाल त्यांनी दि. १२ जून २०२६ रोजी महापालिका आयुक्तांकडे सादर केला. या अहवालाचा अभ्यास करून आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी संबंधितांवर विविध प्रकारची कारवाई करत आदेश काढले.

### कोणावर कोणती झाली कारवाई...

१. **अतिक्रमण प्रतिबंधक विभाग अधिकारी जगन्नाथ बनसोडे** - ५ वर्षे मिळणाऱ्या पेन्शनमधून २५ टक्के रक्कम कपात, १ लाख २० हजार रुपये दंड आणि कोणत्याही विभागात पुनर्नियुक्तीवर कायमस्वरूपी प्रतिबंध.
२. **मानधन कनिष्ठ अभियंता दीपक कुंभार** - १ लाख २० हजार रुपये दंड.
३. **कायम मजूर सचिन शिवलाल गाडे** - सेवेतून निलंबित.
४. **कनिष्ठ लिपिक विनोद चंदनशिवे** - एक वेतनवाढ रोखली.
५. **कनिष्ठ लिपिक अशोक बिराजदार** - एक वेतनवाढ रोखली.
६. **कायम मजूर विश्वजीत कांबळे** - एक वेतनवाढ रोखली.
७. **कायम मजूर गौतम लोखंडे** - एक वेतनवाढ रोखली.
८. **मक्तेदार मजूर (बीव्हीजी कंपनी) नरसिंग परदेशी** - कायमचा घरचा रस्ता, दोन महिन्यांचे वेतन वसूल करून महापालिकेत जमा करणे आणि कायमस्वरूपी पुनर्नियुक्ती नाही.
९. **मक्तेदार मजूर नवनाथ बेळ्ळे** - दोन महिन्यांचे वेतन इतके दंड वसूल होणार
१०. **कायम मजूर सेवक सुरज डोलारे** - सक्त ताकीद.

### तीन अधिकारी, एक सेवकाला सक्त ताकीद

महापालिका आयुक्तांनी नगर अभियंता सारिका अकुलवार, तत्कालीन नियंत्रण अधिकारी तपन डंके आणि या प्रकरणात पोलिसात फिर्याद दाखल करणारे उपअभियंता अविनाश वाघमारे यांना सक्त ताकीद दिली आहे. तर कायम मजूर सेवक सुरज राजू डोलारे यांनाही सक्त ताकीद देण्यात आली आहे.

# राजेंद्र हजारे यांच्यासह चार जमीनमालकांना तब्बल १ कोटी २२ लाखांचा दंड



**सलगरवस्ती परिसरात परवानगीशिवाय ११८ वृक्ष तोडप्रकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

परवानगी न घेता तब्बल ११८ वृक्षांची बेकायदेशीर तोड केल्याप्रकरणी सोलापूर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरण समितीने संबंधित जमीनमालकांवर १ कोटी २२ लाख २१ हजार ३०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. विहित मुदतीत दंडाची रक्कम न भरल्यास संबंधितांच्या ७/१२ उताऱ्यावर दंडाचा बोजा चढविण्याबरोबरच महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

महापालिकेने राजेंद्र पुडलिक हजारे, आशा राजेंद्र हजारे, शिवानंद यशवंत पाटील आणि अंकित शिवानंद पाटील (सोलापूर) यांना याबाबत आदेश बजावले आहेत. हे आदेश सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मान्यतेने उद्यान अधीक्षक तथा सहायक वृक्ष अधिकारी कोमल काशीद यांनी जारी केले आहेत.

महापालिकेला दि. २६ मे २०२६ रोजी व्हॉट्सॲपद्वारे म्हाडा कॉलनी पाठीमागे, सलगरवस्ती परिसरात विनापरवाना वृक्षतोड झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानंतर प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीत ११५ कडुलिंब, १ बाभूळ, १ पिंपळ आणि १ जांभूळ, अशा एकूण ११८ वृक्षांची विनापरवाना तोड झाल्याचे निष्पन्न झाले. महापालिकेने या वृक्षांचे मूल्यांकन करण्यासाठी अहवाल वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांकडे पाठविला होता. त्यानुसार ५ जून २०२६ रोजी प्राप्त झालेल्या अहवालात तोडण्यात आलेल्या वृक्षांचे मूल्य ४ लाख २१ हजार ३०० रुपये इतके असल्याचा अभिप्राय नोंदविण्यात आला. महापालिकेच्या आदेशानुसार, संबंधितांनी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी न घेता वृक्षतोड केल्याने महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम २१ (१) व २१ (२) चे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. कडुलिंब, पिंपळ, जांभूळ आणि बाभूळ या पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या वृक्षप्रजातींची तोड झाल्यामुळे परिसरातील प्राणवायू निर्मिती, कार्बन शोषण क्षमता, जैवविविधता आणि पर्यावरणीय संतुलनावर गंभीर परिणाम झाल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

संबंधितांना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार १७ जून २०२६ रोजी सुनावणीची संधी देण्यात आली होती. त्यावेळी शिवानंद पाटील आणि राजेंद्र हजारे यांनी उपस्थित राहून वृक्षतोड करण्यास आपण सांगितले नसल्याचे तसेच वृक्षतोड करणाऱ्या व्यक्तींना ओळखत नसल्याचे सांगितले. मात्र, त्यांच्या खासगी मालकीच्या जागेत ११८ वृक्षांची बेकायदेशीर तोड होऊनही त्यांनी कोणतीही तक्रार सक्षम यंत्रणेकडे नोंदविली नसल्याने त्यांचा दावा ग्राह्य धरता येत नसल्याचे वृक्षप्राधिकरण समितीने नमूद केले आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन समितीने प्रति वृक्ष एक लाख रुपये या प्रमाणे ११८ वृक्षांसाठी १ कोटी १८ लाख रुपये, तसेच वनविभागाने निश्चित केलेले ४ लाख २१ हजार ३०० रुपये, असा एकूण १ कोटी २२ लाख २१ हजार ३०० रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय घेतला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणात महापालिका सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांनी प्रशासकीय प्रक्रिया चांगल्या पद्धतीने पार पाडली.

### अन्यथा संबंधितांच्या ७/१२ उताऱ्यावर दंडाची नोंद

महापालिकेने संबंधितांना १५ दिवसांच्या आत ही रक्कम महापालिकेच्या तिजोरीत जमा करून त्याची पावती सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा संबंधितांच्या ७/१२ उताऱ्यावर दंडाची नोंद करून वसुलीची कारवाई करण्यात येणार असून, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाईही करण्यात येणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. हे आदेश सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मान्यतेने उद्यान अधीक्षक तथा सहायक वृक्ष अधिकारी कोमल काशीद यांनी जारी केले आहेत.

**HEALTH DEPARTMENT - GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**TENDER NOTICE 2026-27**
**CIVIL SURGEON SOLAPUR**

**E-Tender for Ashadi Wari Pandharpur Maha Arogya Shibir (Integrated Event Management, Planning, Execution and arrangement for Infrastructure, Catering Service, Accommodation and Venue Management**

**Tender Reference No. DHS/MAHAAROGYA SHIBIR EVENT MANAGEMENT/E Tender No. 4/2026-27**

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers / Distributors and supplier to participate in the competitive bidding process to Integrated Event Management, Planning, Execution and arrangement for Infrastructure, Catering Service, accommodation and Venue Management for Ashadhi Wari Pandharpur Maha Arogya Shibir.
For the detailed tender documents, interested bidders should visit **http://www.maharashtra.gov.in/tenders**
Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 07/07/2026 (17.00 PM)

**Civil Surgeon Solapur**

Aryan Creation

# ध्येयवादी शिक्षणतज्ज्ञ : प्रा. प्रमोद आवताडे

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...' आणि 'अवघाचि संसार सुखाचा करीन...' या संतवचनांचा केवळ जयघोष न करता, ती मूल्ये आपल्या दैनंदिन कार्यातून आणि जगण्यातून सिद्ध करणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. प्रमोद आवताडे सर. आज त्यांच्या वाढदिवसाचा क्षण हा केवळ एका व्यक्तीचा सत्कार करण्याचा दिवस नाही, तर ग्रामीण महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पेरणाऱ्या एका ध्येयवेड्या प्रवासाला वंदन करण्याचा दिवस आहे. हा प्रवास एका व्यक्तीच्या वैयक्तिक यशाचा नसून, तो एका सामाजिक क्रांतीचा जिवंत दस्तऐवज आहे!

**संघर्षाच्या कुशीतून अंकुरलेले गुरुकुलचे स्वप्न**

विरवडे बुद्रुक सारख्या एका छोट्याशा खेड्यात, शेतकरी कुटुंबाच्या कुशीत प्रा. प्रमोद सरांचे बालपण आकाराला आले. ग्रामीण भागातील गरिबीचे चटके, सोयी-सुविधांचा अभाव आणि पावलोपावली असणारा संघर्ष हा त्यांच्या पाचवीलाच पुजलेला. परंतु, ज्यांची स्वप्ने परिस्थितीच्या चौकटीपेक्षा मोठी असतात, त्यांना कोणतीही मर्यादा रोखू शकत नाही. शहरातील श्रीमंतांच्या मुलांना मिळणारे दर्जेदार शिक्षण ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या, कष्टकऱ्याच्या लेकरालाही मिळाले पाहिजे, या एकाच ध्यासाने ते पेटून उठले. आज गुरुकुल या शब्दाभोवती व्यापारीकरण आणि भरमसाठ फीचे वलय निर्माण झाले असताना, प्रा. आवताडे सरांनी वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी वाघोलीसारख्या ग्रामीण भागात गुरुकुलची संकल्पना प्रत्यक्ष भूमीवर उतरवली. हा केवळ एका शिक्षण संस्थेचा उदय नव्हता, तर तो शैक्षणिक समानतेचा एक पथदर्शी प्रयोग होता.

**इमारतींच्या वैभवापेक्षा माणूस घडवण्यावर भर!**

"उत्कृष्ट शिक्षक असतील तर साधी पर्णकुटीही ज्ञानाचे विद्यापीठ बनते; पण संस्कार आणि निष्ठा नसतील तर भव्य इमारतीही केवळ सिमेंटचे सांगाडे उरतात." प्रा. आवताडे सरांचे हे विचार आजच्या व्यावसायिक शिक्षण क्षेत्राला दिशा दाखवणारे आहेत. त्यांच्या संस्थेत पाऊल ठेवणारा प्रत्येक विद्यार्थी हा केवळ एक पटसंख्येचा आकडा किंवा रोल नंबर नसतो, तर तो त्यांच्या विशाल परिवाराचा एक घटक बनतो. त्यांनी केवळ विटा-सिमेंटच्या इमारती उभ्या केल्या नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वासाचे आणि मूल्यांचे भक्कम अधिष्ठान उभे केले. गुणवत्तेशी आणि नैतिकतेशी कधीही तडजोड न करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच, त्यांच्या शिक्षण संकुलाने अल्पावधीतच महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर आपला एक वेगळा आणि आदरयुक्त दबदबा निर्माण केला आहे.



**यशाचे उत्तुंग शिखर, पण पाय मातीशीच घट्ट!**

अफाट यश मिळवणे जितके कठीण, तितकेच ते यश पचवून पाय जमिनीवर ठेवणे महाकठीण! पण प्रा. सरांचे मोठेपण यातच आहे की, आज यशाचे एवढे मोठे साम्राज्य उभे असतानाही त्यांची आपल्या मातीशी आणि गावाशी असलेली नाळ तुटलेली नाही. कसलाही बडेजाव नाही, पदाचा अहंकार नाही की मोठेपणाचा आव नाही. सर्वसामान्यांशी तितक्याच आपुलकीने संवाद साधणे, विद्यार्थ्यांवर पितृतुल्य प्रेम करणे आणि सहकाऱ्यांना सोबत घेऊन पुढे जाणे, हे एका सच्च्या जननेत्याचे लक्षण त्यांच्यात प्रकर्षाने जाणवते.

**संत तुकाराम महाराज म्हणतात:**

**जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ।**
**उदास विचारे वेच करी ॥**

हा अभंग केवळ धनाचा संचय सांगत नाही, तर तो मूल्यांची जपणूक शिकवतो. सरांनी बँक बॅलेन्सपेक्षा माणसांची आणि विश्वासाची खरी श्रीमंती कमावली आहे.

**राष्ट्रनिर्माणाचे शांत शिलेदार**

समाजात जेव्हा एखादा कर्तबगार अधिकारी, नामांकित डॉक्टर, अभियंता किंवा यशस्वी उद्योजक देशाच्या विकासात योगदान देतो, तेव्हा त्या यशाच्या पायाशी एक शिक्षक शांतपणे उभा असतो. प्रा. प्रमोद आवताडे हे नेमके तेच काम अविरतपणे करत आहेत. आज त्यांच्या संस्कारातून घडलेली पिढी विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील हेच यश सरांच्या कष्टाची खरी पावती आहे.

प्रा. प्रमोद सर, वाढदिवस हा केवळ कॅलेंडरचे एक पान बदलण्याचा दिवस नसतो, तर तो नवसंकल्पांचा सुवर्णक्षण असतो. तुम्ही केवळ एक यशस्वी शिक्षणतज्ज्ञ नाही, तर ग्रामीण भागातील अंधारलेली घरे प्रकाशमान करणारा ज्ञानदीप आहात. ईश्वर आपल्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अशीच अखंड ऊर्जा देवो. आपल्या हातून शिक्षणाचा हा वटवृक्ष असाच बहरत राहो आणि त्याच्या पारंब्या नवनव्या शिखरांना कवेत घेवोत, याच वाढदिवसानिमित्त मनापासून अनंत शुभेच्छा!

**- प्रभाकर क्षीरसागर,** वैराग

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**संवाद सुविधा प्रदान करणे**

भारत सरकारच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (संकेत व दूरसंचार) कार्यालयाकडून सक्षम, नामांकित संस्था / कंत्राटदारांकडून रेल्वेच्या www.ireps.gov.in या ई-खरेदी संकेतस्थळावर पुढील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवण्यात येत आहेत. निविदा सूचना क्रमांक: SUR-N-T-2026-27-18, दिनांक: 30.06.2026. कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील उपविभागीय रुग्णालय, रेल्वे सुरक्षा बल बॅरक, सहाय्यक विभागीय अभियंता कार्यालय आणि इतर अभियांत्रिकी डेपो येथे संवाद सुविधा प्रदान करणे तसेच युटिलिटी शिफ्टिंग/स्थानांतरण करणे. कामाचा एकूण खर्च: 61,07,641.81. निविदा फॉर्मची किंमत: शून्य. अनामत रक्कम जमा करायची: 1,22,200/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. www.ireps.gov.in वर निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळ: 24/07/2026 रोजी दुपारी 15:30 वाजता. सविस्तर तपशील आयरेप्स (ireps) संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सुधारणा पत्र/दुरुस्ती जर काही असेल तर ती केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केली जाईल. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. हस्तपुस्तिका / टपाल / ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in वर करावी. अनामत रकमेचा (EMD) भरणा नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारला जाईल आणि मूळ बँक गॅरंटी बोली सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नामांकित अधिकाऱ्याकडे वैयक्तिकरित्या सुपूर्द केली जावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक,**
**संकेत व दूरसंचार शाखा,**
**मध्य रेल्वे, सोलापूर.**
AK/Sur-37

**रेल्वे लाईन अनधिकृतपणे ओलांडणे हा एक दंडनीय गुन्हा आहे.**

**जाहीर नोटीस**
दि. कि. अर्ज नं. ११ / २०२६

**बार्शी येथील मे. सि.ज.सि.डी.सो. यांचे कोर्टात**

१. **अतुल पांडुरंग दिंडोरे,**
वय ५८ वर्षे, धंदा - नोकरी,
रा. मार्केट गल्ली, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
२. **अभय पांडुरंग दिंडोरे,**
वय ५५ वर्षे, धंदा - नोकरी,
रा. मु.पो. जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर
३. **सौ. वैशाली केशव जोशी,**
वय ५२ वर्षे, धंदा घरकाम,
रा. विश्वास नगर, धाराशिव रोड, तुळजापूर,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** **- सामनेवाला**

जाहीर नोटीस देण्यात येते की, ज्याअर्थी मयत पांडुरंग दत्तात्रय दिंडोरे यांचे अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारस आहेत असे घोषीत होऊन मिळणेसाठी व मयत पांडुरंग दत्तात्रय दिंडोरे यांच्या नावे सोलापूर जिल्हा म. सह. बँक मर्या. शाखा वैराग येथे बचत खाते असून त्यांच्या नावे सदर बँकेमधे मुदत ठेव सर्टिफिकेट आहेत. या बचत खात्यामधील व मुदत ठेव सर्टिफिकेटमधील एकूण र.रु. २०,६६,६२७.९७ (अक्षरी रुपये वीस लाख सहासष्ट हजार सहाशे सत्तावीस पैसे सत्याण्णव) इतकी जमा रक्कम यातील अर्जदार यांना मिळण्याकरीता अर्जदार यांनी मे. कोर्टातून वारसा दाखला मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

त्या अर्थी सदर अर्जदारांचे वरील वारसा दाखला मागणी अर्जाबाबत कोणाची काही तकार, हरकत किंवा काही म्हणणे असल्यास सदर व्यक्तीने स्वतः अगर आपले ॲडव्होकेट मार्फत नेमलेल्या दि २३/०७/२०२६ या तारखेदिवशी सकाळी ११ वाजता मे. कोर्टात हजर होवून आपली हरकत अथवा म्हणणे दाखल करावे. वरीलप्रमाणे जर कोणी आपली हरकत किंवा म्हणणे दाखल केले नाही तर सदर अर्जदारांना प्रस्तुत अर्जातील मागणीप्रमाणे वारसा दाखला देण्यात येईल.

कळावे ही जाहीर नोटीस आज रोजी आमचे सहीने व मे. कोर्टाच्या शिक्याने दिली असे. दि. २२/०६/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सह अधिक्षक,**
**मे. सि.ज.सि.डि. कोर्ट, बार्शी**




# फ्रान्सचा स्वीडनवर 3-0 ने विजय

**न्यू जर्सी, १ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ फुटबॉल स्पर्धेत 'न्यू यॉर्क न्यू जर्सी स्टेडियम'वरस्वीडनविरुद्धच्या अंतिम-३२ फेरीच्या सामन्यात दोन गोल करीत किलियन एमबाप्पेने आपली विश्वचषकातील कामगिरी अधिकच उंचावली आणि फ्रान्सला सहज विजय मिळवून दिला. एमबाप्पेचे दोन गोल व बारकोलाने नोंदविलेल्या एका गोलच्या बळावर फ्रान्सने स्वीडन वर सरळ ३-० गोलने विजय नोंदविला.

फ्रान्सला विजय मिळवून देताना एमबाप्पेने ४५ व्या मिनिटाला आणि ७४ व्या मिनिटाला असे दोन गोल केले, तर बारकोलाने ५३ व्या मिनिटाला एक गोल केला.

या विजयाबरोबरच फ्रान्सने उप-उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. किलियन एमबाप्पेने फिफा विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत स्वतंत्रपणे दुसरे स्थान पटकावले. आता एमबाप्पेची विश्वचषकातील एकूण गोलची संख्या १८ वर पोहोचली आहे. आता तो मिरोस्लाव क्लोझपेक्षा दोन गोलने पुढे आहे आणि लिओनेल मेस्सीपेक्षा केवळ एका गोलने मागे आहे. येत्या काही दिवसांत या आघाडीच्या खेळाडूंमधील क्रमवारी बदलण्याची दाट शक्यता आहे. ब्रॅडली बारकोलानेही गोल केला आणि फ्रान्स संघाने विश्वचषक २०२६ मधील आपली विजयी घोडदौड कायम राखली.



न्यू जर्सी येथे अंतिम ३२ फेरीच्या सामन्यादरम्यान स्वीडनचा गोलरक्षक जेकब विडेल झेटरस्ट्रॉमला (१) हुलकावणी देत आपल्या संघासाठी तिसरा गोल करताना फ्रान्सचा खेळाडू किलियन एमबाप्पे (१०)

गट-फेरीतील निर्दोष कामगिरीमुळे आत्मविश्वास उंचावलेल्या फ्रान्सने पूर्वार्धात आक्रमक खेळाचा उत्कृष्ट नमुना सादर केला. १९९८ व २०१८ चे विश्वविजेते असलेल्या फ्रान्सने मध्यांतरापूर्वी गोल करण्याच्या १५ संधी निर्माण केल्या; यात एमबाप्पेचा एक गोल 'ऑफसाइड' ठरला, तर एका फटक्यात चेंडू गोलपोस्टच्या खांबाला जाऊन आदळला. मायकल ओलिसेही गोल करण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता, पण त्याचा शानदार 'ओव्हरहेड किक'चा फटका गोलपोस्टच्या चौकटीवर आदळला.

एका पासवर ताबा घेत एमबाप्पे पेनॉल्टी एरियामध्ये शिरला व त्याने अत्यंत वेगवान व अचूक फटका मारत चेंडू गोलच्या कोपऱ्यात धाडला. या सामन्यादरम्यान स्वीडन संघाला कोणताही दिलासा मिळाला नाही, कारण फ्रान्सने स्वीडनच्या गोलपोस्टवर सतत दबाव कायम ठेवला. ओलिसेच्या पासवर बारकोलाने पेनॉल्टी एरियाच्या आतून शानदार गोल केला.

७४ व्या मिनिटाला ओलिसेच्या आणखी एका उत्कृष्ट 'सहाय्य'वर एमबाप्पेने आपला दुसरा गोल पूर्ण केला; फ्रान्सच्या १० क्रमांकाच्या या खेळाडूने चेंडू जाळीत धाडत संघाच्या गोलची संख्या सहावर नेली. ४ जुलै रोजी फिलाडेल्फिया स्टेडियमवर 'अंतिम १६' मध्ये फ्रान्सचा सामना पॅराग्वेविरुद्ध होणार आहे, तेव्हा फ्रान्सच्या या कर्णधाराला आपल्या गोलच्या संख्येत आणखी भर घालण्याची संधी मिळेल. ◂(वृत्तसंस्था)

# एमबाप्पेची मेस्सीशी बरोबरी

**न्यू यॉर्क, १ जुलै**

फिफा २०२६ विश्वचषकातील 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत, गोलच्या संख्येबाबत फ्रान्सच्या एमबाप्पेने अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीशी (६ गोल) बरोबरी साधली आहे.

फ्रान्सच्या या कर्णधाराच्या नावावर आता विश्वचषकात एकूण १८ गोल जमा झाले आहेत; म्हणजेच तो मेस्सीच्या १९ गोलच्या एकूण विक्रमापेक्षा केवळ एका गोलने मागे आहे आणि २७ वर्षीय एमबाप्पे हा विक्रम मोडण्याचा प्रयत्न राहील.

एमबाप्पे मेस्सीच्या पुढे, ; ओलिसे पेलेपेक्षा एका गोलने मागे; हॉलंडचे १३ सामन्यांत २५ गोल एमबाप्पेने आता सहा गोल केले आहेत, जी संख्या मेस्सीइतकीच आहे. मात्र, या स्पर्धेतील त्याच्या २ 'असिस्ट्स'मुळे (गोलसाठी केलेली मदत) 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत तो मेस्सीच्या पुढे गेला आहे.

या दोन गोलांमुळे एमबाप्पेच्या कारकिर्दीतील एकूण विश्वचषक गोलची संख्या १८ वर पोहोचली. त्याने पुरुषांच्या विश्वचषकातील सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत मिरोस्लाव क्लोझशी असलेली बरोबरी (पहिल्या गोलसह) मोडली आणि आता तो या यादीतील अव्वल स्थानावरील लिओनेल मेस्सी (१९ गोल) पेक्षा केवळ एका गोलने मागे आहे. युरोपियन संघांविरुद्ध सलग ७ सामने जिंकणारा फ्रान्स हा विश्वचषकाच्या इतिहासातील पहिला संघ ठरला आहे.

**रोनाल्डोचा विक्रम मोडला**

एमबाप्पेने आता केवळ विश्वचषकाच्या बाद फेऱ्यांमध्ये १० गोल केले आहेत; आजच्या सामन्यातील पहिल्या गोलसह त्याने ब्राझीलचा महान खेळाडू रोनाल्डोचा विक्रम मागे टाकत या टप्प्यावर सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. त्याच्या दोन गोलांमुळे एमबाप्पेची विश्वचषकातील एकूण गोल-योगदानाची संख्या २२ (१८ गोल, ४ असिस्ट्स) झाली आहे. यासह त्याने फिफा विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक योगदान देणाऱ्यांच्या यादीत पेले यांना मागे टाकून दुसरे स्थान मिळवले आहे. त्याच्या पुढे केवळ लिओनेल मेस्सी असून मेस्सीचे योगदान २७ आहे.

२०१४ च्या स्पर्धेपासून फ्रान्सच्या राष्ट्रीय संघाने विश्वचषकात ५३ गोल केले आहेत. या कालावधीत इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत ही संख्या किमान १६ ने अधिक आहे. दुसऱ्या स्थानावर जर्मनी आणि अर्जेंटिना (प्रत्येकी ३७ गोल) व त्यानंतर ब्राझील आणि नेदरलँड्सचा क्रमांक लागतो (प्रत्येकी ३६ गोल).

पहिला गोल केल्यानंतर, एमबाप्पेने धावत जाऊन प्रशिक्षक दिदिएर देशाम्प्स यांना मिठी मारून आनंद साजरा केला. देशाम्प्स हे फ्रान्सचा नॉर्वेविरुद्धचा गट-फेरीतील शेवटचा सामना असताना उपस्थित नव्हते, कारण आपल्या आईच्या अंत्यसंस्कारासाठी त्यांना मायदेशी जावे लागले होते. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे अंतिम ३२ फेरीचे सामने

**स्पेन वि. ऑस्ट्रीया**
**वेळ :** बुधवारी रात्री १२.३० वाजतापासून
**स्थळ :** लॉस एंजेलिस स्टेडियम, इंग्लिवूड

**पोर्तुगल वि. क्रोएशिया**
**वेळ :** गुरुवारी पहाटे ४.३० वाजतापासून
**स्थळ :** टोरोंटो स्टेडियम, टोरोंटो

# मेक्सिकोचा ४० वर्षांचा 'नॉकआऊट दुष्काळ' संपला

## इक्वेडोरला २-० ने नमवून 'अंतिम १६' मध्ये धडक

**मेक्सिको सिटी, १ जुलै**

सह-यजमान मेक्सिकोची फिफा विश्वचषकाची बाद फेरी गाठण्याची ४० वर्षांची प्रतीक्षा अखेर संपली. विश्वचषकाच्या नॉकआउट फेरीत पराभव पचवण्याची सवय मेक्सिकन चाहत्यांना झाली होती. या टप्प्यावर मेक्सिको संघाच्या चाहत्यांना तब्बल सात वेळा निराशा व दुःखाचा सामना करावा लागला होता, पण आता चित्र बदलले आहे.

पूर्वार्धात अवघ्या नऊ मिनिटांच्या अंतरात ज्युलियन क्विनोनेस व राऊल जिमेनेझने केलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीच्या जोरावर मेक्सिकोने इक्वेडोरचा २-० असा पराभव केला आणि बाद फेरीतील विजयाचा चार दशकांचा दुष्काळ संपवत उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

क्विनोनेसने २२ व्या मिनिटाला पहिला गोल केला, तर जिमेनेझने ३१ व्या मिनिटाला आणखी एक गोल नोंदविला. मेक्सिकोने १९८६ मध्ये स्पर्धेचे यजमानपद भूषवले होते; तेव्हा 'अंतिम-१६' मध्ये बल्गेरियाचा पराभव केल्यापासून त्यांना बाद फेरीतील सामना जिंकता आला नव्हता. विशेष म्हणजे, मेक्सिकोचे सध्याचे प्रशिक्षक जेवियर ॲग्युरी हे १९८६ च्या त्या संघात सुरुवातीच्या फळीतील मिडफिल्डर म्हणून खेळले होते.



इक्वेडोरविरुद्धचा अंतिम-३२ फेरीचा सामना जिंकल्यानंतर आनंद साजरा करताना मेक्सिकोचे खेळाडू

माझ्यासाठी हे खूप महत्त्वाचे आहे, कारण बाद फेरीत पुढे जाऊ न शकणाऱ्या खेळाडूंपैकी मी एक होतो, असे ॲग्युरी म्हणाले. आता आम्ही 'अंतिम-१६' मध्ये आहोत व चाहत्यांशी आमचे एक उत्तम नाते निर्माण झाले आहे. आम्ही एखाद्या कुटुंबासारखे आहोत. हे अद्भुत आहे, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# अखेरच्या क्षणी हालंडचा विजयी गोल

## आयव्हरी कोस्टला नमवून नॉर्वे पुढील फेरीत

**डॅलस, १ जुलै**

अर्लिंग हालंडने सामन्याच्या अखेरच्या क्षणी नाट्यमयरीत्या गोल करून नॉर्वेला आयव्हरी कोस्टवर २-१ असा विजय मिळवून दिला आणि फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत ब्राझीलसोबत अंतिम १६ संघांच्या लढतीत स्थान निश्चित केले. डॅलसमध्ये झालेल्या या तणावपूर्ण सामन्यात, ८६ व्या मिनिटापर्यंत मँचेस्टर सिटीचा हा स्ट्रायकर शांत होता, कारण अँटोनियो नुसा आणि अमाद डायलोने एकमेकांवर शानदार गोल केले होते.मध्यंतराच्या सहा मिनिटे आधी अँटोनियो नुसाने अप्रतिम गोल करून नॉर्वेला आघाडी मिळवून दिली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, सामन्याच्या सुरुवातीला न खेळलेल्या अमाद डायलोने बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरल्यावर बरोबरी साधली. पण सामना संपायला चार मिनिटे शिल्लक असताना अर्लिंग हालंडने नॉर्वेसाठी विजयी गोल केला. पॅट्रिक बर्गच्या पासवर हालंड योग्य ठिकाणी होता आणि त्याने सहा यार्डांवरून चेंडू ढकलत हा निर्णायक गोल केला.



विजयाचा शिल्पकार अर्लिंग हालंड

**नॉर्वेचा पहिल्यांदाच बाद फेरीत विजय**

पहिल्यांदाच विश्वचषक स्पर्धेतील बाद फेरीचा सामना जिंकल्यानंतर नॉर्वेचा उप-उपांत्यपूर्व फेरीचा सामना ब्राझीलशी होईल.

हालंडने नॉर्वेसाठी सलग १३ स्पर्धात्मक आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये गोल केले आहेत आणि त्याच्या ताज्या गोलमुळे त्याच्या देशाला प्रथमच विश्वचषक स्पर्धेतील बाद फेरीचा सामना जिंकण्यास मदत झाली.

## इक्वेडोरच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा

**मेक्सिको सिटी, १ जुलै**

फिफा विश्वचषकाच्या 'अंतिम-३२' फेरीच्या सामन्यात मेक्सिकोविरुद्ध २-० असा पराभव झाल्यामुळे दक्षिण अमेरिकन संघ इक्वेडोरचे फिफा विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आले आणि त्यानंतर सेबास्टियन बेक्कासेस यांनी मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला. स्पर्धेसाठी निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यात इक्वेडोरला अपयश आल्याने, कराराची मुदत संपल्यानंतर पद सोडणे हाच योग्य निर्णय असल्याचे या अर्जेंटिनी प्रशिक्षकाने सांगितले. विश्वचषक स्पर्धा संपणे म्हणजेच इक्वेडोर फुटबॉल महासंघासोबतचा त्यांचा करार संपणे होय, असे ऑगस्ट २०२४ मध्ये इक्वेडोरच्या प्रशिक्षकपदाची धुरा सांभाळणाऱ्या बेक्कासेस यांनी सांगितले. या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त करतानाच, त्यांनी कबूल केले की संघ स्वतःच्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही. ४५ वर्षीय बेक्कासेस यांनी आपल्या कार्यकाळात स्वतःवर विश्वास दाखवल्याबद्दल इक्वेडोर फुटबॉल महासंघाचे अध्यक्ष फ्रान्सिस्को एगास आणि संघटनेचे आभार मानले. ◂(वृत्तसंस्था)

# ईशान किशन टी-२० क्रमवारीत अव्वल

**दुबई, १ जुलै**

आयसीसीच्या ताज्या खेळाडूंच्या मानांकनानुसार, भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज ईशान किशन याने टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या यादीत आपला सहकारी अभिषेक शर्माची जागा घेत अव्वल स्थान पटकावले आहे. यासह, टी-२० क्रिकेटच्या या सर्वात छोट्या प्रकारात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अभिषेकचे जवळपास वर्षभरापासून असलेले वर्चस्व संपुष्टात आले आहे. ऑस्ट्रेलियाच्या ट्रॅव्हिस हेडने आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच कसोटी फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थान गाठले आहे.

बेलफास्ट येथे आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारताचा २-० असा पराभव झाल्यानंतर, बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसीच्या ताज्या मानांकनात ईशान किशनने कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग गुण मिळवत अभिषेकला मागे टाकले.

जवळपास १२ महिने अव्वल स्थानावर राहिलेला अभिषेक आता किशनपेक्षा केवळ सात रेटिंग गुणांनी मागे आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अव्वल मानांकन मिळवणारा इशान किशन हा विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव यांचा समावेश असलेल्या प्रतिष्ठित यादीतील केवळ चौथा भारतीय पुरुष फलंदाज ठरला आहे.

टी-२० फलंदाजीच्या मानांकनात आयर्लंडचा कर्णधार लॉर्कन टकर चार स्थानांची प्रगती करत संयुक्त ७७ व्या स्थानावर पोहोचला, तर भारताच्या विरोधात प्रभावी कामगिरी केल्यानंतर रॉस अडायर सहा स्थानांची सुधारणा करत ८४ व्या स्थानावर आला. ◂(वृत्तसंस्था)

# डॉ. देशपांडे संघाचा हबीब संघावर दिमाखदार विजय

## लिटिल चॅम्प १२ वर्षातील क्रिकेट स्पर्धा : विराज टकले सामनावीर

**सोलापूर, दि. १ जुलै-**

लिटिल चॅम्प १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत डॉ. देशपांडे संघाने हेमंत हबीब संघाचा ७ गडी राखून पराभव करत शानदार विजय मिळवला. विराज टकले याने केलेल्या उत्कृष्ट अष्टपैलू काम गिरीच्या जोरावर देशपांडे संघाने हा सामना एकतर्फी जिंकला.



जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत बुधवारी झालेल्या साम न्यात हेमंत हबीब संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, डॉ. देशपांडे संघाच्या अचूक गोलंदाजीसमोर त्यांचा डाव पत्त्यासारखा कोसळला. हेमंत हबीब संघाला २७.५ षटकांत सर्वबाद अवघ्या ९१ धावांपर्यंतच मजल मारता आली. प्रत्युत्तरादाखल ९२ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना डॉ. देशपांडे संघाने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट फलंदाजीचे प्रदर्शन केले. त्यांनी १५.२ षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात ९२ धावा करत ७ गडी राखून विजय मिळवला.

डॉक्टर देशपांडे संघाच्या विजयात एनजीसीए अकॅडमीच्या विराज टाकले याने म हत्वाची भूमिका बजावली. त्याने ४ षटकांत अवघ्या १३ धावा देत ३ महत्वपूर्ण बळी घेतले आणि त्यानंतर फलंदाजीतही १४ चेंडूंत नाबाद १७ धावांची संयमी खेळी केली. त्याच्या या दमदार कामगिरीमुळे त्याला 'सामनावीर' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# महात्मा फुले टेंभुर्णीच्या गाथा खडकेची युवा ऑलिम्पिकसाठी निवड



**टेंभुर्णी, दि. १ जुलै-**

टेंभुर्णी येथील डोळ्यांचे प्रसिद्ध डॉक्टर आनंद खडके यांची कन्या व येथील महात्मा फुले विद्यालयाची गाथा खडके हिची डाकर २०२६ युवा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारताच्या नेमबाजी संघात निवड झाली आहे.

कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि स्वतःवरील अढळ विश्वासाच्या बळावर गाथाने हे यश संपादन केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेच्या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने महात्मा फुले विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. गाथाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माजी, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, आमदार अभिजीत पाटील, तिसऱ्या आघाडीचे नेते रावसाहेब नाना देशमुख, वैभव कुटे, विद्यालयाचे संस्थापक नारायण भानवसे, मुख्याध्यापक विजय यादव तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विश्वनाथ, चंद्रिकाकडे मुष्टियुद्ध संघाचे नेतृत्व

**नवी दिल्ली, १ जुलै**

इंडोनेशियातील जकार्ता येथे ३ जुलैपासून सुरू होणाऱ्या आशियाई (१९ वर्षांखालील व २३ वर्षांखालील) मुष्टियुद्ध अजिंक्युपद स्पर्धेत भारत अनुभवी खेळाडू व उदयोन्मुख प्रतिभांचा समतोल असलेला संघ मैदानात उतरवणार आहे. या स्पर्धेत विद्यमान आशियाई विजेता विश्वनाथ सुरेश व 'वर्ल्ड बॉक्सिंग फ्यूचर्स कप'मधील सुवर्णपदक विजेती चंद्रिका भोरेश पुजारी भारताचे प्रतिनिधित्व करतील.

भारतीय मुष्टियुद्ध महासंघाने (बीएफआय) बुधवारी दोन्ही वयोगटांतील संघांची घोषणा केली. देशातील युवा बॉक्सरना आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव मिळवून देण्यासाठी आणि वरिष्ठ गटातील वाटचाल सुरू ठेवण्यासाठी ही स्पर्धा एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरेल, अशी अपेक्षा आहे.

या संघात गंगा, सागर जाखड, वंशज, हितेश, नीरज, आर्यन मलिक, रॉकी चौधरी, हेमंत सांगवान आणि ईशान कटारिया यांचाही समावेश आहे.

१९ वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील आशियाई अजिंक्यपद स्पर्धा या आमच्या युवा बॉक्सरसाठी 'एलिट' (वरिष्ठ) स्तरावर जाण्याच्या प्रवासातील अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. विविध वजनी गटांमध्ये आम्हाला खेळाडूंची चांगली गुणवत्ता आणि सखोलता दिसून येत आहे आणि हा गट भारतीय बॉक्सिंगचे भविष्य आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवण्यासाठी आवश्यक अनुभव व संधी आमच्या खेळाडूंना उपलब्ध करून देणे यावर आमचा मुख्य भर आहे, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)




# इंग्लंड, दक्षिण आफ्रिकेचा संघ सज्ज




इंग्लंड व दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू

### दुसरा उपांत्य सामना आज

इंग्लंड वि. दक्षिण आफ्रिका
**स्थळ :** ओव्हल मैदान
**वेळ :** रात्री ११. वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्टसवर

ओव्हल,

**ओव्हल, १ जुलै**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान दुसरा उपांत्य सामना खेळला जाणार असून या सामन्यासाठी इंग्लंडचे अव्वल तीन फलंदाज आणि दक्षिण आफ्रिकेचे वेगवान गोलंदाज - दोन्ही आपापल्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी सज्ज झाले आहेत. या सामन्यातील विजयी संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध विश्वविजेते पदासाठी रविवारी लॉर्ड्सवर अंतिम सामना खेळेल. मंगळवारी ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडीजवर ८ गड्यांनी विजय नोंदवून अंतिम फेरी गाठली आहे.

दक्षिण आफ्रिकेने आपल्या पाचपैकी चार साखळी सामने जिंकले असले, तरी त्यांच्या कामगिरीत इंग्लंडसारखा सहजपणा किंवा सातत्य दिसून आलेले नाही. काही प्रसंगी वैयक्तिक चमक दिसली असली, तरी लॉरा वोल्वार्ड, मारिझाने कॅप, ताझमिन ब्रिट्स आणि नादिन डी क्लर्क यांसारख्या बड्या खेळाडूंचा समावेश असूनही, त्यांची एकूण कामगिरी प्रतिस्पर्ध्यांवर दरारा निर्माण करणारी वाटलेली नाही.

इंग्लंडची सर्वात मोठी ताकद फिरकी गोलंदाजी राहिली आहे, तर दक्षिण आफ्रिकेच्या मोहिमेचा मुख्य आधार त्यांची वेगवान गोलंदाजी ठरली आहे. कॅप, शबनीम इस्माईल व आयाबोंगा खाका या प्रमुख बळी घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये होत्या; त्यांच्या वेगवान गोलंदाजांच्या फळीने एकत्रितपणे २५ बळी घेतले आहेत. इंग्लंडच्या उत्कृष्ट लयीत असलेल्या अव्वल फळीच्या फलंदाजांविरुद्ध त्यांची होणारी लढत उपांत्य फेरीचा निकाल ठरवण्यात निर्णायक ठरू शकते.

दक्षिण आफ्रिकेसाठी बाद फेरी काही नवीन नाही, कारण ते मागील दोन टी-२० विश्वचषकांमध्ये अंतिम फेरीपर्यंत पोहोचले होते. २०२३ मध्ये त्यांनी टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत इंग्लंडला स्पर्धेतून बाहेर काढले होते व गत वर्षी वन-डे विश्वचषकातही त्यांनी तीच कामगिरी पुन्हा करून दाखवली होती. त्या दोन्ही सामन्यांत वोल्वार्ड आणि ब्रिट्सच्या सलामीच्या जोडीने केलेल्या कामगिरीमुळेच इंग्लंडला पराभवाचा सामना करावा लागला होता; आता पुन्हा एकदा अंतिम फेरीत धडक मारण्यासाठी त्या इंग्लंडच्या सध्या उत्कृष्ट लयीत असलेल्या सलामीच्या जोडीपेक्षा सरस कामगिरी करू शकतात का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. ◂(वृत्तसंस्था)

# बार्शी नगरपरिषद सभेत पटलाबाहेरील विषयावर चर्चा

**९० मिनिटांपैकी ५२ मिनिटे झाली चर्चा**

**३८ मिनिटांत ४० विषयांची मंजूरी**

**पाणीटंचाईचा जिव्हाळ्याचा प्रश्न विरोधकांकडून उपस्थित**



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १ जुलै-**

बार्शी नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा मंगळवार दि. ३० जून रोजी कै. भाऊसाहेब झाडबुके स्मारक सभागृहात पार पडली. पिठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांनी कामकाज पाहिले. यावेळी मुख्याधिकारी तैमुर मुलाणी उपस्थित होते. मात्र, विषयपत्रिकेवरील ४० विषयांपेक्षा शहरातील तीव्र पाणीटंचाईचाच प्रश्न सर्वाधिक गाजला. ९० मिनिटांच्या कामकाजापैकी तब्बल ५२ मिनिटे पाणीप्रश्न व इतर विषयांवर चर्चा झाली. उर्वरित ३८ मिनिटांत विषयपत्रिकेवरील सर्व ४० विषयांना मंजुरी दिली.

कामकाजाच्या सुरुवातीलाच विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे यांनी अध्यक्षांची परवानगी घेऊन विषयपत्रिकेत नसतानाही शहरातील पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित केला. सत्ताधारी आणि प्रशासन विरोधकांचे ऐकत नसल्यामुळे सभागृहातच हा प्रश्न मांडावा लागत आहे, असे सांगत त्यांनी प्रशासनाला जाब विचारला.

यावर उत्तर देताना जलदाय अभियंता अजय होनखांबे यांनी नेहमीप्रमाणेच वीज व पाईपलाईन गळतीचे कारण दिले. उजनी धरणातील अपुरा पाणीसाठा, चांदणी तलावातून बंद पाणीपुरवठा यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याचे सांगितले. बार्शी शहराला दररोज अडीच कोटी लिटर पाण्याची गरज असताना उजनी धरणातून केवळ ९० लाख लिटर पाणी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. मात्र, त्या वर अक्कलकोटे यांनी आक्षेप घेत, दररोज ९० लाख लिटर पाणी उपलब्ध होत असेल तर चार दिवसांत ३ कोटी ६० लाख लिटर पाणी मिळते. अशा परिस्थितीत नागरिकांना नियमित चार दिवसाआड पाणी मिळायला हवे. प्रत्यक्षात अनेक भागांत १० ते १५ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे, असे सांगत प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

नगरसेवक ज्योतिर्लिंग कसबे यांनी नागरिकांना १०-१५ दिवस पाणी मिळत नसल्याने त्यांचे हाल होत असल्याचे सांगत, चालू वार्षिक पाणीपट्टीत ५० टक्के कपात करुन, ५० टक्केच पाणीपट्टी आकारण्याची मागणी केली. सत्ताधारी पक्षाचे विजय राऊत यांनी विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना, उजनी धरणातील कमी झालेला पाणीसाठा, चांदणी येथील बंद पुरवठा आदींमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. समांतर उजनी जलवाहिनीचे काम सुरू असून चारपदरी रस्त्याच्या कामामुळे काहीसा विलंब झाला आहे. आम्ही कोणत्याही प्रभागात विकासकामांमध्ये भेदभाव करत नाही, असे स्पष्ट केले. आमदार राजेंद्र राऊत यांनी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी एक वर्षाची मुदत मागितल्याची आठवणही करुन दिली.

सभागृह सुरु झाल्यानंतर तब्बल ३९ मिनिटांनी विषयपत्रिकेवरील कामकाज सुरु झाले. उर्वरित वेळेत सर्व ४० विषय मंजूर झाले. चर्चेत विरोधी पक्षाकडून ज्योतिर्लिंग कसबे, नवनाथ माळगे, विद्या बंगाळे, चांगुणा जाधव, गोदावरी शिंदे, मेहंदीमिया लांडगे, अनिकेत कारंडे तर सत्ताधारी पक्षाकडून संदेश काकडे, संतोष बारंगुळे, दिपक राऊत, विजय चव्हाण यांनी सहभाग घेतला.

**विकासकामांबाबत पक्षपाताचा विरोधकांकडून आरोप**

विरोधी नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागातील विकासकामांना जाणीवपूर्वक मंजुरी दिली जात नसल्याचा आरोप केला. लोकवस्ती नसलेल्या भागांतील कामांना प्राधान्य दिले जात आहे. विरोधी सदस्यांच्या प्रभागात लोकवस्ती असलेल्या भागात कामे करत नसल्याचा आरोप केला.

# ग्राहक आयोगात महावितरण हजर

**बार्शी नगरपालिकेच्या ऐतिहासिक विजयाचा परिणाम**

**१५ हजार रुपयांचा पी.आर. बॉण्ड सादर**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १ जुलै-**

महावितरणच्या अन्यायाविरोधात बार्शी नगरपालिकेने सोलापूर जिल्हा ग्राहक आयोगात ग्राहक तक्रार दाखल केली होती. ग्राहक आयोगाने नगरपालिकेच्या बाजूने निर्णय देऊन महावितरणला एक्स्प्रेस फीडर देण्याचे आदेश दिले. त्यानंतर राज्य ग्राहक आयोगानेही हा निर्णय कायम ठेवला. नंतर राष्ट्रीय ग्राहक आयोग, नवी दिल्ली यांनीही महावितरणची याचिका फेटाळून लावत नगरपालिकेचा विजय कायम ठेवला. अखेर नामुष्की झालेल्या महावितरणला जिल्हा ग्राहक आयोगात येवून १५ हजार रुपयांचा बॉण्ड सादर करावा लागला आहे.

बार्शी नगरपालिकेने शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक चांदणी जलशुद्धीकरण केंद्राला स्वतंत्र एक्स्प्रेस फीडर देण्याची मागणी अनेक वर्षांपूर्वी महावितरणकडे केली होती. महावितरणने त्यासाठी नगरपालिकेकडून ८,६३,३००/- रक्कम स्वीकारुनही प्रत्यक्ष एक्स्प्रेस फीडर न देता लिंकलाईनद्वारे वीजपुरवठा सुरु ठेवला. त्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होऊन शहराच्या पाणीपुरवठ्यावर गंभीर परिणाम होत होता. मात्र नगरपरिषदेने ग्राहक आयोगाकडे तक्रार दाखल केली. राष्ट्रीय आयोगाचा अंतिम निर्णय होऊनही आदेशाची पूर्ण अंमलबजावणी न झाल्याने बार्शी नगरपालिकेच्यावतीने सोलापूर जिल्हा ग्राहक आयोगात दरखास्त दाखल केली आहे.

दरखास्तीवर नुकत्याच झालेल्या सुनावणीवेळी महावितरणतर्फे वकील ग्राहक आयोगात हजर झाले. आयोगाच्या निर्देशानुसार महावितरणने १५ हजार रुपयांचा पी.आर. केला. आयोगाने तो स्वीकारला आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी आयोगाने ७ सप्टेंबरला ठेवली आहे. आदेशाच्या अंमलबजावणीबाबत पुढील कार्यवाही करणार आहे. आदेशाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी नगरपालिकेचा कायदेशीर पाठपुरावा सुरु असल्याचे ॲड. शिवाजी क्षीरसागर यांनी सांगितले. बार्शी नगरपालिकेच्यावतीने ॲड. शिवाजी क्षीरसागर, ॲड. पवन क्षीरसागर आणि ॲड अक्षय बिडबाग काम पहात आहेत.

# पारंपरिक 'आमटी' महाप्रसादाने श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रेचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग दि. १ जुलै-**

वळसंग येथील ग्रामदैवत श्री रामलिंग चौडेश्वरी देवीच्या वार्षिक यात्रा उत्सवाचा समारोप अत्यंत भक्तीमय वातावरणात झाला. यात्रा समाप्तीनिमित्त वळसंग येथील माळी समाजातर्फे भव्य आमटी जेवणाचे आयोजन केले होते.

पारंपरिक महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. काही दिवसांपासून वळसंग नगरीत श्री रामलिंग चौडेश्वरी देवीचा उत्सव थाटामाटात सुरू होता. विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चा आणि पालखी सोहळ्यानंतर यात्रेची सांगता झाली. यात्रेचा मुख्य आकर्षण असलेला माळी समाजाचा आमटी प्रसादाचा कार्यक्रम वळसंग आणि परिसरातील नागरिकांसाठी मोठा भक्तीचा सोहळा ठरला. माळी समाजातर्फे करण्यात येणारे हे आमटी जेवण केवळ एक महाप्रसाद नसून, तो वळसंग ग्रामस्थांच्या एकत्र येण्याचे आणि सामाजिक एकोप्याचे प्रतीक आहे. समाजातील अबालवृद्धांनी एकत्र येत अतिशय चविष्ट आणि पारंपरिक पद्धतीने आमटी-भाताचा महाप्रसाद तयार केला. हजारो भाविकांनी घेतला. महाप्रसादासाठी वळसंग गावासह आजूबाजूच्या परिसरातील हजारो भाविकांनी हजेरी लावली. यशस्वी आयोजनाबद्दल माळी समाजाचे कौतुक होत आहे.



# लायन्स क्लब रॉयल, तिरुपती ॲग्रिकल्चरल, लोकाशा सीड्सतर्फे सोयाबीन बियाणे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१ जुलै -**

कृषी दिनानिमित्त आज लायन्स क्लब बार्शी रॉयल, तिरुपती ॲग्रो एजन्सीज, लोकाशा सीड्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने तिरुपती ॲग्रो एजन्सीज येथे शेतकऱ्यांसाठी सोयाबीन बियाणे वाटप केले. याचा ४० शेतकऱ्यांनी लाभ घेतला.

पीडीजी लायन जितेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. पंढरपूर अर्बन बँकेचे माजी चेअरमन ला. राजीव कटेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन ला.शशिकांत बारबोले होते.

कार्यक्रमासाठी लोकाशा सीड्स प्रा.लि.चे मार्केटिंग हेड सुनील तोडकर, श्रेयस सर्जे, तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले व किशोर अंधारे, तिरुपती ॲग्रो एजन्सीजचे संचालक सचिन चव्हाण, शिवलाल खळदकर लायन्स क्लब बार्शी रॉयलचे पीडीजी जितेंद्र दोशी, ला. डॉ. तेजस लाड, ला. मनोज पाटील, ला. सुनिल पाटील, ला. मनीष रुगले, ला. राजेश खाडे, ला. संतोष गुळिमरे उपस्थित होते. लायन्स क्लब ऑफ बार्शी रॉयलचे नूतन अध्यक्ष ला. मंगेश बागुल, सेक्रेटरी ला.दयानंद रेवडकर, खजिनदार ला.उमेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. शशिकांत बारबोले यांनी केले तर आभारप्रदर्शन ला.दयानंद रेवडकर यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व लायन सदस्यांनी परिश्रम घेतले.

# कारची धडक; वृद्धाचा मृत्यू

**टेंभुर्णी, दि. १ जुलै-**

भरधाव कारने पादचारी वृद्धाला पाठीमागून धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना आज सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास अकोले बुद्रुक शिवारात घडली. याप्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात कार चालकावर गुन्हा दाखल झाला आहे.

अकोले बुद्रुक (ता. माढा. येथील रहिवासी अर्जुन थोरात (वय ६०) हे दिनकर कोतमिरे यांच्यासह टेंभुर्णी ते पंढरपूर रोडने पायी घराकडे येत होते. दरम्यान त्यांना पाठीमागून आलेल्या कार क्र. एम.एच १२ जी.आर ०५७६ ने जोरात धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी होउन उपचारापुर्वीच मरण पावले. कारचालक राजेंद्र बापूराव पवार (रा. निरवांगी ता. इंदापूर जि. पुणे) याच्याविरुद्ध मयताचे बंधू दिलीप थोरात (वय ५५) यांनी तक्रार दिली. याप्रकरणी गुन्हा सकाळी ९.५३ वा. दाखल करण्यात आला. घटनेचा पुढील तपास पो.हे.कॉ. जगताप हे करत आहेत.




# मंगळवेढ्यात आरोग्य खाते सील

**सीसीटीव्ही-व चौकशी अहवालावरून उलगडतील का सर्व पैलू ?**

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १ जुलै-**

मंगळवेढा नगरपालिकेच्या आरोग्य विभागात जंतुनाशक पावडर, फिनेल, फॉगिंग मशिन, ॲसिड इत्यादी साहित्याच्या खरेदी, पुरवठा आणि साठ्यात कथित तफावत आढळल्याची तक्रार उघड झाली आहे. तक्रारीची दखल घेत आरोग्य विभागाचे कार्यालय सील केले आहे.

नगरसेवक अरुण किल्लेदार, सोमनाथ माळी, अश्विनी धोत्रे, नागर गोवे आणि प्रिती सूर्यवंशी यांनी मुख्य अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन विभागाचे डेडस्टॉक रजिस्टर, स्टॉक बुक व चल-अचल संपत्ती नोंदींची सखोल चौकशी आणि शासकीय निधीचा संभाव्य गैरवापर तपासण्याची मागणी केली. त्यानूसार आरोग्य खाते सील केले आहे.

नागरिकांमध्ये आता प्रश्न निर्माण झाला आहे की या घटनेचे सगळे पैलू नगरपरिषदेकडील सीसीटीव्ही फुटेजमधून उलगडतील का? प्रशासनाकडून केलेल्या पंचनाम्याचा किंवा प्राथमिक चौकशीचा अधिकृत अहवाल सार्वजनिक केला जाईल की तो वरिष्ठ स्तरावर दडपला जाईल हा मुद्दा शहरवासीयांच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटना या प्रकरणात दोषी आढळल्यास कायदेशीर कारवाई व्हावी अशी मागणी करत आहेत; तर काहीजण प्रकरण शांतपणे दडपण्याचा धोका असल्याचा निष्कर्ष व्यक्त करत आहेत. आता या चौकशीकडे लक्ष लागले आहे.

# खराडे गेले... खैरदी आले!

**झेडपी बांधकाम विभागाची धुरा सोलापूरकरच्या अधिकाऱ्याकडे**

**प्रलंबित विकासकामांना मिळणार का वेग?**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्र. एकच्या कार्यकारी अभियंतापदी आसिफ खैरदी यांनी आज पदभार स्वीकारला. विद्यमान कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे यांची नांदेड जिल्हा परिषदेत बदली झाली आहे. दरम्यान नवीन अधिकाऱ्यामुळे प्रलंबित विकासकामांना गती मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्रमांक एकमध्ये कार्यकारी अभियंत्यांची बदली झाल्यानंतर, 'खराडे' गेले आणि 'खैरदी' आले, अशी चर्चा बुधवारी जिल्हा परिषद वतुर्ळात रंगली. राज्य शासनाच्या आदेशानुसार बदली प्रक्रिया राबविण्यात आली असून, त्यांच्या जागी महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्था, लातूर येथील कार्यकारी अभियंता आसिफ परवेझ खैरदी यांनी पदभार स्वीकारला.




दरम्यान, पदभार स्वीकारल्यानंतर खैरदी यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांची भेट घेऊन कामकाजाची माहिती घेतली. त्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांची सदिच्छा भेट घेतली. वैद्य यांनी शाल देऊन त्यांचा सत्कार करत शुभेच्छा दिल्या.

आसिफ खैरदी हे मूळचे सोलापूरचे असून, यापूर्वी त्यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यात उपअभियंता म्हणून काम केले आहे. त्यानंतर महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्था, लातूर येथे कार्यकारी अभियंता म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण रस्ते, शाळा, आरोग्य केंद्रे आणि इतर विकासकामांचा त्यांना अनुभव आहे.

स्थानिक कामाचा अनुभव, प्रशासकीय कौशल्य आणि विकासकामांचा अभ्यास याच्या बळावर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**खैरदींपुढे निधीच्या योग्य वापराचे आव्हान**

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. अनेक कामे विविध टप्प्यांत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रलंबित कामांना गती देणे, दर्जेदार कामांवर भर देणे आणि निधीचा वेळेत वापर करून विकासकामे पूर्ण करणे ही खैरदी यांच्यासमोरील प्रमुख आव्हाने असणार आहेत.

## महत्वाचे...



### नाट्य दिग्दर्शिका विजया मेहता यांना सोलापुरात वाहिली श्रद्धांजली

**सोलापूर, दि. १ जुलै-**

नाट्य दिग्दर्शिका विजया मेहता यांनी अभिनेते नाना पाटेकर, विक्रम गोखले यांच्यासारखे दिग्गज कलावंत मराठी रंगभूमी व सिनेक्षेत्राला दिले आहेत. मेहता म्हणजे कलाकार घडवण्याची फॅक्टरीच होती अशा शब्दात विठ्ठल बडगंची यादी काही विजय मेहता यांना श्रद्धांजली वाहिली आहे. कै. विजया मेहता यांच्यामुळेच मराठी प्रायोगिक व समांतर रंगभूमीला जागतिक दर्जा मिळाला आहे. हा दर्जा मिळवून देण्याकरता त्यांचे कार्य मोठे आहे मराठी भाषिक नसतानाही त्यांनी मराठी नाटक, सिनेमा हे कार्यक्षेत्र निवडले आणि त्याच्यामध्ये लावलो की मिळिवला होता. असामान्य प्रतिभावंत कर्तुत्ववान दिग्दर्शिका विजया मेहता यांचा सोलापूरच्या वतीने सन्मानाचा कार्यक्रम करण्यात आला होता. त्या कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्याचे मला भाग्य मिळाले. याचा आज अभिमान वाटतो. असामान्य कर्तृत्ववान असूनही त्या डाऊन टू अर्थ होत्या. त्यांच्या निधनामुळे मराठी नाट्य व रंगभूमीचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. चौफेर कलावंत घडविणारी मेहता सरखी दुसरी व्यक्ती निर्माण होणे दुमिळ आहे.




### फॅबटेकच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**सांगोला,दि. १ जुलै-**

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी माजी विद्यार्थिनी ऋतुजा जवंजाळ उपस्थित होत्या. मनोगतात उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कर्तृत्वातून महाविद्यालयाचे नाव देशभर उज्वल करावे असे आवाहन केले. प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे यांनी विद्यार्थ्यांना यशासाठी सातत्य, मेहनत आणि शिस्त यांचे महत्त्व पटवून दिले. विभागप्रमुख प्रा.विशाल भाकरे यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रा.शरद आदलिंगे यांनी व्यावसायिक आयुष्यात गुणवत्तेला आणि नैतिकतेला प्राधान्य देण्याचा सल्ला दिला. सूत्रसंचालन प्रा.पृथ्वीराज गुंड यांनी केले. आभार डॉ.वाघेशा मथडा यांनी मानले.



### मोडनिंब भाजपच्या वतीने ॲड. संजना साळुंके यांचा सत्कार

**मोडनिंब, दि. १ जुलै-**

मोडनिंब (ता. माढा) येथील ॲड. संजना साळुंके यांनी सिंहगड लॉ कॉलेज, पुणे येथून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत वकिलीची पदवी संपादन केली. यशाबद्दल भाजप महिला मोर्चा, मोडनिंब यांच्या वतीने त्यांचा भाजप महिला मोर्चा मंडल अध्यक्ष अर्चना सावंत, मोडनिंब शहराध्यक्ष मनीषा गिड्डे, एससीएसटी सेल शहराध्यक्ष अक्षता निचाळ यांनी सत्कार केला. हा कार्यक्रम भाजप तालुकाध्यक्ष योगेश पाटील, भाजयुमोचे अध्यक्ष प्रशांतराजे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी भाजप नेते वैभव मोरे, सोमनाथ टिंगरे, दीपक सुर्वे, कोषाध्यक्ष युवा मोर्चा अभिजीत महाडीक, युवा शहराध्यक्ष अनिकेत गुरव, ओबीसी सेल सरचिटणीस शहाजी माळी, गणेश सावंत, संदीप गलांडे, डॉ. रणधीर गिड्डे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### सोमय्या यनगंदुल



**सोलापूर, दि. १ जुलै-**

विडी घरकुल येथील पाणी टाकीजवळील सोमय्या पापय्या यनगंदुल यांचे बुधवार (१ जुलै) सकाळी साडेसहा वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते नॅशनल इन्शुरन्स कंपनीचे निवृत्त सहायक व्यवस्थापक होते.



# विश्वास, विकास और जनकल्याण की नई यात्रा



## सुरक्षित, स्वस्थ और समृद्ध मध्यप्रदेश

विकास तब सार्थक होता है जब उसका लाभ समाज के प्रत्येक व्यक्ति तक पहुंचे और शासन की योजनाएं केवल घोषणाओं तक सीमित न रहकर लोगों के जीवन में वास्तविक परिवर्तन का माध्यम बनें। इसी सोच के साथ मध्यप्रदेश में स्वास्थ्य सेवाओं के विस्तार, सामाजिक सुरक्षा के सुदृढ़ीकरण, डिजिटल सुशासन, आधुनिक अधोसंरचना, निवेश संवर्धन तथा धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन जैसे विविध क्षेत्रों में निरंतर कार्य किया जा रहा है। उद्देश्य केवल सुविधाएं बढ़ाना नहीं, बल्कि नागरिकों के जीवन को अधिक सुरक्षित, स्वस्थ, सम्मानजनक और अवसरों से परिपूर्ण बनाना है। आयुष्मान भारत निरामयम् जैसी स्वास्थ्य सुरक्षा योजनाओं से लेकर प्रधानमंत्री आवास योजना, मुख्यमंत्री संबल योजना, साइबर तहसील, सम्पदा 2.0, ई-ऑफिस, जल जीवन मिशन, मेट्रो रेल परियोजनाओं और निवेश प्रोत्साहन योजनाओं तक, विकास का यह मॉडल शासन को अधिक संवेदनशील, पारदर्शी और नागरिक केंद्रित बना रहा है। आधुनिक चिकित्सा सुविधाओं का विस्तार, तकनीक आधारित सेवाओं की उपलब्धता, आधारभूत संरचना का सुदृढ़ीकरण तथा समावेशी कल्याण की यह सतत यात्रा विकसित मध्यप्रदेश की मजबूत नींव तैयार कर रही है, जहां विकास का केंद्र सरकार नहीं, बल्कि प्रत्येक नागरिक का बेहतर जीवन है।

## हर नागरिक के लिए बेहतर स्वास्थ्य का संकल्प



चिकित्सकीय परामर्श देते डॉक्टर

स्वस्थ नागरिक ही समृद्ध समाज और विकसित राज्य की सबसे बड़ी पूंजी होते हैं। इसी सोच के साथ मध्यप्रदेश में स्वास्थ्य सेवाओं के विस्तार, आधुनिक चिकित्सा अधोसंरचना के विकास तथा गरीब और जरूरतमंद परिवारों को बेहतर उपचार उपलब्ध कराने की दिशा में निरंतर कार्य किया जा रहा है। आयुष्मान भारत निरामयम् योजना के माध्यम से लाखों परिवारों को उपचार सुरक्षा मिली है, वहीं मातृ एवं शिशु स्वास्थ्य, गंभीर बीमारियों के उपचार तथा चिकित्सा शिक्षा के विस्तार के लिए भी अनेक महत्वपूर्ण कदम उठाए गए हैं। प्रदेश में नए मेडिकल कॉलेजों की स्थापना और स्वास्थ्य सुविधाओं का विस्तार चिकित्सा सेवाओं को अधिक सुलभ और प्रभावी बना रहा है।

### प्रमुख योजनाएं

**आयुष्मान भारत निरामयम् मध्यप्रदेश**
- पात्र परिवारों को सूचीबद्ध अस्पतालों में निःशुल्क उपचार की सुविधा उपलब्ध कराकर गुणवत्तापूर्ण स्वास्थ्य सेवाओं तक पहुंच सुनिश्चित की जा रही है।

**मुख्यमंत्री बाल हृदय उपचार योजना**
- गंभीर हृदय रोग से पीड़ित बच्चों के उपचार के लिए आर्थिक सहायता प्रदान कर उन्हें नया जीवन देने की संवेदनशील पहल।

**मातृ एवं शिशु स्वास्थ्य कार्यक्रम**
- गर्भवती महिलाओं, नवजात शिशुओं और बच्चों के स्वास्थ्य संरक्षण के लिए अनेक योजनाओं का प्रभावी संचालन।

**मेडिकल कॉलेज विस्तार कार्यक्रम**
- प्रदेश में चिकित्सा शिक्षा एवं विशेषज्ञ स्वास्थ्य सेवाओं की उपलब्धता बढ़ाने के लिए नए मेडिकल कॉलेजों और स्वास्थ्य संस्थानों का विकास।

### प्रमुख बातें
- हर जरूरतमंद तक उपचार की पहुंच
- मातृ एवं शिशु स्वास्थ्य पर विशेष ध्यान
- गंभीर बीमारियों के उपचार में सहायता
- चिकित्सा अधोसंरचना का निरंतर विस्तार
- स्वास्थ्य सुरक्षा से सशक्त समाज

## सम्मानजनक जीवन और समावेशी विकास




### गरीब एवं सामाजिक सुरक्षा

समावेशी विकास का उद्देश्य केवल आर्थिक प्रगति नहीं, बल्कि समाज के कमजोर और जरूरतमंद वर्गों को सुरक्षा और सम्मान प्रदान करना भी है। मध्यप्रदेश सरकार गरीब परिवारों, श्रमिकों, वरिष्ठ नागरिकों, दिव्यांगजनों तथा अन्य पात्र हितग्राहियों के लिए अनेक सामाजिक सुरक्षा योजनाएं संचालित कर रही है। पक्का आवास, खाद्यान्न सुरक्षा, पेंशन, श्रमिक कल्याण और सामाजिक सहायता जैसी योजनाएं लाखों परिवारों के जीवन में स्थिरता और आत्मविश्वास का आधार बन रही हैं।

### प्रमुख बातें
- गरीब परिवारों के लिए आवास सुरक्षा
- खाद्यान्न सुरक्षा का मजबूत तंत्र
- श्रमिकों के लिए सामाजिक संबल
- समावेशी विकास की दिशा में सतत प्रयास
- जरूरतमंदों को नियमित सहायता




प्रधानमंत्री आवास का लाभार्थी परिवार

### प्रमुख योजनाएं

**प्रधानमंत्री आवास योजना**
- पात्र परिवारों को पक्का और सुरक्षित आवास उपलब्ध कराने की महत्वपूर्ण पहल।

**मुख्यमंत्री संबल योजना**
- असंगठित क्षेत्र के श्रमिक परिवारों को सामाजिक सुरक्षा एवं विभिन्न परिस्थितियों में आर्थिक सहायता।

**सामाजिक सुरक्षा पेंशन योजनाएं**
- वृद्धजन, दिव्यांगजन एवं निराश्रित व्यक्तियों को नियमित आर्थिक सहायता।

**खाद्यान्न सुरक्षा कार्यक्रम**
- राष्ट्रीय खाद्य सुरक्षा व्यवस्था के अंतर्गत पात्र परिवारों को रियायती अथवा निःशुल्क खाद्यान्न उपलब्ध कराया जा रहा है।

## निवेश, नवाचार और नई संभावनाओं का विस्तार



जल जीवन मिशन के अंतर्गत नल कनेक्शन

### अधोसंरचना, निवेश एवं पर्यटन

आधुनिक अधोसंरचना किसी भी विकसित राज्य की आर्थिक प्रगति का आधार होती है। मध्यप्रदेश में सड़क, शहरी परिवहन, जलापूर्ति, औद्योगिक निवेश तथा धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन को नई गति देने के लिए अनेक महत्वपूर्ण परियोजनाएं संचालित की जा रही हैं। भोपाल और इंदौर मेट्रो परियोजनाएं आधुनिक शहरी परिवहन की दिशा में महत्वपूर्ण कदम हैं। जल जीवन मिशन और अमृत मिशन जैसी योजनाएं नागरिक सुविधाओं को सुदृढ़ बना रही हैं। निवेश प्रोत्साहन नीतियों तथा धार्मिक पर्यटन के विकास से प्रदेश आर्थिक और सांस्कृतिक दोनों क्षेत्रों में नई पहचान बना रहा है।

### प्रमुख योजनाएं

**मेट्रो रेल परियोजना**
- भोपाल और इंदौर में आधुनिक, सुरक्षित और पर्यावरण अनुकूल सार्वजनिक परिवहन व्यवस्था का विकास।

**जल जीवन मिशन**
- हर घर तक नल से स्वच्छ पेयजल उपलब्ध कराने का व्यापक अभियान।

**अमृत मिशन**
- शहरी जलापूर्ति, सीवरेज तथा बुनियादी नागरिक सुविधाओं का विस्तार।

**औद्योगिक निवेश संवर्धन**
- निवेशकों के लिए अनुकूल वातावरण, सिंगल विंडो सुविधा तथा नए उद्योगों को प्रोत्साहन।

**धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन विकास**
- उज्जैन, ओंकारेश्वर, अमरकंटक, चित्रकूट सहित प्रमुख तीर्थ एवं पर्यटन स्थलों का समग्र विकास तथा सिंहस्थ 2028 की तैयारियां।

### प्रमुख बातें



महाकाल लोक

- धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन का विस्तार
- आधुनिक परिवहन व्यवस्था
- हर घर तक जल पहुंचाने का अभियान
- निवेश और रोजगार को नई गति
- पारदर्शी और समयबद्ध प्रशासन
- विकसित मध्यप्रदेश की मजबूत अधोसंरचनाप्राथमिकता

## तकनीक के साथ पारदर्शी और त्वरित सेवाएं

### डिजिटल सुशासन

डिजिटल तकनीक ने शासन व्यवस्था को अधिक पारदर्शी, सरल और नागरिक केंद्रित बनाने में महत्वपूर्ण भूमिका निभाई है। मध्यप्रदेश डिजिटल सुशासन के क्षेत्र में लगातार नवाचार कर रहा है। राजस्व सेवाओं से लेकर संपत्ति पंजीयन, पुलिस व्यवस्था, लोक सेवाओं की ऑनलाइन उपलब्धता और कार्यालयीन कार्यप्रणाली तक तकनीक का व्यापक उपयोग किया जा रहा है। इससे नागरिकों का समय बच रहा है, पारदर्शिता बढ़ रही है और सेवाओं की गुणवत्ता में निरंतर सुधार हो रहा है।

D19086/26




लोक सेवा केंद्र

### प्रमुख नवाचार

**साइबर तहसील**
- नामांतरण सहित विभिन्न राजस्व प्रकरणों के डिजिटल और समयबद्ध निराकरण की अभिनव व्यवस्था।

**सम्पदा 2.0**
- संपत्ति पंजीयन प्रक्रिया को अधिक पारदर्शी, सुरक्षित और सुविधाजनक बनाने वाला आधुनिक डिजिटल प्लेटफॉर्म।

**ई-जीरो एफआईआर**
- ऑनलाइन शिकायत दर्ज करने की सुविधा के माध्यम से नागरिकों को त्वरित पुलिस सहायता।

**एमपी ई-सेवा**
- विभिन्न शासकीय सेवाओं को एकीकृत डिजिटल प्लेटफॉर्म पर उपलब्ध कराने की व्यवस्था।

### प्रमुख बातें
- घर बैठे अनेक सरकारी सेवाएं
- डिजिटल राजस्व सेवाएं
- तकनीक आधारित सुशासन
- नागरिक सुविधा सर्वोच्च प्राथमिकता
- पारदर्शी और समयबद्ध प्रशासन

## जनकल्याण से जनविश्वास, जनविश्वास से जनसमृद्धि और जनसमृद्धि से विकसित मध्यप्रदेश की ओर निरंतर अग्रसर

# सोलापूर महापालिकेची विशेष स्वच्छता मोहीम सुरु

**महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते शुभारंभ**

**पहिल्या दिवशी उचलला १० टन कचरा, ११ ब्रास आजोरा**

**९ दिवसांत शहरातील ७२ भागांत राबविणार स्वच्छतेची मोहीम**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जुलै-**

पावसाळ्यात शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्याच्या उद्देशाने सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या नऊ दिवसीय विशेष स्वच्छता मोहिमेचा बुधवारी महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज चौक येथे शुभारंभ करण्यात आला. अभियानास प्रारंभ करण्यापूर्वी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व सफाई कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. बुधवारी पहिल्या दिवशी १० टन कचरा आणि ११ ब्रास आजोरा उचलण्यात आला.

मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे यांच्या मार्गदर्शनाखाली सफाई अधीक्षक सूर्यकांत लोखंडे, सफाई अधीक्षक (वाहन) वासुदेव नडीमेटला, झोन क्रमांक १ चे मुख्य आरोग्य निरीक्षक बच्चू यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी व सफाई कर्मचारी हे महापालिकेतर्फे ९ जुलैपर्यंत शहरातील प्रत्येक झोनमधील निवडक भागांमध्ये एकूण ७२ ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबवितील. या मोहिमेत मुख्य रस्ते, चौक, सार्वजनिक ठिकाणे, नाले, गटारी आणि विविध वस्त्यांची व्यापक स्वच्छता केली जाणार आहे. साचलेला गाळ व माती काढणे, झुडपे व गवत हटविणे, कचरा उचलणे, रस्त्यांची स्वच्छता तसेच डास प्रतिबंधक उपाययोजनांवर विशेष भर दिला जाणार आहे. 'स्वच्छ, सुंदर आणि निरोगी सोलापूर घडविण्यासाठी नागरिकांनी कचरा उघड्यावर न टाकता घंटागाडीतच द्यावा. नागरिकांच्या सहकार्याशिवाय स्वच्छतेचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकत नाही,या मोहिमेत नागरिक, विद्यार्थी, बचत गटांच्या महिला तसेच

### मोहिमेसाठी अशी आहे यंत्रणा

बुधवारी पहिल्याच दिवशी या मोहिमेत शहरातील महापालिकेच्या आठ झोन अंतर्गत एकूण दहा टन कचरा आणि ११ ब्रास दगड, माती आजोरा उचलण्यात आला. या मोहिमेसाठी आठ झोन अंतर्गत २२२ सेवकांनी परिश्रम घेतले. यासाठी चार जेसीबी, चार डंपर आणि ११ घंटागाड्या अशी यंत्रणा कार्यरत होती, अशी माहिती महापालिका नियंत्रण अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी दिली.

### महापौर, उपमहापौरांसह नगरसेवकांचा मोहिमेत सहभाग

महापौर विनायक कोंड्याल,उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक बिज्जू प्रधाने, नगरसेविका मंदाकिनी तोडकरी, नगरसेवक समाधान आवळे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी शशिकांत भोसले यांच्यासह मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे यांनी हाती झाडू घेऊन या स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

## ▶▶ महत्वाचे...



### बायकोची छेडछाड करता म्हणून विचारल्याने पतीला मारहाण

**सोलापूर, दि. १ जुलै-**

तुम्ही माझ्या बायकोची का छेडछाड करता म्हणून विचारणा करणाऱ्या एका नवऱ्याला तिघा जणांनी मिळून दगड व लाथा बुक्याने म रहाण केल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील हंजगी गावात मंगळवारी दुपारी घडली. भागन्ना भिमन्ना कोळी (वय २६ वर्ष राहणार हंजगी) असे मारहाण झालेल्या त्या नवऱ्याचे नाव असून मंगळवारी दुपारी तुम्ही माझ्या बायकोची छेडछाड का करता म्हणून विचारणा केली असता तू कोण विचारणारा म्हणून त्याला समीर शेख, अनिरुद्ध मस्के, बाबासाहेब माने या तिघांनी मिळून मारहाण केली. यावेळी भांडण सोडविण्यास आलेल्या महादेव करेप्पा मस्के (रा.सदर) यांनाही मारहाण झाली. त्यामुळे ते दोघे अक्कलकोट आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात रात्री स्वतः दाखल झाले.

### आजाराच्या ४० औषधी गोळ्या खाल्ल्याने तरुण बेशुध्द

**सोलापूर, दि. १ जुलै-**

दारूचे नशेमध्ये एका तरुणाने मानसिक आजाराच्या ३५ ते ४० औषधी गोळ्या एक साथ खाऊन बेशुद्ध झाल्याची घटना सुत मिल येथे मंगळवारी रात्री नऊ वाजता घडली. शरणप्पा शिवानंद हरके (वय २७ वर्ष, रा. सुतमिल, अक्कलकोट रोड सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव असून त्याने मंगळवारी रात्री घरात दारूच्या नशेत असताना त्याच्या स्वतःच्या मानसिक आजारावरील ३५ ते ४० गोळ्या एक दमात खाऊन टाकल्या. यात त्रास होऊन तो जागेवर बेशुद्ध होऊन पडला. त्यामुळे त्याला उपचारासाठी भाऊ सिद्धप्पा याने आज बुधवारी पहाटे सव्वा एक वाजता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.



### घरात झोपल्या ठिकाणी वृध्द इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १ जुलै-**

घरात झोपल्या ठिकाणी एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना न्यू रमाबाई आंबेडकर नगरात मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता उघडकीस आली. कचरू लक्ष्मण साळवे (वय ८३ वर्ष, मूळ राहणार सिद्धार्थ नगर चाळ, वडाळा ईस्ट ,मुंबई.सध्या रा. सोलापूर) असे त्या मयत महिलेचे नाव असून त्या मंगळवारी सायंकाळी घरात झोपले असताना नातेवाईकांनी त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला. मात्र ते बेशुद्ध असल्याचे त्यांना आढळून आले. त्यामुळे नातू सम्यक याने उपचारासाठी त्यांना येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## उपळाईचे साहित्यिक डॉ. शरद गोरे यांच्या कार्याची अमेरिकेच्या 'वर्ल्ड बुक'मध्ये नोंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**



माढा तालुक्यातील उपळाई येथील कवी, लेखक, साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्या अतुलनीय आणि ऐतिहासिक साहित्यिक कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे.

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाच्या 'वर्ल्ड बुक' मध्ये त्यांच्या या अथांग कार्याची जागतिक विक्रम म्हणून नोंद करण्यात आली आहे. गेल्या ३३ वर्षांपासून मायमराठीच्या संवर्धनासाठी अविरत झटणाऱ्या डॉ. गोरे यांच्या या बहुमानामुळे संपूर्ण मराठी जगतातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

साहित्य विश्वात डॉ. शरद गोरे हे एकमेव असे व्यक्तिमत्त्व आहे, ज्यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून आजवर तब्बल १९६ मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. विशेष म्हणजे, शासनाच्या कोणत्याही अनुदानावर अवलंबून न राहता ही सर्व संमेलने केवळ लोकवर्गणीतून पार पडली आहेत. यामध्ये ग्रामीण, नवोदित, युवा, पर्यावरण, शिक्षक, तसेच महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नारायण सुर्वे, जनकवी पी. सावळाराम, राजकुमार काळभोर यांच्या नावांनी सुरू केलेल्या प्रबोधनपर संम`लनांचा समावेश आहे. इतकेच नव्हे तर, त्यांनी 'मॉरिशसमध्ये आंतरराष्ट्रीय मराठी संमेलन' घेऊन मराठीची पताका सातासमुद्रापार फडकवली आहे. लेखक, दिग्दर्शक, अभिनेता आणि संगीतकार अशा अष्टपैलू भूमिकेतून त्यांनी ५ मराठी चित्रपटांची निर्मिती केली आहे. त्यांच्या 'एक प्रेरणादायी प्रवास - सूर्या' या चित्रपटाला कान्स आणि बर्लिन सारख्या जागतिक चित्रपट महोत्सवांमध्ये गौरवण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील २३ जिल्हा परिषद शाळांना इयत्ता पाचवीची मंजुरी

**जि. प. शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१ जुलै -**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातच दर्जेदार उच्च प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील निकषांची पूर्तता करणाऱ्या जिल्ह्यातील २३ जि.प.प्रा. शाळांमध्ये इ.५ वीचा वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ होणार असून ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे. केदार-सावंत यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश



मिळाले असून त्यांच्या शिफारशीनुसार जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी वर्गवाढीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. शासन निर्णयातील सर्व अटी व निकषांची पडताळणी करूनच हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी अनेक गावांतील विद्यार्थ्यांना चौथीनंतर पुढील शिक्षणासाठी शेजारच्या गावात जावे लागत होते. वाहतुकीची अडचण, आर्थिक परिस्थिती आणि सुरक्षिततेच्या कारणांमुळे अनेक विद्यार्थी, विशेषतः मुली, शिक्षण अर्धवट सोडत असल्याची समस्या निर्माण होत होती. आता गावातच पाचवीच्या वर्ग उपलब्धतेमुळे विद्यार्थ्यांची शाळा गळती रोखण्यास मोठी मदत होईल. तसेच पालकांचा आर्थिक व मानसिक ताणही कमी होणार आहे. यामुळे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायद्याचा उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य होईल.

### शिक्षणाला मोठे बळ

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी २३ जि.प.शाळांमध्ये इ.५ वी सुरू करण्यास मंजुरी मिळाली, ही आनंदाची बाब आहे. या निर्णयामुळे शाळा गळती कमी होऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठे बळ मिळेल. शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी आमचे प्रयत्न यापुढेही सुरू राहतील. ग्रामीण भागातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा आम चा सातत्यपूर्ण प्रयत्न राहणार आहे.

**- चेतनसिंह केदार-सावंत,**
**शिक्षण व आरोग्य सभापती**

# शिक्षक, पदोन्नती आणि आरोग्य भरतीला गती

**जिल्ह्यातील हजारो कर्मचाऱ्यांना लवकरच दिलासा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

जिल्हा परिषदेच्या शिक्षण आणि आरोग्य विभागातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शिक्षक भरती, पदोन्नती आणि आरोग्य विभागातील रिक्त पदभरती प्रक्रियेला आता गती मिळण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे शिक्षक, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले, शिक्षण विभागातील रिक्त शिक्षक पदे भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. याचबरोबर दीर्घकाळ प्रलंबित असलेली शिक्षक पदोन्नती प्रक्रियाही लवकर पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही सुरू आहे. शिक्षण विभागातील पदोन्नतीमुळे पात्र शिक्षकांना न्याय मिळणार असून, रिक्त पदे भरल्याने शाळांमधील अध्यापन व्यवस्थाही अधिक सक्षम होईल. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.



आरोग्य विभागात ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्यामुळे आरोग्य सेवा विस्कळीत होत असल्याचे वास्तव आहे. या रिक्त जागा तातडीने भराव्यात, यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश आबिटकर तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यात अडचणी येत असून विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यास आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळण्याबरोबरच नागरिकांनाही अधिक सक्षम सेवा उपलब्ध होणार असल्याचे सावंत यांनी स्पष्ट केले.

# तंत्रज्ञानाची कास धरा, शेतीला समृध्दीची दिशा द्या

**कृषी दिनी जि.प. अध्यक्ष दीपक वैद्य यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जुलै-**

आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जलसंधारण आणि सुधारित शेती पद्धतींचा अवलंब केल्यास कमी खर्चात अधिक उत्पादन घेणे शक्य असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी केले. राज्यस्तरीय पीक स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ९ शेतकऱ्यांनी स्थान मिळवत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या यशस्वी शेतकऱ्यांचा गौरव करताना भविष्यातील शेती तंत्रज्ञानाधारित करण्यावर भर देण्यात आला.

अध्यक्ष दीपक वैद्य म्हणाले, 'आज शेतीसमोर उत्पादन खर्चात वाढ, हवामान बदल आणि पाण्याचे संकट अशी मोठी आव्हाने आहेत. त्यामुळे पारंपरिक पद्धतींपेक्षा आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज आहे. एका एकरातून दोन एकरांइतके उत्पादन मिळिवण्याचे ध्येय ठेवून शेतकऱ्यांनी शेती करावी. पावसाचे पाणी अडवा-जिरवा, जलसंधारणाची कामे वाढवा आणि प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करा.'

बदलत्या हवामानाचा शेतीवर वाढता परिणाम लक्षात घेता आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, शाश्वत पीक व्यवस्थापन आणि शासनाच्या योजनांचा प्रभावी लाभ घेणे ही काळाची गरज असल्याचा संदेश कृषी दिनानिमित्त जिल्हा परिषदेत आयोजित कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय पीक स्पर्धेतील




### शेतकरी, उत्कृष्ट अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान

राज्य, जिल्हा आणि तालुकास्तरीय पीक स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळिवणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांनाही गौरविण्यात आले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि वृक्षरोप देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कृषी विभागातील उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. शासनाच्या कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, शेतकरी हितासाठी केलेले उल्लेखनीय कार्य आणि उत्कृष्ट प्रशासकीय सेवेसाठी त्यांना गौरविण्यात आले.

विजेत्या शेतकऱ्यांसह कृषी विभागातील उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, आत्मा सोलापूर आणि जिल्हा परिषद कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सभागृहात कृषी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रम ास मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडाशेट्टी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ॲड. अमृता वाघे यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी, कृषी शास्त्रज्ञ आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमात कृषी तज्ज्ञांनी बी.बी.एफ. तंत्रज्ञान, बीज प्रक्रिया, एकात्मिक कीड व्यवस्थापन, सुधारित बियाणे, आंतरपीक पद्धती, तूर पिकासाठी गोदावरी वाण, लिंबोळीच्या बियांचा नैसर्गिक कीटकनाशक म्हणून वापर, तसेच तुषार आणि ठिबक सिंचन व ग्रीन मल्चिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. कडधान्ये आणि तेलबिया उत्पादन वाढविण्यावरही विशेष भर देण्यात आला. मार्डी येथील प्रगतिशील शेतकरी संतोष तोडकर यांनी पाणी फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली बी.बी.एफ. तंत्रज्ञानाचा अवलंब करून कमी बियाण्यात अधिक उत्पादन कसे घेता येते, याचे अनुभव कथन केले. तर शेतकरी गंगाधर बिराजदार यांनी सुधारित गोदावरी वाण वापरून तूर पिकात उच्चांकी उत्पादन घेतल्याची माहिती दिली. शंकर शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबी विहीर योजनेचा लाभ घेत शेती विकासाचा आदर्श उभा केला. गाईच्या शेणापासून विविध उपयुक्त उत्पादने आणि सेंद्रिय कीटकनाशक निर्मितीचेही प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

### शेतकरी हा देशाचा कणा

'शेतकरी हा देशाचा कणा आहे. कृषी संस्कृती जपण्यासाठी आणि शेतकऱ्यांपर्यंत नव्या योजना पोहोचविण्यासाठी जिल्हा परिषद सातत्याने प्रयत्नशील राहील. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी प्रगतशील शेतकऱ्यांनी इतर शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**- कुशल जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी**

### शेतकरी हा देशाचा अन्नदाता

'राजा राज्य चालवतो; मात्र शेतकरी संपूर्ण देश चालवतो. शेतकरी हा देशाचा अन्नदाता असून त्याच्या कष्टावर देशाची अर्थव्यवस्था उभी आहे.'

**-ॲड. अमृता वाघे,**
**सभापती महिला व बालकल्याण समिती**

## शेतकऱ्यांना पेरणीसाठी मोफत खते व बी-बियाणे द्या

**ॲड. रेवण भोसले यांची मागणी**

**सोलापूर, दि. १ जुलै-**

महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यात शेतकऱ्यांची अवस्था सध्या अत्यंत बिकट आहे. त्यातच दुष्काळसदृश्य परिस्थिती, शेतीमालाला नसलेला भाव व वाढत्या कर्जामुळे शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी आता शेतकऱ्यांना पेरणीसाठी खते व बी बियाणे महाराष्ट्र सरकारने मोफत देण्याची मागणी समाजवादी नेते ॲड. रेवण भोसले यांनी केली आहे.



पेरणीच्या तोंडावर वेळेत मोफत किंवा अनुदानित बियाणे व खते न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजाने सावकाराच्या दारात जावे लागते. शेतकऱ्याकडे पैसे नसल्यामुळे व पेरणीचा काळ निघून जात असल्यामुळे उद्भवणारी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. शेतीची झालेली दैना, निसर्गाची अवकृपा, बाजारातील पडलेले मालाचे भाव व डोक्यावर वाढलेला कर्जाचा डोंगर यामुळे आज शेतकरी सर्व बाजूंनी पुरता उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे अशा अत्यंत कठीण व संकटाच्या प्रसंगी महाराष्ट्र शासनाने राज्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या सर्व शेतकऱ्यांना पेरणीसाठी खते व बी बियाणे मोफत देण्याची मागणी ॲड. भोसले यांनी केली आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१४८९

**तैसी निंदा आणि स्तुति। नये कोण्हेचि व्यक्ति।**
**नाहीं अंधारे कां वाती। सूर्याघरीं।।**

ज्ञानी भक्त हा देहाविषयी अत्यंत उदासिन असतो. त्याला देहाचा अजिबात अभिमान असत नाही. मी नांवाची भाषा त्याच्या मनालाही शिवत नाही. सुख आणि दु:ख हे गुणातीताला समान असल्याने तो आत्मस्वरुपाच्या ठिकाणी स्थिर झालेला असतो. वस्त्राच्या पाठी-पोटी धाग्यावाचून कांही असत नाही, त्याप्रमाणे चराचरात एका ईश्वरावाचून कांही नाही, असे तो मानतो. सर्वत्र सम पाहणारा आणि देहापासुन निर्माण होणारे सुख -दु:ख विचारात न घेणारा ख-या अर्थाने सुखी झालेला असतो. आत्मज्ञानी व्यक्ति देहाचीच भाषा विसरला असल्याने सुखामुळे समाधान आणि दु:खामुळे असमाधान अशी परिस्थिती त्याच्यासाठी निर्माण होत नाही. झोपी गेलेल्या माणसाच्या शेजारी साप आला काय किंवा सुदर स्त्री आली काय, त्याला त्याचा कांहीही परिणाम जाणवत नाही. त्याला हे दोन्ही समानच असतात. अगदी त्याप्रमाणे हा ज्ञानी देहाविषयी झोपलेलाच असल्याने, त्याला सुख दु:ख समान असतात. सोने-माती, हिरा-गारा यांतील फरकही तो जाणत नाही. त्याचे मन सुख-दु:खाच्या भोगासाठी उठत नाही. हा ब्रम्ह आहे म्हणून याची स्तुती करावी किंवा हा अधम आहे म्हणून त्याची निंदा करावी असे याच्या मनातही येत नाही. इतरांच्या बाबतीत असो किंवा स्वव:च्या बाबतीते असो, याला निंदा-स्तुतीशी कांहीही देणेघेणे नसते. सुर्याच्या घरी अंधार-उजेड अशी कल्पनाच नसते, त्याप्रमाणे ब्रम्हस्वरुप झालेल्या भक्तच्या ठिकाणी सुख दु:खाची कल्पना नसते. हे सांगतांना माऊली म्हणतात, **तैसी निंदा आणि स्तुति। नये कोण्हेचि व्यक्ति। नाहीं अंधारे कां वाती। सूर्याघरीं।।**



आत्मज्ञानी व्यक्ति शत्रू-मित्र असा भेद जाणत नाही. त्याप्रमाणे राग द्वेष नांवाचा प्रकार तो स्वत:कडे ठेवत नाही. सहजासहजी झालेल्या प्रिय-अप्रिय भोगाने तो सुखी-दु:खी होत नाही. एखादा भोग मिळविण्यासाठी तो कांहीही करत नाही. निती-नियमाला अनुकुल असे कर्म करणे, आणि हे कर्म त्या कर्माच्या फलात न लिंपता करणे एवढाच त्याचा उदयोग असतो. खरे म्हणजे बुध्दीने स्थिर राहणा-या स्वत:ला मी न म्हणणा-या, निती-नियमाला अनुकुल असेच कार्य करणा-या व्यक्तिंची ख-या अर्थाने समाजाला गरज आहे. समाजाला आहे, म्हणजे पर्यायाने आपणालाही हीच गरज आहे. ही गरज पूर्ण करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. आपण स्वत;ला मी-मी, माझे-माझे म्हणत असल्यानेच सुख-दु:ख, चिंता, द्वेष, वाद-विवाद निर्माण होत आहेत. आपणाला इतरांची निंदा करणे आवडते, पण आपली कोणी निंदा केली तर राग येतो. इतरांची स्तुती करणे आपल्या बुध्दीला पटत नाही, मात्र पात्रता नसतनाही इतरांनी आपली स्तुती करावी असे आपणाला मनापासून वाटते. या निंदा-स्तुतीतुन आपण बाहेर पडणे आवश्यक आहे. यासाठी आपण प्रथम मी तून बोहर निघण्याचा प्रयत्न करु या. मी-मी म्हणण्यामुळेच निंदा आणि स्तति आपल्या जवळ चिटकून बसल्या आहेत साची जाण राहीली तर मी तून बोहर निघणे अवघड नाही.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# ‘एनएचएम’ कर्मचाऱ्यांना न्याय; अधिसंख्य पदनिर्मितीला मंजुरी

## १० वर्षांहून अधिक सेवा असलेल्या १५ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा मार्ग मोकळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ कंत्राटी स्वरूपात सेवा बजावणाऱ्या राज्यातील १५ हजार १० कर्मचाऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. या कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनासाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली असून, त्यासाठी वार्षिक १,१५३.६० कोटी रुपयांच्या खर्चालाही हिरवा कंदील दाखविण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय मंगळवारी जारी करण्यात आला.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून नियमितीकरणाच्या प्रतीक्षेत असलेल्या एनएचएम कर्मचाऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर हा निर्णय साकार झाला. शासन निर्णयानुसार, २५ जून २०२६ पर्यंत तांत्रिक खंड वगळता सलग दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना एकवेळच्या विशेष बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्ती दिली जाणार आहे. सार्वजनिक आरोग्य व ग्रामविकास विभागातील नियमित मंजूर पदांशी समकक्षता निश्चित करून आवश्यकतेनुसार इतर विभागांतील पदांचाही विचार केला जाणार आहे.

पदांची समकक्षता निश्चित करताना कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या, शैक्षणिक पात्रता, सेवा प्रवेश नियम, विद्यमान मानधन आणि सातव्या वेतन आयोगानुसार लागू वेतनश्रेणी यांचा आधार घेतला जाईल. वित्त विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित विभागांकडून अधिसंख्य पदे निर्माण करून पात्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल.

समायोजित कर्मचाऱ्यांना संबंधित पदाच्या वेतनश्रेणीतील किमान मूलभूत वेतन, महागाई भत्ता आणि प्रवास भत्ता देण्यात येणार असून, त्यांचे विद्यमान वेतनही संरक्षित राहणार आहे. मात्र, या कर्मचाऱ्यांना पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना, निवृत्तीवेतन किंवा कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ मिळणार नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत लागू असलेल्या रजाच त्यांना लागू राहतील.

शासनाने अधिसंख्य पदे ही व्यक्तीसापेक्ष असल्याचे स्पष्ट केले आहे. संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर, राजीनामा दिल्यानंतर किंवा अन्य कारणाने सेवा संपुष्टात आल्यानंतर ती पदे आपोआप रद्द होतील. त्या पदांवर पुन्हा नियुक्ती करता येणार नाही तसेच अनुकंपा तत्त्वावरही नियुक्ती दिली जाणार नाही.

भविष्यात अशा प्रकारच्या नियमितीकरणाची प्रकरणे निर्माण होऊ नयेत यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातील मनुष्यबळाची नियुक्ती प्रामुख्याने बाह्यस्त्रोत किंवा सेवा करार पद्धतीने करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच भविष्यातील पदनिर्मितीचे सर्व प्रस्ताव वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या मंजुरीनंतरच अंतिम करण्यात येणार आहेत. राज्यभरातील हजारो एनएचएम कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सेवा समायोजनाच्या मागणीला अखेर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.



# कर्जमाफीसाठी ७ हजार ६९४ थकीत कर्जदारांचा तपशील अपलोड

## जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली आहे, या अनुषंगाने सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने जिल्ह्यातील ७ हजार ६९४ थकीत कर्जदारांचा तपशील पोर्टलवर अपलोड करण्यात आहे, अशी माहिती सहकारी संस्था सोलापूर चे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिली आहे.

सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाच्या वतीने या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती



बँकेला कर्जदारांचा तपशील पोर्टलवर माहिती अपलोड करण्याचे आवाहन केले असता बँकेच्यावतीने संपूर्ण कर्जदार खातेदाराची माहिती पोर्टलवर अपलोड केली आहे. यामध्ये उत्तर सोलापूर १५६, दक्षिण सोलापूर ३०६, पंढरपूर ८५७, सांगोला ४७२, माळशिरस १००९, बार्शी ३४४, करमाळा १००३, मोहोळ ७२६, करमाळा १००२, अक्कलकोट २४०, मंगळवेढा १५७९ आदींचा समावेश आहे.

# ‘डब्ल्यूआयटी’मध्ये इंटेलिजंट हायड्रॉलिक सिस्टिम्स सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

उद्योग क्षेत्राच्या गरजा आणि अभियांत्रिकी शिक्षण यांच्यातील दरी कमी करून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या उद्देशाने वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे इंटेलिजंट हायड्रॉलिक सिस्टिम्स सेंटर ऑफ एक्सलन्स तसेच १५० किलोवॅट फ्लुइड पॉवर टेस्ट लॅबचे उद्‌घाटन वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त वैभव गांधी यांच्या हस्ते झाले.




या केंद्रामध्ये उपलब्ध करण्यात आलेली १५० किलोवॅट क्षमतेची फ्लुइड पॉवर टेस्ट लॅब विद्यार्थ्यांना हायड्रॉलिक प्रणालींचे डिझाइन, कार्यपद्धती, कार्यक्षमता परीक्षण आणि तांत्रिक विश्लेषण यांचे प्रशिक्षण देणार आहे. ही सुविधा डॅनफॉस इंडस्ट्रीज प्रा. लि. यांच्या सहकार्याने उभारण्यात आली असून आधुनिक फ्लुइड पॉवर, हायड्रॉलिक नियंत्रण प्रणाली आणि औद्योगिक अनुप्रयोग यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

याप्रसंगी डॅनफॉस इंडस्ट्रीज प्रा. लि.चे सिनिअर डायरेक्टर व सेंटर हेड राहुल वळे, इंजिनिअरिंग लॅबचे डायरेक्टर सुधाकर सांगळे, सिनिअर मॅनेजर मनोज घोडमारे, फायनान्स कंट्रोलर राजेश जाधव, मॅनेजर टेस्ट लॅब सचिन कामटी, डेप्युटी मॅनेजर तेजस तुपे, ऑपरेशनल एक्सलन्स इंजिनिअर भागेश जगताप, भूपेश मालखेडे, निखिल गोरे, महेश वाघमारे, सचिव डॉ. रणजित गांधी, भूषण शहा, पराग शहा, प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन गेंगजे, डॉ. भाग्येश देशमुख उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार,
दि. २ जुलै २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ कृ. द्वितीया
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- उत्तराषाढा (०९.२६)
योग - वैधृति (१६.३८)
करण - वणिज (२२.३१)
राहू काल : गुरूवार
दु. ०१.३० ते ०३.००

**दिनविशेष :**
**१६९८: थॉमस सेव्हरी यांनी जगात पहिल्यांदाच स्टीम इंजिनचे पेटंट मिळवले.**
**१८५०: बेंजामिन लेन यांना गॅस मास्कचे पेटंट मिळाले.**
**१९००: जर्मनीमधील फ्रीडरिक्सहाफेन गावाजवळ झेपलिनचे पहिले यशस्वी उड्डाण पार पडले.**
**१९७६: व्हियेतनाम युद्ध संपल्यानंतर, उत्तर व्हियेतनाम आणि दक्षिण व्हियेतनामचे एकत्रीकरण झाले.**

# स्मार्ट मीटरची कार्यवाही थांबवा : संभाजी आरमार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्यावतीने नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. जनतेचा त्याला विरोध असून ही भावना संभाजी आरमारने महावितरण कार्यालयाकडे निवेदनाने पोहोचवली. सक्तीने असे मीटर बसविले जाऊ नये अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली. वाढीव बिल येत आहे अशा ठिकाणी महावितरणने काही फॉल्ट असेल तर तो दुरुस्त करून द्यावा अशी देखील मागणी केली. जनतेच्या अडचणी दूर झाल्या नाहीत तर संघटना आंदोलन करेल असा इशारा देण्यात आला.

यावेळी संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, शशिकांत शिंदे, गजानन जमदाडे, सागर दासी, व्दारकेश बबलदीकर, तेजस चौधरी, मनिष काळे, सुधाकर करणकोट, महिला आघाडीचे उमा रजपूत, गीता पवार, लक्ष्मी गायकवाड, प्रमोद जगताप, विकी ठेंगले, गणेश नागणे, संतोष मदराल आदि उपस्थित होते.

# शिक्षण विभागात प्रशासकीय फेरबदल

## वेतन व पीएफ निधी शाखेची जबाबदारी भरत कारसले यांच्याकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

शिक्षण विभागातील प्रशासकीय कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी महत्त्वाचा आदेश जारी करत माध्यमिक वेतन व भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) शाखेच्या अतिरिक्त कार्यभारात बदल केला आहे.

या आदेशानुसार प्राथमिक वेतन व भविष्य निर्वाह निधी शाखेचे अधीक्षक भरत कारसले यांच्याकडे माध्यमिक शाखेचाही अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

यापूर्वी ही जबाबदारी उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांच्याकडे तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आली होती. मात्र प्रशासकीय कारणास्तव त्यांच्याकडील अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यात आला असून आता ही जबाबदारी भरत कारसले यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत राहणार आहे.

अधीक्षक लक्ष्मण बालवाड यांना २८ जून रोजी अटक झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. त्यामुळे माध्यमिक शिक्षकांच्या वेतन, भविष्य निर्वाह निधी तसेच संबंधित आर्थिक प्रशासकीय कामांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी विभागीय स्तरावर तातडीने हा निर्णय घेण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

भरत कारसले यांनी आपल्या मूळ पदाचा कार्यभार सांभाळत नव्या जबाबदारीचा स्वीकार करून त्याचा अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे वेतन प्रकरणे, जीपीएफ प्रस्ताव, निवृत्तीविषयक कागदपत्रे आणि प्रलंबित प्रशासकीय कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

शिक्षण विभागातील आर्थिक व्यवहार सुरळीत राहावेत आणि शिक्षक-कर्मचाऱ्यांची गैरसोय टळावी, या उद्देशाने हा प्रशासकीय फेरबदल करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी : अभाविप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संभाव्य पेपरफुटी आणि गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या भविष्याशी गंभीर खेळ झाला असून या प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केली आहे. आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सोलापूर महानगराच्या वतीने टीईटी परीक्षेतील पेपरफुटी व गैरव्यवहाराचा तीव्र निषेध करण्यात आला.

अभाविपने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संभाव्य पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी, दोषींवर कठोर फौजदारी कारवाई, विद्यार्थ्यांचे नुकसान लक्षात घेऊन लवकरात लवकर नव्या तारखेला परीक्षा घेणे तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा व्यवस्थेत संरचनात्मक व तांत्रिक सुधारणा तातडीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही. शासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद राज्यभर तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही परिषदेने दिला आहे.




# लायन्स इंन्टरनॅशनल झोन सोशल पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

लायन्स इंटरनॅशनल प्रांत ३२३४ डी १, रिजन १, झोन ५च्या वतीने सिध्देश्वर पेठ येथील हॉटेल समृध्दी झोन सोशल पुरस्कार वितरण संपन्न झाले.

यावेळी व्यासपीठावर ॲड. श्रीनिवास कटकुर यांच्या हस्ते, झोन. ५ चेअरमन सोमशेखर भोगडे, झोन सचिव नागेश बुगडे यांची उपस्थिती होती. रिजन १, झोन ५ मध्ये लायन्स क्लब ऑफ सांगोला, लायन्स क्लब सोलापूर मेट्रो, लायन्स क्लब ऑफ सोलापूर व्टीन सिटी, लायन्स क्लब सांगोला क्लबचे अध्यक्ष प्रा. नवनाथ बंडगर, सचिव सूर्यकांत कांबळे, खजिनदार मंगेश म्हमाणे, लायन्स क्लब सोलापूर मेट्रो अध्यक्ष विश्वनाथ आवटे, सचिव विश्वनाथ आमणे, खजिनदार रजिया शेख, कॅबिनेट ऑफिसर मेहबूब शेख, लायन्स क्लब ऑफ सोलापूर व्टीन सिटीचे अध्यक्षा डॉ. कृष्णा चंडक, सचिवा नंदिनी जाधव, खजिनदार प्रभाकर जवळकर या लायन मान्यवराच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, शाल, बुके होते.

झोन चेअरमन लायन सोमशेखर भोगडे यांनी स्वागत करुन प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केले. यावेळी डॉ. राहुल चंडक, सागर पुकाळे, मुकुंद जाधव, अध्यक्ष सातलिंग शटगार, नवनिर्वाचित प्रथम उपाध्यक्ष संतोष जाधव, अशोक भांझे, लायन जुंजा, लायन कुलकर्णी, लायन दामा यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन ममता बुगडे यांनी केले.

# महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेला ४१ कॉल

## सर्व तक्रारींवर तातडीने केली कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

आर्द्रा नक्षत्राच्या मुसळधार पावसाने रविवारी सोलापूर शहराला चांगलेच झोडपून काढले. दिवसभर सुरू असलेल्या पावसामुळे अनेक भागांत पाणी साचणे, घरांमध्ये पाणी शिरणे, ड्रेनेज तुंबणे तसेच झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाला एकाच दिवसात तब्बल ४१ तक्रारी प्राप्त झाल्या.

विशेष म्हणजे, प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेत संबंधित विभागाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत सर्व तक्रारींचे निवारण केले. शहरातील नई जिंदगी परिसरातील सिद्धेश्वर नगर, अक्कलकोट रस्त्यावरील कर्णिक नगर येथील शनी मंदिर परिसर, निर्मिती विहार, जगजीवनराम झोपडपट्टीलगतचे दुर्गा मंदिर, मोदीखाना, रामलाल चौक, रामलाल चाळ परिसर, प्रभाग क्रमांक २० मधील ब्रह्मदेव नगर, गैबीपीर



झोपडपट्टी, महेश नगर पार्किंग, सलगर वस्ती रिक्षा स्टॉप, न्यू हायस्कूललगतचा गणेश नगर, जय भवानी मैदान, गवळी वस्ती, देगाव नाका, पारशी विहीर, कादरी हॉस्पिटल परिसर, इकारा मशिद, राजेश्वरी नगर तसेच जुन्या आयएमएस शाळेजवळील भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. संबंधित ठिकाणी पाणी उपसण्यासह ड्रेनेजची सफाई करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.

याशिवाय, कुमठेकर हॉस्पिटलजवळील बगीचा परिसर आणि आसरा कल्याण नगर येथील डी-मार्टजवळ झाडे कोसळल्याच्या तक्रारीही नियंत्रण कक्षाला प्राप्त झाल्या. महापालिकेच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून झाडे हटवून वाहतूक सुरळीत केली.

मुसळधार पावसामुळे शहरातील विविध भागांत निर्माण झालेल्या परिस्थितीवर महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेने रात्रभर सतर्क राहून काम केले. नागरिकांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद देत सर्व ठिकाणी आवश्यक उपाययोजना केल्याने संभाव्य मोठे नुकसान टळल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.



# उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांचा वृक्षस्नेही म्हणून गौरव


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

वृक्षदाई प्रतिष्ठान, श्रीक्षेत्र देहू यांच्या वतीने आयोजित निर्मल वारी हरित वारी अभियानांतर्गत वटपौर्णिमेच्या निमित्त वटवृक्ष लागवड व वृक्षपूजन झाले. यावेळी पर्यावरण संरक्षणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला लोकप्रतिनिधींचा वृक्षस्नेही म्हणून सन्मान केला. यामध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांना पर्यावरण विषयक कार्याबद्दल सन्मानपत्र व संत तुकाराम महाराजांची अभंग गाथा प्रदान करून सन्मान करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. शिवाजीराव महाराज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली देहू परिसरात मोठ्या प्रमाणावर वडाच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास नवी मुंबईच्या महापौर सुजाताताई पाटील, पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषाताई नागपुरे, पिंपरी-चिंचवडच्या उपमहापौर, देहूच्या नगराध्यक्षा पूजाताई दिवटे, पोलीस उपायुक्त श्वेताताई खेडकर, सारिकाताई शेळके तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कुर्डुवाडी शहराध्यक्षपदी सोमनाथ माळी

**कुर्डुवाडी, दि. १ जुलै-**

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कुर्डुवाडी शहराध्यक्षपदी सोमनाथ अजगरे (माळी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी नियुक्तीपत्राद्वारे जाहीर केली आहे. यावेळी दर्शन काशीद, सागर गायकवाड, सुरज गायकवाड, विश्वसिंह भोसले, अर्शद मुलाणी, विनोद घाडगे, रोहित परबत, नागन्नाथ पवार, रावसाहेब मुसळे, अस्लम शेख, बंडू टोणपे, सुमित काशीद, यशवंत साळवे, प्रवीण गायकवाड, विजू जानराव, सचिन तावडे, राजेंद्र कांबळे, साहिल बागवान, दिनेश माळी, जब्बार बागवान व दत्तात्रय माळी उपस्थित होते.



## वटपौर्णिमेनिमित्त मानेगावात निसर्गपूरक उपक्रम

**वैराग, दि. १ जुलै-**

निसर्गाचे रक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचा सामाजिक संदेश देत, आज बार्शी तालुक्यातील मानेगाव येथे वटपौर्णिमेचे औचित्य साधून एकता महिला मंचच्या वतीने एक गाव - एक वडाचे झाड हा उपक्रम राबविण्यात आला. मानेगाव येथील महिलांनी एकत्र येत, निसर्गाला सर्वाधिक प्राणवायू (ऑक्सिजन) देणाऱ्या वडाच्या झाडाचे पारंपरिक पद्धतीने आणि भक्तीभावाने पूजन केले. केवळ पूजा अर्चा करून न थांबता, पर्यावरण रक्षणाचा दृढ संकल्प करत या महिलांनी वडाच्या नवीन रोपाचे रोपण केले. यावेळी लक्ष्मी मोरे, संगीता डाके, अश्विनी माळी, सुरेखा डाके, स्वाती वाघमारे उपस्थित होत्या.



## पिलीव परीसरात वटपौर्णिमा साजरी

**पिलीव, दि. १ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमा म्हणजेच वटपौर्णिमा सण साजरा करण्यात आला. पतीच्या दीर्घ आयुष्यासाठी उत्तम आरोगयासाठी, अखंड सौभाग्य लाभावे म्हणून सुवासिनींनी वडाच्या झाडाची पूजा करीत सात जन्माच्या सहजिवनाची प्रार्थना केली. पिलीव परिसरातील कुसमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी परीसरातील सर्वच भागात वटपौर्णिमा हा सण उत्साहात साजरा करण्यात आला.



## सलगर गावात कारहुणवी सण साजरा

**सोलापूर, दि. १ जुलै-**

महाराष्ट्र कर्नाटकच्या सीमेवर असलेले सलगर गावचे वटपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी होणाऱ्या कारहुणवी यात्रेसाठी कर्नाटक महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग दरवर्षी मोठ्या प्रमाणात यात्रा पाण्यासाठी व बैल जोडीची शर्यती पाहण्यासाठी गर्दी केलेली असते. ही यात्रा जिल्ह्यातच नाही तर महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. श्री जय हनुमान मंदिराभोवती या यात्रेचा आयोजन केलं जात आणि त्याच ठिकाणी बैलांच्या शर्यती घेतल्या जातात. परंपरेनुसार १९६५ पासून आजपर्यंत ही परंपरा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या गावात हिंदू-मुस्लिम व इतर धर्माचे जातीचे लोक ही गुण्यागोविंदाने राहतात. सलगर कारहुनवी यात्रा म्हणजे सर्व धर्म समभावाचे प्रतीक आहे, असे मत सलगर येथे कन्नड नाटकाचे उद्घाटन करताना सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले. यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या उद्घाटनाप्रसंगी सलगर येथे बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर सातलिंग गुंडरगी, सुमंत पाटील, अशोक शटगार, मल्लिनाथ भासगी, भारत समाने, बसवराज कुंभार, भीमराव सोलापुरे दौलप्पा कोळी शरण पाटील, संजय समाने, सिद्धाराम धसाडे, गुरुनाथ कालीवते, श्रीशैल पाटील, सुभाष भडोळे, बसवराज चिकमळ, आसिफ पटेल, शेखर बिराजदार, भास्कर आरेनकेरी, अप्पू बागवान, अशोक बिराजदार, संजय डोंगराजे, चंद्रकांत बिराजदार, शेखर भादोळे, अशोक कोळी, पिंटू जेटली, विजय माशाळे, महादेश समाने, सुनील पाटील उपस्थित होते.

# असभ्य नृत्य; सात जणांवर गुन्हा

### पडोळकरवाडी येथे विनापरवाना काढली कारहुणवीनिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १ जुलै-**

पडोळकरवाडी येथे जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांचा जमावबंदीचा आदेश असतानाही त्याचे उल्लंघन करुन कारहुणवी निमित्त गाण्यावर महिला कलाकारांना असभ्य नृत्य करण्यास लावल्या प्रकरणी दिलीप झंजे, सुनिल कोळेकर, नवनाथ बुरुंगले, दत्ता बुरुंगले, राहुल सोनलकर, तेजीराम वाघमोडे, बिरा झंजे या सात जणाविरुध्द बंदी आदेशाचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, पडोळकरवाडी येथे दि.२९ रोजी रात्री ७ वाजता गावातून मिरवणूक सुरु असून यामध्ये साऊंडसिस्टीम लावून महिला कलाकारांना गाण्यावर असभ्य नृत्य करण्यास लावले जात असल्याचा एक निनावी फोन पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांना प्राप्त होताच त्यांनी फिर्यादी पोलीस अंमलदार अजयसिंह शिंदे, महिला पोलीस हवालदार वंदना अहिरे (घोडके), पोलीस हवालदार पलुसकर, पोलीस अंमलदार कारंडे यांना सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाठवून पाहणी केली असता पोलीसांना पाहून ते सर्व निघून जात असल्याचे निदर्शनास येताच पोलीसांनी सखोल चौकशी करुन वरील सात जणाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान यामध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन विना परवाना केल्याचे व जमावबंदी आदेश असतानाही त्यांनी पाच कार्यक्रम आयोजन करुन सहा साऊंड सिस्टीम भाड्याने बोलावून घेवून ट्रॅक्टरवर लाऊन महिला कलाकाराकडून असभ्य नृत्य करुन घेतल्याचे पोलीसांच्या चौकशीत उघड झालेश

मंगळवेढा पोलिसांत बी.एन.एस. २२३ (अ) मुंबई पोलीस कायदा कलम ११०/११७, १३५,३३ (१) प्रमाणे पोलीस अंमलदार अजयसिंह शिंदे यांनी फिर्याद दाखल केली आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार कोष्टी हे करीत आहेत.

## आरडाओरडा करू नका म्हटल्याने महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. १ जुलै-**

आमच्या घरासमोर आरडाओरडा करू नका असे म्हटल्याने एका महिलेला तिघा-चौघा जणांनी मिळून लाथा बुक्क्याने मारहाण केल्याची घटना जय मल्हार चौक येथे मंगळवारी रात्री घडली. राणी अनिल अलदर (वय ३० वर्ष, रा.जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या महिलेचे नाव असून मंगळवारी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास त्या घराजवळ असताना त्यांनी तुम्ही आमच्या घरासमोर आरडाओरडा का करू नका असे म्हटले असता तू कोण विचारणारी असे म्हणून तिला सोनी व इतर तीन जणांनी मिळून लाथा बुक्याने मारहाण केली. त्यात सर्व अंगाला मुका मार लागल्याने तिला उपचारकरिता येथील शासकीय रुग्णालयात पती अनिल याने रात्री दाखल केले.

## जामगाव (आ) येथे वडाच्या झाडाचे रोपण अन् संगोपनाची शपथ

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १ जुलै-**



वटपौर्णिमेचे औचित्य साधून केवळ धार्मिक विधी न करता पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एकता महिला मंचच्या वतीने 'एक गाव-एक वडाचे झाड' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत बार्शी तालुक्यातील जामगांव (आ) येथील महिला सदस्यांना दोन दिवसांपूर्वी वडाचे झाड (रोप) देण्यात आले होते. आज, दिनांक २९ जून २०२६ रोजी वटपौर्णिमेच्यामुहूर्तावर या झाडाचे अत्यंत भक्तीभावाने पूजन करून त्याचे यशस्वी रोपण करण्यात आले. या पर्यावरणपूरक सोहळ्याप्रसंगी 'एकता महिला मंच'च्या प्रमुख पदाधिकारी सरिता कुलकर्णी आणि स्नेहल तळेकर यांच्यासह गावातील इतर महिला सदस्या उपस्थित होत्या.

## डाळिंब फुलांचा शब्दोत्सव अंतर्गत सांगोल्यात राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जुलै-**

पलपब प्रकाशन संस्था अहमदाबाद (गुजरात), महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा सांगोला, सांगोला अर्बन बँक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद सांगोला महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने डाळिंब फुलांचा शब्दोत्सव २०२६ या विशेष उपक्रमांतर्गत या वर्षाचे विविध मानाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. हा पुरस्कार वितरण सोहळा मंगळवार दि. ७ जुलै रोजी दु.२ ते ५ या वेळेत महात्मा फुले सभागृह, सांगोला अर्बन बँक येथे संपन्न होणार आहे.

तसेच या कार्यक्रमात सांगोला तालुका व परिसरातील अनेक नामवंत व उदयोन्मुख कवींना सादरीकरणासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजकांच्या वतीने मनिषा ठोंबरे यांनी दिली.

> या सोहळ्यात प्रा.पी.सी.झपके, डॉ. प्रभाकर माळी यांना पलपब जीवन गौरव पुरस्कार, डॉ.शरद गोरे यांना पलपब समाजभूषण पुरस्कार, डॉ. कृष्णा इंगोले आणि डॉ. अविनाश सांगोलकर यांना पलपब साहित्यभूषण पुरस्कार, प्रा.धनाजी चव्हाण आणि डॉ. शीतल घोंगडे यांना पलपब शब्दसाधना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

## माळशिरसमध्ये सहा प्रस्तावांना मंजुरी

### 'मुंडे शेतकरी अपघात' योजना

**माळशिरस, दि. १ जुलै-**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुगृह अनुदान योजना अंतर्गत सहा प्रस्तावांना आज मंजुरी देण्यात आली. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुगृह अनुदान योजना तालुकास्तरीय समिती माळशिरस यांनी रस्ते अपघात, पाण्यात पडून मृत्यु, आदी सहा प्रस्तावांना मंजुरी दिलेली आहे.

सदरचे प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी माळशिरस कार्यालयामार्फत तालुकास्तरीय मंजुरी समिती माळशिरस यांच्याकडे सादर केले असून तहसीलदार माळशिरस यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समितीची मंजुरी सभा झाली.

बंडू भोसले(उंबरे वेळापूर), प्रकाश बरडे, (माळशिरस), गणेश चव्हाण( लोणंद), धोंडिबा पिंजारी (धानोरे), तुकाराम पांढरे (फोंडशिरस), हणमंत ढोबळे (फोंडशिरस) या सहा मृतांच्या वारसाना प्रत्येकी दोन लाख रुपये सानुग्रह अनुदान देणार आहे., अशी माहिती तहसीलदार माळशिरस सुरेश शेजुळ यांनी दिली.

यावेळी तालुका कृषी अधिकारी माळशिरस आबासाहेब रुपनवर उपस्थित होते. या योजने संदर्भात अधिक माहिती व संपर्क करण्याचे आवाहन या योजनेचे तालुका समन्वयक जी. एन. मुळे कृषी पर्यवेक्षक माळशिरस संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



## कैलासवासी लक्ष्मीबाई रामभाऊ सुकळे प्रशालेत वृक्ष वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जुलै-**

कै. लक्ष्मीबाई रामभाऊ सुकळे प्रश्नाला सुनील नगर येथे ॲमेझॉन लेडीज ग्रुपचे अध्यक्ष माधवी अंधे ताई व सोलापूर ग्रीन मिशन यांच्या संयुक्त विद्यमानाने वटपौर्णिमा निमित्त वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी एकूण दहा महावृक्ष देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे लक्ष्मीकांत दंडी हे होते. सध्या सोलापुरात लोकसंख्याप्रमाणे वृक्ष लागवड कमी प्रमाणात आहे. त्यामुळे ऑक्सिजन सुद्धा कमी प्रमाणात मिळतो जागोजागी वृक्षारोपण करावी, असे दंडी यांनी आपल्या मनोगतमध्ये व्यक्त केले. या कार्यक्रमाला ललिता सिंगम, विश्वास गज्जम, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सर्व पाहुण्यांचा आधारयुक्त स्वागत मुख्याध्यापिका अंबुबाई सिद्राम पोतू यांनी केले. त्यावेळी विद्यार्थी व सतत झटणारे शाळेतील शिपाई बाळासाहेब म्हमाणे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष चौगुले यांच्या परवानगीने वृक्ष संगोपन करणार आहोत.

## पोलिस निरीक्षक पवार यांचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ३० जून-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे भक्ताभिमुख कार्य असल्याचे मनोगत उत्तर पोलिस ठाण्याचे नूतन पोलिस निरीक्षक अविनाश एकनाथ पवार यांनी व्यक्त केले.

ते उत्तर पोलीस ठाण्याचा पदभार घेतल्यानंतर श्रींचे दर्शन घेऊन, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी त्यांच्या समवेत श्रीकांत जवळगे, फिरोज इनामदार, धर्मराज चौधरी, केदारनाथ सुतार, धोंडीबा डेंगळे, गणेश अंगुले उपस्थित होते. याप्रसंगी पुरोहित सोमकांत कुलकर्णी, प्रवीण घाटगे, निखील पाटील, अतिश पवार, बाळासाहेब पोळ, दत्ता मोरे, दत्ता माने, शुभम सावंत, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, राहुल इंडे, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

## अक्कलकोट स्वामी समर्थ मंदिरावील संशोधन निबंधाची आंतरराष्ट्रीय परिषदेत दखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ जुलै-**

सी. बी. खेडगीज महाविद्यालय येथील प्रा. मयूर स्वामी यांचा श्री स्वामी समर्थ मंदिर, अक्कलकोट : आध्यात्मिक पर्यटन केंद्र म्हणून सामाजिक-आर्थिक परिणाम आणि विकसित भारत २०४७ साठीच्या संधी या विषयावरील संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय स्तरावरील ई-परिषदेत प्रकाशित करण्यात आला आहे.

सर्वोदय शिक्षण संस्थेच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, उमदी (जि. सांगली) व ग्लोबल फाउंडेशन, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "टुरिझम डेव्हलपमेंट इन इंडिया : प्रॉब्लेम्स अँड प्रॉस्पेक्ट्स इन व्ह्यू ऑफ विकसित भारत २०४७ या एकदिवसीय बहुविषयक आंतरराष्ट्रीय ई-परिषदेत हा संशोधन निबंध सादर करण्यात आला.

### प्रा. मयूर स्वामींचे यश



या संशोधनामध्ये श्री स्वामी समर्थ मंदिरामुळे अक्कलकोट परिसरात निर्माण झालेल्या आध्यात्मिक पर्यटनाच्या सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधन निबंधामुळे अक्कलकोटचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील आध्यात्मिक पर्यटन केंद्र म्हणून असलेले महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

याबद्दल संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, चंद्रकांत स्वामी, श्रीशैल भरमशेट्टी, प्राचार्य गुरुलिंगप्पा धबाले, डॉ. आबाराव सुरवसे, प्रा. संतोष वगाले, महेश स्वामी आदींनी अभिनंदन केले.

## पीएम किसान योजनेच्या हप्त्यांपासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्या

### अन्यथा बेमुदत आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ जुलै-**



माळशिरस तालुक्यातील अनेक शेतकरी गेल्या दीड वर्षापासून पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या हप्त्यांपासून वंचित असून, यामागे तालुकास्तरीय अधिकाऱ्यांचा गलथान कारभार कारणीभूत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) ओबीसी सेलचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस विजय मंडलिक यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांचे पीएम किसान योजनेचे हप्ते गेल्या एक ते दीड वर्षांपासून बंद आहेत. तर काही पात्र शेतकऱ्यांना अद्याप या योजनेचा एक रुपयाही लाभ मिळालेला नाही. शेतकरी तहसील कार्यालयात गेल्यानंतर त्यांना कृषी कार्यालयाकडे पाठविले जाते, तर कृषी कार्यालयातही योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

अनेक शेतकऱ्यांना महा-ई-सेवा केंद्रातून ऑनलाइन अर्ज करण्याचा सल्ला दिला जातो. मात्र, अनेक केंद्रांवर ही प्रक्रिया होत नसल्याचे सांगितले जाते. काही शेतकऱ्यांनी अर्ज करूनही त्यांच्या अर्जांवर कोणतीही कार्यवाही होत नसल्याने त्यांना योजनेचा लाभ मिळत नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मागण्यांकडे प्रशासनाने लक्ष न दिल्यास, पीएम किसान योजनेपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## टेंभुर्णी-येडशी महामार्गाचे चौपदरीकरणाबाबत आ. राजेंद्र राऊत यांची सचिवांसोबत बैठक

### केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ जुलै-**

बार्शी तालुक्यासह सोलापूर, धाराशीव आणि लातूर जिल्ह्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि दळणवळणाला गती देणाऱ्या टेंभुर्णी-येडशी महामार्गाच्या चौपदरीकरणाचे (४) काम लवकरच प्रत्यक्षात उतरणार आहे. बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाला मोठी गती मिळाली असून, याबाबतचा अधिकृत प्रस्ताव आता केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे.

मुंबई येथील कोकण भवन येथे आज राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सचिव संतोष शेलार आणि आमदार राजेंद्र राऊत यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत आ. राऊत यांनी टेंभुर्णी-येडशी महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे (दिल्ली) रवाना करण्यासाठी सचिव शेलार यांच्याकडे सुपूर्द केला. या महामार्गाच्या रुंदीकरणामुळे सोलापूर आणि मराठवाड्याला जोडणारा एक प्रमुख दळणवळण मार्ग अधिक सक्षम होणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी लवकरच सकारात्मक निर्णय घेतील, असा विश्वास आमदार राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केला आहे.

या प्रकल्पाला लवकरच अंतिम प्रशासकीय मान्यता मिळून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, असे संकेतही या बैठकीनंतर मिळाले आहेत. टेंभुर्णी-येडशी हा मार्ग व्यापारी आणि प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या वाढत्या वाहतुकीमुळे या मार्गावर चौपदरीकरण करण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. या महामार्गामुळे स्थानिक वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईल आणि अपघातांचे प्रमाण कमी होईल. सोलापूर, धाराशीव आणि लातूर या तिन्ही जिल्ह्यांमधील व्यापारी संपर्क अधिक वेगाने वाढेल. प्रवाशांचा वेळ आणि इंधन दोन्हीची मोठी बचत होणार आहे. टेंभुर्णी-येडशी महामार्गाचे चौपदरीकरण हा संपूर्ण मतदारसंघाच्या आणि शेजारील जिल्ह्यांच्या विकासाचा कणा ठरणार आहे. या कामासाठी आमचा सातत्याने पाठपुरावा सुरु होता. आज सचिव शेलारांसोबत झालेल्या सकारात्मक बैठकीमुळे केंद्र सरकारकडून याला लवकरच प्रशासकीय मान्यता मिळेल आणि या महामार्गाचे काम सुरू होईल. अशी आशा आ. राऊत यांनी व्यक्त केली.



## शेळगाव (आर) येथे कृषी कन्यांतर्फे उत्साहात वृक्षारोपण

**वैराग, दि.१ जुलै-**

वृक्षलागवड काळाची गरज बनली आहे. याच भावनेतून, लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या कृषी कन्यांनी रावे कार्यक्रमांतर्गत कृषी दिनाचे औचित्य साधत शेळगाव (आर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले. विद्यार्थी आणि



ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संवर्धन, वृक्षांचे महत्त्वाबाबत जनजागृती केली.

उपक्रमात भक्ती काटकर, श्रद्धा रणदिवे, प्रियंका वळसे, ऐश्वर्या लिगाडे आणि शरयू जाधव या कृषि कन्यांनी सहभाग घेतला. त्यांनी शाळेच्या परिसरात सावली देणाऱ्या, ऑक्सिजन वाढवणाऱ्या आणि औषधी गुणधर्म असलेल्या विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली. वृक्षसंगोपनही महत्त्वाचे असते, हा विचार मांडला.त्यांच्या उपक्रमाला शेळगाव (आर) येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच ग्रामस्थांनी मोठा पाठिंबा दिला.

## महत्त्वाचे...



### सामंजस्यातून यमाई रस्ता खुला

**बार्शी, दि. १ जुलै-**

परांडा रोडलगत असलेल्या जे. आर. इलेक्ट्रिकल्स यांच्या पश्चिम बाजूने उत्तर दिशेस जाणाऱ्या यमाई रस्त्याबाबत उद्भवलेल्या वादाच्या अनुषंगाने आज महसूल विभागामार्फत स्थळ पाहणी केली. यावेळी अर्जदार रियाज आजम शेख व इतर तसेच गैरअर्जदार सौदागर गोवर्धन गोरे यांच्याशी चर्चा केली. दोन्ही पक्षांनी सकारात्मक भूमिका घेत सामंजस्याने तोडग्यास सहमती दर्शविली. त्यानुसार यापूर्वी अडवलेला यमाई रस्ता परस्पर समजुतीने खुला केला. महसूल विभागाच्या म ध्यस्थीमुळे संबंधित वाद शांततापूर्ण मार्गाने निकाली निघाला. दोन्ही पक्षांनी भविष्यातही सलोखा कायम ठेवण्याचे आश्वासन दिले. यावेळी मंडळ अधिकारी शरद शिंदे, ग्राम महसूल अधिकारी दिनेश महाजन, पोलीस पाटील संतोष सातपुते, महसूल सेवक विकास शिंदे तसेच संबंधित पक्षकार व इतर नागरिक उपस्थित होते.



### एसव्हीसीएस कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. १ जुलै-**

एसव्हीसीएस कनिष्ठ महाविद्यालय एमआयडीसी येथे अकरावीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पाडला. प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमा पूजनानंतर संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे, प्राचार्य धनंजय नकाते, उपप्राचार्य सुहास काटगांव व पर्यवेक्षक केदार पटणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पारंपारिक पद्धतीने गंध लावून, ओवाळणी करून व गुलाबा पुष्प देऊन जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक नकाते म्हणाले, विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, शिस्त आणि वेळेचे योग्य नियोजन यावर भर दिल्यास निश्चित यश मिळते. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच संस्कार, क्रीडा व विविध उपक्रमामध्ये सहभाग घेऊन सर्वांगीण विकास साधावा असे सांगून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महाविद्यालयांमध्ये राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रास्ताविक प्रा.नितीन पतंगे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. संजय टोंपे यांनी मानले.



### शेळगाव येथे महिलांनी घेतली वटवृक्ष संगोपनाची शपथ

**वैराग, दि. दि. १ जुलै-**

वटपौर्णिमेनिमित्त एकता महिला मंचतर्फे एक गाव - एक वड उपक्रम राबवला. उपक्रमांतर्गत बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) येथील महिला सदस्यांना वडाचे रोप दिले होते. केवळ झाड न लावता, त्याचे वर्षभर संपूर्ण जबाबदारीने संगोपनाचा निर्धार महिलांनी केला. याप्रसंगी एकता महिला मंचच्या पदाधिकारी गीतांजली जोशी, आशा विभुते, राजश्री बादगुडे, रंजना गवळी, राणी गवळी, अर्चना सपाटे यांच्यासह गावातील इतर महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### सुलाखे हायस्कूल शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडी

**बार्शी, दि. १ जुलै-**

सुलाखे हायस्कूल शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बार्शी एज्युकेशन सोसायटीचे सचिव अनंत कवठाळे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी राजश्री पाटील, सचिव म्हणून मुख्याध्यापक इंगळे रामकृष्ण यांची सर्वानुमते निवड झाली. समितीचे सदस्य उमेश पवार, स्थानिक प्राधिकरण सदस्य भारत पवार, शिक्षक सदस्य प्रमोद माळी, शिक्षण तज्ञ मंगोलीकर, मुख्य लिपीक उमेश ठोंबरे आदींच्या उपस्थितीत ही समिती गठीत झाली. बार्शी एज्युकेशन सोसायटीचे सचिव कवठाळे यांनी मार्गदर्शन केले. मनगोळीकर यांनी मनोगत व्यक्त केले. नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार मुख्याध्यापक इंगळे यांनी केला. तसेच हायस्कूलच्या शैक्षणिक प्रगतीचा अहवाल सादर केला. माळी यांनी आभार मानले.

# माऊलींच्या रथाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड

## एक टन वजनाचा रथ आषाढी वारीसाठी होतोय सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ जुलै-**

श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी चिंबळी येथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन रथ तयार करण्यात येत आहे. सुमारे दीड टन असलेला हा रथ वजनाने हलका असून, तो भाविकांना दर्शनासाठी अधिक सुलभ ठरेल, अशी माहिती देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे यांनी दिली.

यापूर्वीचा चांदीचा रथ अडीच टन वजनाचा असल्याने तो ओढताना बैलांना त्रास होत होता. नव्या रथाचे वजन एक टनाने कमी करण्यात आले असून, उंचीही घटवण्यात आली आहे. डीआरडीओच्या मार्गदर्शनाखाली आणि अष्टेकर ज्वेलर्सच्या सहकार्याने रथावर सिल्वर इलेक्ट्रो प्लेटिंगचे काम अंतिम टप्प्यात आहे. रथाची बॅटरी काढल्याने आणि बेअरिंग कपलिंगचा वापर केल्याने रथाची चाल सुलभ झाली आहे. सोमवार (ता.२९) पासून या रथाची चाचणी घेण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सुमारे २० ते २५ लाख रुपये खर्चुन तयार केलेला हा रथ भाविक स्वतः किंवा बैल आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने सहज ओढू शकतील.



आळंदी (ता.खेड) : माऊलींच्या पालखी सोहळ्यासाठी परंपरा आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम साधून साकारण्यात आलेला चांदीचा रथ.

येत्या ८ जुलै रोजी होणाऱ्या प्रस्थान सोहळ्यापूर्वी हा देखणा आणि सुरक्षित रथ भाविकांच्या सेवेत दाखल होईल.

### ही आहेत चांदीच्या रथाची वैशिष्ट्ये

रथाच्या वरील बाजूचे स्ट्रक्चर फायबरचे असणार आहे.

सिल्वर इलेक्ट्रोप्लेटिंग करून रथाला चकाकी आणली जात आहे.

रथावर गरुड, हनुमान यांचे शिल्प साकारण्यात आले आहे.

चांदीचे नक्षीकाम आहेतसेच ठेवण्यात आले आहे, तर आठ खांब स्थावर उभे केले आहेत.

रथावर आठ सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत.

रथाच्या अग्रभागी माउलींच्या मूर्तीसह सूर्य, गरुड, हनुमान, जय-विजय यांच्या प्रतिकृती आहेत.

## 'ते' निकष पुन्हा लागू करा

### आमदार सचिन कल्याणशेट्टी; शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई मिळावी

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ जुलै-**

शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीची योग्य भरपाई मिळावी, यासाठी पीकविमा योजनेतील पूर्वीचे चार निकष पुन्हा लागू करण्याची तसेच शेतकरी हिताचे निर्णय घेण्याची शासनाकडे आग्रही मागणी आमदार. सचिन कल्याणशेट्टी यांनी विधानसभेत केली.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी शेतकरी हिताच्या मुद्द्यांवर सभागृहाचे लक्ष वेधले. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या विविध योजनांचा उल्लेख करत वीजबिल माफी, कर्जमाफी, सौरपंप, दिवसा वीजपुरवठा, मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ता योजना, पीकविमा, कृषी यांत्रिकीकरण, पीएम-किसान, हमीभाव केंद्रांचा विस्तार आणि ऊसाच्या एफआरपी वाढीबाबत शासनाने केलेल्या कामांचा आवर्जुन उल्लेख केला .

यंदा पीकविमा भरपाईची रक्कम लक्षणीयरीत्या घटल्याकडे लक्ष वेधत, पीकविमा योजनेतील पूर्वीचे चार महत्त्वाचे निकष रद्द झाल्यामुळे अनेक शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहत असल्याची बाब आमदार कल्याणशेट्टी यांनी मांडली. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या नुकसानीची योग्य भरपाई मिळावी, यासाठी पीकविमा योजनेतील पूर्वीचे चार निकष पुन्हा लागू करण्याची तसेच शेतकरी हिताचे निर्णय घेण्याची शासनाकडे आग्रही मागणी केली.

## स्टँडवर दागिने लंपास

**टेंभुर्णी, दि. १ जुलै-**

टेंभुर्णी एसटी स्टँडवर चोरट्याने महिलेचे २ लाख ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. टेंभुर्णी येथील शमिम आवटे (वय ५३) या ३० जून रोजी एसटीमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या बॅगची चैन उघडून दागिन्यांची पर्स चोरली. १४ ग्रॅमचे ७० हजार रुपयांचे मिनी गंठण, १४ ग्रॅमचा ७० हजाराचा नेकलेस, ७ ग्रॅमचे ३५ हजार रुपयांचे काळ्या मण्याचे गंठण, ८ ग्रॅमची ४० हजारांची कर्णफुले, ३ ग्रॅमची १५ हजार रुपयांची अंगठी असा ऐवज आहे.



## वळसंगमधील दोन वॉर्डची पाण्याची चिंता मिटली

### आमदार कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग दि. १ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथील वॉर्ड क्र. १ आणि वॉर्ड क्र. २ मधील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची अडचण आता कायमची दूर झाली आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या विशेष पाठपुराव्यातून या दोन्ही वॉर्डांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी स्वतंत्र थ्री-फेस एक्सप्रेस फिडर मंजूर करून तो कार्यान्वित केला आहे.

सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे व ग्रा. पं.सदस्य श्रीशैल भूसणगी यांच्याहस्ते या फिडरचे पूजन करून ही सेवा सुरू केली. परिणामी वॉर्ड क्र. १ आणि २ मधील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. 'कमी दाबाच्या विजेमुळे पाणी पुरवठा विस्कळीत होत होता, पण आमदारांनी स्वतंत्र फिडर देऊन आमचा पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवला,' अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. वळसंग ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांनी या कामाची माहिती थेट आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यापर्यंत पोहोचवली आहे. या महत्त्वपूर्ण सुधारणेनंतर, आमदार स्वतः वळसंगमधील प्रमुख नागरिकांना आणि कार्यकर्त्यांना फोनवरून चर्चा करणार आहेत. या फोन दरम्यान, फिडर सुरू झाल्यानंतर पाणी पुरवठा किती सुरळीत झाला आहे, याचा फीडबॅक ते घेतील. तसेच वळसंग गावातील पुढील विकासकामे, रस्ते आणि इतर नागरी सुविधांवर ग्रामस्थांशी थेट संवाद साधून पुढील दिशा ठरवणार आहेत. 'दिलेला शब्द पाळणारा आमदार' म्हणून सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर वळसंग परिसरातून कौतुक होत आहे.

यावेळी ग्रामसेवक माजी तंटामुक्त अध्यक्ष मियासाब कटरे, सरपंच जगदीश दयानंद अंटद, उपसरपंच समिर कटरे, ग्रामपंचायत सदस्य शालम आमलीचुंगे, मलकप्पा कोडले, श्रीशैल भुसणगी,विनायक सुरपुरे, ग्रामपंचायत आधिकारी राजाकुमार जाधव आदी उपस्थित होते.

## अधिकाऱ्याला कोयता दाखवला; सहा जणांवर गुन्हा

### मंगळवेढा तालुक्यातील धर्मगांवमधील घटना

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १ जुलै-**



धर्मगांव येथील शेतात मंजूर रस्ता खुला करण्यासाठी गेलेल्या मंडल अधिकाऱ्याला कोयता घेवून मारायला जावून शिवीगाळ, दमदाटी करीत शासकिय कामात अडथळा आणल्याप्रकरणी सहाजणांविरूध्द मंगळवेढा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

नवनाथ पाटील, लक्ष्मण आळगे, संतोष आळगे, शिवशरण सालगुटी, नागनाथ पाटील, सिध्देश्वर गोडसे अशी आरोपींची नावे आहेत. फिर्यादी तथा मंडल अधिकारी धनंजय इंगोले (वय ५५) हे धर्मगांव येथील सोमनाथ पाटील व मंगल पाटील यांच्या शेतात जाण्या येण्यासाठी तहसीलदार मंगळवेढा यांनी गट नंबर ३२ मधून पुर्वापार वहिवाटीचा जमिन गट नं.६६,५६,५४,४८,४७ या गटातून पुर्वेकडील हद्दीलगत असणारा नकाशातील वहिवाट रस्त्याचे मंजूर आदेश असल्याने फिर्यादी हे दि.२९ जून रोजी गेले होते. मात्र त्यादिवशी पाऊस आल्याने रस्ता खुला करता आला नाही. पुन्हा ते दि.३० रोजी दुपारी १२.०० वा. सदर ठिकाणी पोलिस पाटील अविनाश कुचेकर, शत्रुघ्न जाधव, पोलिस नाईक बाबर, महिला पोलिस नाईक सातवेकर आदी गेले होते.

सदरचा रस्ता खुला करीत असताना आरोपीने तुम्ही ५६ मध्ये काम न करता गट नं.६६ कडून करू या, असे म्हणाल्याने फिर्यादीसह सर्वजण गट नं.६६ मध्ये रस्ता खुला करण्याचे काम करीत असताना आरोपी नवनाथ पाटील, लक्ष्मण आळगे, संतोष आळगे, शिवशरण सालगुटी, नागनाथ पाटील, सिध्देश्वर गोडसे आदींनी संगनमत करून तुम्ही याठिकाणी रस्ता करायचा नाही असे म्हणत शिवीगाळ, दमदाटी केली. नागनाथ पाटील यांनी हातात कोयता घेवून तुम्ही येथून जावा नाही तर तुम्हाला या कोयत्याने मारुन जीवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली.

तसेच अंगावर मारण्यास येत फिर्यादीची गच्ची धरून शासकिय कामात अडथळा निर्माण केला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## शिवशंकर बझारने जपली सामाजिक बांधिलकी

### डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील; थेट कंपन्यांकडून खरेदी, ग्राहकांना स्वस्त दरात दर्जेदार वस्तू

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ जुलै-**

थेट उत्पादक कंपन्यांकडून मालाची खरेदी करून अत्यल्प नफ्यावर ग्राहकांना दर्जेदार वस्तू स्वस्त दरात उपलब्ध करून देणे, हीच शिवशंकर बझारची ओळख आहे. व्यावसायिक नफ्यापेक्षा सामाजिक बांधिलकी जपत ग्राहक आणि सभासदांच्या हितासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे प्रतिपादन चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांनी केले.

शिवशंकर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था व शिवकिर्ती महिला औद्योगिक सहकारी संस्था यांच्या अनुक्रमे ३१ व्या व ११ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा शिवशंकर बझारच्या मुख्य कार्यालयात उत्साहात पार पडल्या. यावेळी त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. कार्यक्रमास लेखापरीक्षक व करसल्लागार सीए नितीन कुदळे, दोन्ही संस्थांचे संचालक, सभासद तसेच मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे व्यवस्थापक गोपाळ माने-देशमुख यांनी वार्षिक अहवाल व विषयांचे वाचन केले.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-



पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या ध्येय-धोरणानुसार शिवशंकर बझारची वाटचाल सुरू आहे. तसेच शिवरत्न उद्योग समूहाचे चेअरमन कीर्तीध्वजसिंह मोहिते पाटील व अकलूज नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे संस्था प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. सीए नितीन कुदळे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ऑनलाईन बाजारपेठेतील वाढती स्पर्धा आणि युद्धामुळे बदलत्या आर्थिक परिस्थितीतही शिवशंकर बझारने ग्राहकांचा विश्वास कायम राखला आहे. संस्थेची विश्वासार्हता आणि पारदर्शक कार्यपद्धती हेच तिच्या यशाचे खरे सूत्र आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेत नॉर्थ अमेरिकन ऑफिस मियामी बिच फ्लोरिडा यांचेकडून 'युएस एक्सलन्स लीडरशिप २०२६' मिळाल्याबद्दल चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात करण्यात आला. सचिन सगर यांना सर्वोत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार देऊन गौरवले. वार्षिक सभेनिमित्त एक दिवसीय लकी ड्रॉ काढून पाच विजेत्यांना त्यांनी खरेदी केलेल्या किमतीच्या रुपयाचा माल मोफत दिला.

> संस्था केवळ वस्तूंची विक्री करत नाही, तर ग्राहकांसाठी मुदत ठेव, सभासद ठेव, बचत योजना आणि विविध बक्षीस योजनाही राबवत आहे. सध्या मुख्य शाखेसह माळिशरस तालुक्यात आठ शाखांद्वारे हजारो ग्राहकांना सेवा दिली जात असून, यावर्षीही सभासदांना १० टक्के लाभांश देण्यात येणार आहे.
>
> **-डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील,**
> चेअरमन, शिवशंकर बझार